




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ९ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०


# दहावीचा निकाल 92.9 टक्के; कोकण विभाग अव्वल

## यंदाही मुलींनीच मारली बाजी




एकुण विद्यार्थ्यांची नोंदणी 15,55,026

उत्तीर्ण विद्यार्थी 14,20,486

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (MSBSHSE) मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर केला. राज्याचा एकूण निकाल ९२.९ टक्के लागला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत निकालात २.०१ टक्क्यांची घट झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालात मुलींनी मुलांपेक्षा सरस कामगिरी केली आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रनजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्यासह विविध शिक्षण संचालक उपस्थित होते. नउ विभागीय मंडळांमध्ये कोकण विभागाने ९७.६२ टक्क्यांसह निकालात आपले पहिले स्थान कायम राखले आहे. तर सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) लागला आहे.

### कॉपीमुक्त अभियान आणि पारदर्शक परीक्षा

*मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले की, यंदाची परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी विशेष कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले होते. यासाठी २७१ भरारी पथके आणि महिलांची विशेष पथके तैनात करण्यात आली होती. एकूण आठ माध्यमांमध्ये ही परीक्षा पार पडली. निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे आता अकरावीची प्रवेश प्रक्रिया वेळेत सुरू करणे शक्य होणार आहे. जे विद्यार्थी उत्तीर्ण होउ शकले नाहीत, त्यांनी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावा, असे आवाहनही कुलकर्णी यांनी या वेळी केले. बारावीच्या निकालापाठोपाठ दहावीच्या निकालातही यंदा घट झाल्याचे पाहायला मिळत आहे.*

**मुलींचे वर्चस्व कायम-** यंदाच्या निकालात मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या असून, मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे. राजभरातून एकूण १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती.

**विभागनिहाय निकाल**

| | |
|---|---|
| कोकण | 97.62% |
| मुंबई | 94.97% |
| पुणे | 94.24% |
| कोल्हापूर | 95.47% |
| नाशिक | 90.53% |
| अमरावती | 90.50% |
| नागपूर | 89.07% |
| लातूर | 88.42% |
| छत्रपती संभाजीनगर | 88.41% |

## राज्यातील सुमारे 8 टक्के विद्यार्थी मराठीतच अनुत्तीर्ण

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. एकूण ३५ विषयांपैकी १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०० टक्के निकाल लागणा-या शाळांची संख्याही वाढताना दिसत आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी वाढत आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर प्रथम भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून परीक्षा देणा-या राज्यातील सुमारे १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी ८० हजार ८०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचे धक्कादायक चित्र आहे. इयत्ता दहावीत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी भाषेची निवड करून एकूण ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यापैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी नापास झाले आहेत. ज्या राज्याची मातृभाषा मराठी आहे, ज्या भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, अशा मराठी भाषेतच राज्यातील सुमारे ९४ हजार ५४४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. एकीकडे परकीय भाषा निवडणा-या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण चांगले असताना मराठी विषयाची अनास्था या निमित्ताने उघड झाली आहे.

**गुजराती भाषेचा निकाल १०० टक्के-**दहावीच्या परीक्षेत द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून गुजराती भाषेची निवड करणा-या ३०२ विद्यार्थ्यांपैकी सर्व म्हणजे १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्कृत ही द्वितीय आणि तृतीय भाषा निवडणा-या ९६ हजार ३३१ विद्यार्थ्यांपैकी ९५ हजार ५७१ म्हणजे ९९.२१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अरेबिक भाषा विषयाचा निकाल ९९.५९ टक्के लागला आहे.

**मराठी भाषा विषयाचा निकाल**

प्रथम भाषा म्हणून मराठी भाषा विषयाचा निकाल ९२.५७ टक्के लागला आहे. जवळपास आठ टक्के विद्यार्थी नापास झाले आहेत. मराठी हीच मातृभाषा असलेले विद्यार्थी हे मराठी विषयात अनुत्तीर्ण होत आहेत. याचा अर्थ भाषिक कौशल्य या विद्यार्थ्यांना प्राप्त असण्याची शक्यता नाही. त्यामुळे मराठी विषयाच्या अध्यापन प्रक्रियेचा विचार करण्याची गरज शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**शासनाचे मराठीकडे दुर्लक्ष-**मराठी विषय दहावी पर्यंत अनिवार्य असलेल्या कायद्यात सुधारणा करून तो बारावी पर्यंत अनिवार्य असेल अशी संबंधित कायद्यात दुरुस्ती करणे हे शासनाने मान्य केलेल्या मराठी भाषा धोरणात नमूद असूनही अद्याप ती दुरुस्ती करण्यात आलेली नाही, अशी खंत मराठीच्या व्यापक हितासाठी या चळवळीचे संयोजक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यक्त केली आहे.

## घुसखोरांना शोधून देशाबाहेर काढणार 321 जणांचे बलिदान व्यर्थ नाही जाणार

**कोलकाता/वृत्तसंस्था ::** त्रिपुरा, आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार आले आहे. आता सीमा सुरक्षा आणखी मजबूत केली जाईल. तस्करी आणि घुसखोरीवर कठोर कारवाई केली जाईल. घुसखोरांना हाकलून देशाला घुसखोरमुक्त करण्याचे भाजपचे वचन आहे, असा निर्धार भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. पश्चिम बंगाल येथे विजयी झालेल्या आमदारांच्या गटनेता निवडीच्या बैठकीला अमित शहा यांनी संबोधित केले. या बैठकीत पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.नवनिर्वाचित आमदारांना संबोधित करताना अमित शहा यांनी भाजपच्या ३२१ हुतात्म्यांचे स्मरण केले. हा प्रवास सोपा नव्हता. या विजयासाठी ३२१ भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. संपूर्ण देशातील राजकारण पाहिले आहे. पण पश्चिम बंगाल आणि केरळ येथे झालेला हिंसाचार कधीही पाहिला नाही. कार्यकर्त्यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, असे नमूद करत अमित शहा यांनी सर्वांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच बलिदान दिलेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांना नमन केले. सुवेंदू अधिकारी यांनी १९९५ मध्ये काँग्रेसमधून आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली होती. २००७ च्या नंदीग्राम आंदोलनात त्यांनी बजावलेली भूमिका बंगालच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. डिसेंबर २०२० मध्ये त्यांनी तृणमूल काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला. २०२१ पासून ते विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणून कार्यरत होते. त्यांचे वडील शिशिर अधिकारी हे माजी केंद्रीय मंत्री आहेत, तर त्यांचे दोन्ही भाउदेखील राजकारणात सक्रिय आहेत.

**पश्चिम बंगाल येथे विजयी झालेल्या आमदारांच्या गटनेता निवडीच्या बैठकीला अमित शहा यांनी संबोधित केले**



## निदा खानला लपवण्यात AIMIM नगरसेवक सामील-मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :**नाशिक टीसीएस प्रकरणात आता नवनवीन गोष्टी समोर येत आहेत. निदा खानला लपून राहण्यासाठी AIMIM पक्षाच्या नगरसेवकाने मदत केल्याचे म्हटले जात आहे. या प्रकरणावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप वाढले आहेत. या प्रकरणात कोण मदत करत आहे, कोणाचे आशीर्वाद आहेत, हे सगळे शोधून काढले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हे स्पष्टपणे दिसत आहे की, निदा खानला लपवून ठेवण्यात एमआयएमच्या नगरसेवकांचा हात होता. या सगळ्याच्या पाठीमागे कोण होते, हेदेखील शोधून काढले जाईल. अशा प्रकारे धर्मांतरणाच्या रॅकेटमध्ये ते सामील आहेत का, हे जे रॅकेट आहे, ते त्याला मदत करत आहेत का, त्यांचा याला आशीर्वाद आहे का, हे सगळे शोधले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**निदा खान छत्रपती संभाजीनगर येथे लपून बसली होती**

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील




अत्याचार व कथित सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात (कार्पोरेट लव्ह जिहाद) छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी नाशिक पोलिसांच्या मदतीने मोठी कारवाई केली. या प्रकरणातील फरार महिला आरोपी निदा खानला नारेगावातून अटक करण्यात आली. निदा खान पोलिसांना गुंगारा देत छत्रपती संभाजीनगर येथील नारेगाव परिसरात लपून बसली होती. निदा खान हिला लपण्यासाठी मदत करत असल्याच्या आरोपाखाली छत्रपती संभाजीनगरचे AIMIM पक्षाचे नगरसेवक मतिन पटेल याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, ज्या ठिकाणावरून निदा खानला पोलिसांनी ताब्यात घेतले, त्या परिसरात अनेक अवैध धंदे सुरू आहेत. भागातील एमआयएमच्या मतीन नावाच्या नगरसेवकालाही अटक करावी. छत्रपती संभाजीनगर नावाचा इम्तियाज जलील यांना पहिल्यापासून राग आहे. त्या मुलीला लपवण्यामागे मतीन पटेल आणि त्यांचे बॉस इम्तियाज जलील यांचा हात आहे, असा गंभीर आरोप करत, एमआयएमवर बंदी घालण्याची मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत, असे चंद्रकांत खैरे यांनी म्हटले आहे.

## पेट्रोल-डिझेलचे दर वाढणार? 30000 कोटींवर पोहोचला तेल कंपन्यांचा तोटा; रोज 700 कोटींचा फटका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेतील युद्ध आणि होर्मुज सामुद्रधुनीतील तणाव, यामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत सातत्याने वाढताना दिसत आहेत. शिपिंग आणि विमा खर्च प्रचंड वाढला आहे. परिणामी कंपन्यांच्या आयात खर्चातही वाढ झाली आहे. मात्र, असे असले तरी. गेल्या चार वर्षांपासून भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर आहेत. मात्र, याचा मोठा फटका तेल कंपन्यांना बसत आहे. अमेरिका, चीन, पाकिस्तान आणि श्रीलंकेसारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेलच्या किमती तब्बल ५० टक्क्यांपर्यंत वधारल्या आहेत.

**कंपन्यांना दररोज ६०० ते ७०० कोटींचे नुकसान -**पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकलनानुसार, केवळ मार्च आणि एप्रिल दरम्यान इंडियन ऑईल, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम या तिनही सरकारी



कंपन्यांचा एकत्रित तोटा ३० हजार कोटी रु पयांपर्यंत पोहोचला आहे. कंपन्यांना दररोज ६०० ते ७०० कोटींचे नुकसान सोसावे लागत आहे. एप्रिल महिन्यात कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर १८ रुपये तर डिझेलवर २५ रुपयांपर्यंत तोटा सहन करावा लागत आहे.

**आयात खर्च ५० टक्क्यांनी वाढला -**इंडियन ऑईल, बीपीसीएल आणि एचपीसीएल यांसारख्या कंपन्यांचा आयात खर्च ५० टक्क्यांनी वाढला आहे. मात्र, सरकारी हस्तक्षेपामुळे त्यांना किमती वाढवता येत नसल्याने हा तोटा वाढत चालला आहे. तर तेल कंपन्यांचा हाच तोटा ६२५०० कोटी रु पयांपर्यंत पोहोचला असता -महत्वाचे म्हणजे, या संकटात दिलासा म्हणून केंद्र सरकारने एक्साइज ड्युटीमध्ये १० रु पयांची कपात केली आहे. जर सरकारने ही कपात केली नसती, तर तेल कंपन्यांचा हाच तोटा ६२५०० कोटी रु पयांपर्यंत पोहोचला असता.

## पोलिसांत आक्रमकपणा राहला नाही

### *मंत्री संजय शिरसाट यांचा आरोप गुंडांवरील वचक कमी झाला*

मुंबई : छत्रपती संभाजीनगरमधून नाशिक पोलिसांनी नाशिक धर्मांतर प्रकरणी निदा खान या मुख्य आरोपीला अटक केली आहे. ही मार्चमध्ये घटना घडली होती. दीड दोन महिने ती कुठे होती? कुणाला माहीत नाही. निदा खान ही एकटी नाही, तर तिची आई, मावशी देखील यात सहभागी होती. एमआयएम पक्षाने तिला सहकार्य केले आहे.याआधी इम्तियाज जलील यांनी या संदर्भात वक्तव्य करत एकाअर्थी पाठिंबाच दिला होता. इतरही ठिकाणी एमआयएम त्यांच्या अशाच हालचाली वाढवत आहेत. हे सगळे प्रकार एमआयएमच्या नेतृत्वात होतात. निदा खान एक मोहरा असल्याचे सांगत सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी नाशिकमधील बहुचर्चित टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणी भाष्य केले आहे.राज्यभरात महिलांवर होणा-या अत्याचारांच्या घटनांबाबत बोलतानाही संजय सिरसाट यांनी पोलिसांच्या कारवाईसंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राज्यात पोलिसांमध्ये आक्रमकपणा नाही. पोलीस प्रशासनाने गांभीर्याने कारवाई करावी. पोलिसांचा धाक हा गुंडांवर असावा, असेही ते म्हणाले. राज्यात हिंदूचा द्वेष करण्याचे प्रकार सुरू आहेत. पुणे, छत्रपती संभाजीनगरसह सगळीकडे असे प्रकार पाहायला मिळतील. मी मुख्यमंत्र्यांना भेटून एसआयटी चौकशीची मागणी करणार आहे. टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणातील मुख्य सूत्रधार कोण? याचा शोध लागला पाहिजे. २२-३०च्या दरम्यानच्या तरुणांना अस प्रशिक्षण देणे, नोकरी नाही तरी त्यांच्याकडे पैसा आहे. बाईक आहेत, पैसा येतो कुठून? बलात्कार, नशेखोरीचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो. या प्रकरणी इम्तियाज जलील यांची देखील चौकशी झाली पाहिजे. हे एक मोठ षडयंत्र आहे असेही संजय शिरसाट म्हणाले.

## अमरावतीच्या राज्य सेवाहक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे यांची नियुक्ती

### मंगळवारी मुंबई येथे पद व गोपनीयतेची शपथ

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य सेवाहक्क आयोगाच्या अमरावती विभागाचे आयुक्त म्हणून म्हाडाचे सेवानिवृत्त मुख्य अधिकारी तथा वरिष्ठ सनदी अधिकारी अरुण डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून राज्यपालांच्या वतीने आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव मंगळवार दिनांक १२ मे रोजी राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देणार आहेत.

मुंबई येथील म्हाडाच्या बिल्डिंग रिपेअर अँड री कन्स्ट्रक्शन बोर्डाचे मुख्य अधिकारी म्हणून अरुण डोंगरे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर शासनाने त्यांची सेवाहक्क आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. शासकीय सेवेत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा या सामाजिक बांधीलकीने त्यांनी काम केले असून, शासकीय सेवेची सुरुवात उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मंगरूळपीर येथून झाली आहे. अमरावती विभागात मूर्तिजापूर, दारव्हा, अचलपूर येथे उपविभागीय अधिकारी म्हणून काम केल्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी अमरावती तसेच महसूल उपायुक्त अमरावती व नागपूर या पदावरही त्यांनी काम केले आहे. अमरावती महापालिका आयुक्त म्हणून शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच ऑनलाइन इमारत परवाना पद्धत लागू केली. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला घर बांधणीसाठी सुलभपणे परवानगी



मिळत आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना स्वच्छ भारत अभियानात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अभिनेते अभिताभ बच्चन यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला होता. यशवंत पंचायतराज अभियानातही त्यांना राज्यात द्वितीय क्रमांक मिळाला आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी या पदावर काम करताना जलयुक्त शिवार ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबवली. या योजनेचा राज्यस्तरावर गौरव करण्यात आला. शिर्डी येथील साईबाबा संस्थानचे मुख्य कार्याधिकारी तसेच शासनाच्या विविध विभागात त्यांनी यशस्वीपणे सेवा दिली आहे. मुंबई येथील म्हाडामध्ये मुख्याधिकारी असताना इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना त्यांचा हक्क अबाधित राहावा, त्यांना वेळेत भाडे मिळावे व इमारतीचे नियोजित वेळेत बांधकाम करून पुनर्वसन करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण शासन निर्णय त्यांच्या कार्यकाळात निर्गमित करण्यात आला. त्यांच्या प्रभावी व उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांची अमरावतीचे राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे.

## शुभेंदु अधिकारीच होणार प.बंगालचे नवे मुख्यमंत्री

### आज सकाळी 11 वाजता शपथविधी

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमधील सत्तास्थापनेचा पेच अखेर सुटला असून भाजपचे ज्येष्ठ नेते शुभेंदु अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शुभेंदु अधिकारी हे पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे आता निश्चित झाले असून, उद्या (शनिवार, ९ मे) सकाळी ११ वाजता त्यांचा भव्य शपथविधी सोहळा पार पडणार आहे.



थोड्याच वेळात अधिकारी राजभवनावर जाउन राज्यपालांची भेट घेतील आणि सरकार स्थापनेचा दावा मांडतील.

**अमित शहांच्या उपस्थितीत ऐतिहासिक निवड-**कोलकाता येथे पार पडलेल्या भाजप आमदारांच्या बैठकीत शुभेंदु अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा स्वतः निरीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत सर्व आमदारांनी एकमताने अधिकारी यांच्या नेतृत्वाला पसंती दिली. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन होत असून, अधिकारी यांची निवड ऐतिहासिक मानली जात आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन तृतीयांश पेक्षा जास्त जागा जिंकून दणदणीत बहुमत मिळवले आहे. राज्यात नवीन सरकार स्थापनेचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

## तामिळनाडूत विजय यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा

### CPM-CPI आणि VCK देणार पाठिंबा



**चेन्नई/वृत्तसंस्था :** तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ च्या निकालानंतर रंगलेल्या सत्तासंघर्षाला आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. सुपरस्टार विजय यांच्या नेतृत्वाखालील 'तमिळगा वेत्री कझगम' (TVK) हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमताच्या आकड्यापासून ते काहीसे दूर होते. मात्र, ताज्या सूत्रांनुसार, डावे पक्ष (CPM, CPI) आणि विदुथलाई चिरू थईगल काची (VCK) यांनी विजय यांना पाठिंबा देण्याची तयारी दर्शवल्याने त्यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

**संख्याबळाचे गणित आणि सत्तास्थापना-**तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०८ जागांवर विजय मिळवून दणदणीत कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, विजय स्वतः दोन मतदारसंघांतून निवडून आले आहेत. नियमानुसार त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा लागणार असल्याने त्यांच्या पक्षाचे संख्याबळ १०७ होईल. एकूण आमदारांची संख्या २३३ गृहीत धरली तरी बहुमतासाठी ११८ या जादूई आकड्याची आवश्यकता आहे. टीव्हीकेला सध्या काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा आहे, तरीही बहुमतासाठी आणखी ६ जागांची उणीव भासत होती. ज्यातील सत्तापेच सोडवण्यासाठी आता लहान पक्षांनी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे.

## जोडप्याने श्रीलंकेहून पोहत गाठला भारत

### 10 तास 45 मिनिटांत 32 किलोमीटर अंतर कापले

**बंगळुरू :** येथील एका धाडसी जोडप्याने थेट समुद्राच्या लाटांनाच आव्हान देत एक नवा इतिहास रचला आहे. दानिश अब्दी आणि वृषाली प्रसाद या जोडप्याने श्रीलंका ते भारत हे समुद्रातील



साधारण ३२ किलोमीटरचे अंतर पोहून पार करत एक प्रेरणादायी कामगिरी बजावली आहे. दानिश आणि वृषाली यांचे हे यश आजच्या तरुणाईसाठी धैर्य, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाचे एक उत्तम उदाहरण बनले आहे. या मोहिमेची सुरुवात श्रीलंकेतील तलाईमन्नार येथून झाली. समुद्राचा प्रचंड वेग, सतत बदलणारे प्रवाह आणि शारीरिक थकवा यांसारख्या अनेक आव्हानांशी झुंज देत दानिश आणि वृषाली यांनी सलग १० तास ४५ मिनिटे पोहून भारतातील धनुष्कोडी गाठले. विशेष म्हणजे, हा पोहण्याचा मार्ग ऐतिहासिक अॅडम्स ब्रिज जवळून गेल्याने या मोहिमेला एक विशेष सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.




# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ९ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# एस.टी.आरक्षणासाठी नेमलेल्या समितीने पाच महिन्यात केलेल्या कामाचा आढावा द्या

## गोर सेनेची राज्यसरकार कडे मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*गेल्या वर्षी गोरबंजारा समाजाला एस.टी.प्रवर्गातून आरक्षण द्या, हैदराबाद गॅझेट लागू करा आदी मागण्यासाठी गोरबंजारा समाजाने महाराष्ट्रभर ५५ महामोर्चे काढले शिवाय गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सैनिक उतरवून रास्ता रोको केला व नांदेड रेल्वे रोखण्याचा इशारा दिला होता.*



मात्र राज्यसरकार न सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व बंजारा समाजातील शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा झाली व एसटी आरक्षणासाठी उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीन कोणती कामे केली, कोणत्या दिशेने अभ्यास सुरु केला आहे की अजून फक्त कागदापुरतीच समिती सिमित राहिली आहे हे कळत नसल्याने गोरबंजारा समाज आक्रमक झाला असून अभ्यास समितीने पाच महिन्यातील केलेली कामे गोरबंजारा समाजापुढे मांडावीत या मागणीसाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज वाशीम जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

संपूर्ण भारतातील १४ करोड गोरबंजारा समाजाची जन्मापासून तर मरेपर्यंत स्वतंत्र गोरधाटी असून आदीम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात देशातील अनेक राज्यात त्यांना यामुळेच एस.टी.प्रवर्गातून आरक्षण दिलेले आहे मात्र महाराष्ट्र राज्यात विमुक्त जाती अ प्रवर्गात सामावेश केलेला आहे.

मात्र गोरबंजारा समाजाचे राहणीमान वागणूक, रुढी परंपर, विशिष्ट ठिकाणी तांडा करुन राहणे, गोरबोली, गोरधाटी, पेहराव, आर्थिक मागासलेपण, स्वभावातील लाजबुजरेपणा हे आदिम सभ्यतेची संपूर्ण लक्षणे गोरबंजारा समाजात दिसतात म्हणून त्यांना एसटी प्रवर्गाचा समांतर आरक्षण द्यावे ही गेल्या ७५ वर्षापासूनची मागणी आहे गेल्यावर्षी याच मागणीसाठी राज्यात ५५ पेक्षा अधिक लाखोच्या संख्येने महामोर्चे निघालेत. पाच युवकांनी आपले जिवन संपवून शहीद झालेत. अनेकांनी आमरण उपोषण केले, रास्ता रोको केले. मात्र सरकारने दखल घेतली नाही म्हणून गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोर सैनिक उतरवून रास्ता रोखला तेव्हा सरकारने सकारात्मक चर्चा करण्यासाठी मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी बंजारा शिष्टमंडळासोबत चर्चा केली व अभ्यास समिती उच्च न्यायालयाचे न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्यात आली मात्र गेल्या पाच महिन्यात समितीने नेमके कशाचा अभ्यास केला, कोणत्या दिशेने केला.

याबाबत समाजाला आजपर्यंत काहीच माहिती दिलेली नाही तेव्हा ही समिती केवळ कागदापुरतीच सिमित तर नाही ना अशी शंका गोरबंजारा समाजात निर्माण झाली असून अभ्यास समितीने आजपर्यंत नेमके काय काय केले हे समजून घेण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना गोरसेनेचे जिल्हाध्यक्ष, किशोर जाधव सचिव निलेश राठोड भगत दळ प्रमुख नेमीचंद महाराज समनकच्या जिल्हाध्यक्ष शीतल राठोड महानंदाबाई राठोड वनिता पवार सुरेखा राठोड कल्पना राठोड किरणबाई राठोड गोरसेनेचे संतोष चव्हाण डॉ संदीप आडे विष्णू राठोड गोकुळ आडे जीवन नायक रतन राठोड शंतनु राठोड गोरसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुंडलिक नगर येथे उद्या मोफत आरोग्य तपासणी व आयुर्वेद पंचकर्म शिबिर

## आ. भावनाताई गवळी यांच्या पुढाकार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाढत्या वयानुसार कमी होणारी दृष्टी, हाडांची झीज आणि बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे सांधेदुखी, मधुमेह, थायरॉईड यांसारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी सर्वसामान्यांच्या मदतीला 'महिला उत्कर्ष प्रतिष्ठान' धावून आले आहे. शिवसेना नेत्या तथा विधान परिषद आमदार मा. भावनाताई गवळी यांच्या संकल्पनेतून ङङपुंडलिक नगर (देगांव), ता. रिसोडङङ येथील आयुर्वेद महाविद्यालयात रविवार, १० मे २०२६ रोजी एका भव्य मोफत आरोग्य तपासणी व आयुर्वेद पंचकर्म शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महागड्या आरोग्य तपासण्या आणि शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्याने अनेक रुग्ण उपचारांकडे दुर्लक्ष करतात. हीच अडचण ओळखून या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये नामांकित तज्ज्ञ



डॉक्टरांद्वारे रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.

**शिबिरातील प्रमुख सोयी-सुविधा :** या शिबिरामध्ये विविध आजारांवर मोफत उपचार केला जाईल, ज्यात प्रामुख्याने नेत्र तपासणी : आवश्यक असल्यास मोफत नेत्र शस्त्रक्रिया व गरजूंना चष्म्यांचे वाटप. **स्त्री रोग तपासणी:** महिलांच्या विशेष आजारांवर तपासणी व औषधोपचार.

**इतर तपासण्या :** हाडांच्या मजबुतीची तपासणी, मधुमेह (शुगर) तपासणी व गाठी काढण्यासारख्या किरकोळ शस्त्रक्रिया.

# ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेतील टोकाच्या गावांना नियमित पाणी द्या

## आमदार रणधीर सावरकर यांच्या अधिकाऱ्यांना सूचना



■ प्रतिनिधी | अकोट ■

उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे ग्रामीण भागात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शेवटच्या टोकावरील गावांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या सूचना आमदार रणधीर सावरकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

दहीहंडा, हिंगणी, खानापूर, केळीवेळी, रोहना, काटीपाटी, दोनवाडा, ब्रम्हपुरी, वडद आदी गावांतील नागरिकांनी पाणीटंचाईबाबतच्या समस्या आमदार सावरकर यांच्यासमोर मांडल्या होत्या. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी व ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाची संयुक्त आढावा बैठक घेऊन समस्यांवर चर्चा केली. यावेळी बोलताना आमदार सावरकर म्हणाले की, यंदाचा उन्हाळा अत्यंत तीव्र असून अकोला जिल्हा उष्णतेच्या झळांनी होरपळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईचा त्रास होऊ नये, यासाठी पाणीपुरवठा योजनेवरील दुरुस्ती, देखभाल व तांत्रिक कामांवर तातडीने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. योजनेच्या शेवटच्या टोकावरील गावांपर्यंत पुरेसा व नियमित पाणीपुरवठा पोहोचविण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांनी गांभीर्याने पार पाडावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीत हिंगणी येथील उंच पाण्याच्या टाकीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच केळीवेळी गावाचा पाणीपुरवठा कावसा ऐवजी खानापूर झेडबीआरवरून करण्याबाबतही अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.

या बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता राठोड, अभियंता अजय मालोकार, उपअभियंता चौधरी, उपअभियंता निखिल राऊत, अभियंता झाडे, अभियंता सावरकर यांच्यासह जिल्हा भाजपा ग्रामीण अध्यक्ष संतोष शिवरकर, किशोर बुले, दहीहंडा सरपंच आठवले ताई, पुरुषोत्तम नळे, संजय आठवले, कल्पना पळसपगार, विवेक भरणे, भगवान आढे, रामेश्वर शिवरकर, गजानन सुरे, चंदू बोचे, सुभाष नागळे, विठ्ठल बावणे, संजय बकाल, प्रेमराज भटकर, विजय बावणे, वैभव श्रीनाथ, नितीन सिरसाट, सोपान वावरे, रामकृष्ण नागोलकर, कृष्णा अडबोल, भास्कर वाघमारे, हिम्मतराव आंग्रे, मंगेश सातारकर आदी उपस्थित होते.

# ११ मे रोजी विभागीय लोकशाही दिन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन ११ मे रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे करण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील सामान्य नागरीकांनी तसेच महिलांनी त्यांच्या विभागीय लोकशाही दिनामधील व महिला लोकशाही दिनामधील तक्रार अर्ज तालुका व जिल्हा लोकशाही दिनात सादर केल्यानंतर विहीत नमुन्यात लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. तसेच सदर तक्रार dcgamravati@gmail.com / dcg_ amravati @rediffmail.com या ई-मेलवर विहीत नमुन्यात पाठवावे.

# तंबाखू नियंत्रण कायद्यांतर्गत वाशिममध्ये २२ पानटपरी धारकांवर कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या वतीने वाशिम शहरात तंबाखूविरोधी विशेष धाड सत्र मोहीम राबविण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे तसेच अतिरीक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

आरोग्य विभाग, पोलिस विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक, रिसोड नाका, शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय, लाखाळा, अकोला नाका तसेच आर्य कॉलेज परिसरात



तपासणी करण्यात आली. सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम (कोटपा) २००३ अंतर्गत कलम ४, कलम ६ अ व कलम ६ ब चे उल्लंघन करणाऱ्या २२ पानटपरी धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधितांकडून एकूण ५ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. कलम ४ अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी असून, कलम ६ अ नुसार १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास मनाई आहे. तसेच कलम ६ ब नुसार शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री प्रतिबंधित करण्यात आली आहे. या कारवाईत जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांढरकर, मानसशास्त्रज्ञ राम सरकटे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, अन्न सुरक्षा अधिकारी व्ही. जे. राठोड, एमजीव्हीएसचे मंगेश गायकवाड तसेच पोलिस कॉन्स्टेबल जगदीश महाले व गणेश महाले यांनी सहभाग नोंदविला. तंबाखूमुक्त समाज निर्मितीसाठी अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

# खिर्डा ग्रामपंचायतीची मुक्या प्राण्याप्रती संवेदनशीलता

## गोमातेच्या मृतदेहावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार



■ प्रतिनिधी | खिर्डा ■

येथील दलित वस्ती स्मशानभूमी परिसरात दि. ७ मे रोजी गोमातेचा मृतदेह आढळून आल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामस्थांनी तत्परता दाखवत सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार केले. ही माहिती मिळताच सत्यदीप वैद्य यांनी कोणताही विलंब न करता ग्रामपंचायत सरपंच विद्याताई शिंदे, ग्राम सचिव अधिकारी जमधाडे मॅडम तसेच ग्रामपंचायत सदस्य मालती वैद्य यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर तातडीने हालचाली सुरू करण्यात आल्या. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास जेसीबीची व्यवस्था करून जागेची पाहणी करण्यात आली व अंत्यविधीसाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात आली. अंत्यविधीपूर्वी गोमातेला पांढरे वस्त्र अर्पण करून विधीवत पूजा करण्यात आली. उपस्थित ग्रामस्थांनी श्रद्धाभावाने शेवटचा निरोप दिला. यावेळी आकाश शिंदे, सत्यदीप वैद्य, सदस्य अमोल खिल्लारे, धम्मपाल गवई, प्रशांत झोंबाडे, चंदू घुगे, सचिन कांबळे, अनंत इंगळे, सिध्दार्थ जुमडे, संगीता घुगे, इंदुबाई इंगळे आदी उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत गोमातेवर अंत्यसंस्कार पार पडले. या संपूर्ण कार्यात पुढाकार घेतल्याबद्दल ग्रामस्थांकडून सत्यदीप वैद्य यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# कंकुबाई माध्यमिक कन्या शाळाचा दहावीचा निकाल ९९.३० टक्के

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कंकुबाई माध्यमिक कन्या शाळा येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी यंदाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेचा निकाल तब्बल ९९.३० टक्के लागला आहे. उत्कृष्ट निकालामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी शाळेतील २९ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळविले. तसेच ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या ५६ विद्यार्थिनींनी प्राविण्य श्रेणीत यश मिळविले आहे. ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांसह प्रथम श्रेणीत ४५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून, ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून १२ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.

गुणवंत विद्यार्थिनींमध्ये नाशीत फातेमा सय्यद कदीर हिने ९९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा संतोष गांजरे हिने ९७.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर अमृता रविंद्र नाखले हिने ९६.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# पतीच्या हिस्स्याची मालमत्ता नाकारत विधवेला जीवे मारण्याची धमकी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पतीच्या निधनानंतर सासऱ्यांनी मृत्यूपत्राद्वारे दिलेल्या वडीलोपार्जित संपत्तीमधील आपला हिस्सा मिळावा, अशी मागणी करणाऱ्या एका विधवा महिलेला शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना वाशीम शहरात घडली. याप्रकरणी महिलेने वाशीम शहर पोलीस ठाण्यात जबानी रिपोर्ट दाखल केला आहे.

संगीता सुभाष खरटकर (वय ५०, रा. राजणी चौक, शुक्रवारपेठ, वाशीम) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या पतीचे २००९ मध्ये निधन झाले. सासरे स्वर्गीय मारोती खरटकर यांनी ते जीवंत असताना त्यांच्या संपत्तीची समान वाटणी करण्याबाबतचे मृत्यूपत्र करून ठेवले होते. मात्र ,त्यांचे पती सुभाष खरटकर यांचे निधनानंतरही त्यांच्या हिस्स्यावर येणारी सायकल दुकान, घर, खोली व गोडाऊन यांचा ताबा देण्यात आला नसल्याचा आरोप पोलीसात दिलेल्या तक्रारीत त्यांनी केला आहे.

दरम्यान, ६ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास संगीता खरटकर या मालमत्तेबाबत विचारणा करण्यासाठी त्यांचे भाया शिवकुमार खरटकर यांच्या ताब्यात असलेल्या पाटणी चौकातील दुकानात गेल्या असता, त्यांच्याशी शिवकुमार खरटकर आणि त्यांची पत्नी रत्नमाला खरटकर यांनी वाद घातला.

'तुम्हाला काहीही देणार नाही, तुम्ही आमचे काहीही बिघडवू शकत नाही,' असे म्हणत शिवीगाळ, धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली असून, एका विधवा महिलेला न्यायासाठी पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागल्याने संताप व्यक्त होत आहे. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करून पोलीसांनी न्याय व संरक्षण द्यावे अशी मागणी संगिता सुभाष खरटकर यांनी या तक्रारीद्वारे केला आहे.

## जाहीर नोटीस

**विदयमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १०५/२०२६ चौ. ता. १०/०६/२०२६

**ज्योत्स्ना व इतर विरूध्द निरंक**

**अर्जदार :** १. ज्योत्स्ना कैलास इंगोले -वय अं. ४१ वर्षे, धंदा- घरकाम. २. संज्योत कैलास इंगोले -वय अं. २० वर्षे, धंदा -शिक्षण. ३. हर्षदीप कैलास इंगोले - वय अं. १६ वर्षे, धंदा- शिक्षण. ४. रामकोर हरीभाऊ इंगोले - वय अं. ७० वर्षे, धंदा निरंक. अर्जदार क्र. ३ हर्षदीप कैलास इंगोले अपाक आई अर्जदार क्र. १. ज्योत्स्ना कैलास इंगोले. अर्जदार क्र. १ ते ४ रा. माधवनगर, लाखाळा, वाशिम, ता. जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क. १ ही मयत नामे कैलास हरीभाऊ इंगोले यांची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयत नामे कैलास हरीभाऊ इंगोले यांचे मुले आहेत. अर्जदार क्र. ४ हया मयत नामे कैलास हरीभाउ इंगोले यांची आई आहे. मयत नामे कैलास हरीभाऊ इंगोले हे दिनांक २०/०३/२०२३ रोजी मृत्यू पावलेत. तसेच अर्जदार क्र १ चे सासरे नामे हरीभाउ लक्ष्मण इंगोले हे दिनांक १८/०६/२०२३ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन. VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. १०/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर वाशिम

# थॅलेसिमिया डे केअर युनिटमध्ये विविध स्पर्धा

## रुण मुलांच्या चेह-यावर फुलले हास्य ; बोन मॅरो ट्रान्सप्लाँटसाठीही मदतीचा हात

■ प्रतिनिधी | अकोला ■

थॅलेसिमियाग्रस्त मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण करण्यासाठी शहरातील थॅलेसिमिया डे केअर युनिटमध्ये विविध स्पर्धा, स्नेहमेळावे व पुरस्कार वितरण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. माजी नगराध्यक्ष तथा भाजप नगरसेवक हरिश आलिमचंदानी आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

थॅलेसिमियासारख्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या मुलांना मानसिक आधार मिळावा, त्यांच्यात सकारात्मकता निर्माण व्हावी आणि उपचारांच्या ताणातून काही क्षण दिलासा मिळावा, या उद्देशाने कार्यक्रम

### नगरसेवक हरिश आलिमचंदानी यांचा सेवाभावी उपक्रम



घेण्यात आला. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंद व्यक्त केला.

थॅलेसिमिया हा आजार रुग्णांसह त्यांच्या कुटुंबासाठीही आर्थिक आणि मानसिक आव्हान निर्माण करणारा ठरतो.

अशा परिस्थितीत हरिश आलिमचंदानी यांनी 'संकल्प फाउंडेशन'च्या माध्यमातून बोन मॅरो ट्रान्सप्लाँटसारख्या खर्चिक उपचारांसाठी अनेक कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. त्यामुळे अनेक मुलांना नवजीवन मिळाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा निर्माण होत असतानाही एकाही मुलाचा उपचार थांबू नये यासाठी डॉ. हेडगेवार ब्लड बँक व साईजीवन ब्लड बँक यांच्या सहकार्याने नियमित रक्तपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या कार्यात डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी सातत्याने योगदान देत आहेत.

कार्यक्रमाला अकोला थॅलेसिमिया सोसायटीचे अध्यक्ष हरिशभाई आलिमचंदानी, दीपक भानुशाली, अश्विन पोपट, श्रीहरी ठाकरे, डॉ. मनीष पाडिया, सुशील रामटेके, ऐश्वर्या जैन, रुषाली रायबोले, नैना डेंबडा, कमल आलिमचंदानी, संदीप आलिमचंदानी यांच्यासह थॅलेसिमियाग्रस्त मुलांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. थॅलेसिमियाग्रस्त मुलांसाठी सुरू असलेल्या या सेवाभावी उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना आधार मिळत असून, हरिश आलिमचंदानी यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६१ ■ शनिवार ९ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.००रु


## कारंजा आणि वर्ध्याच्या लेकरांनी फोडला यशाचा आभाळ

# सृजल-हिमांशू ठरला वर्धा जिल्ह्याचा 'सुपरस्टार'

### कारंजाचा सुजल जिल्ह्यात प्रथम, तर पिंपरीचा हिमांशू द्वितीय, अक्षरा-अमेय तृतीय क्रमांकावर

### दहावीच्या रणधुमाळीत ग्रामीण विद्यार्थ्यांची सिंहगर्जना कष्टाच्या घामाला यशाचे सुवर्णफळ





**वर्धा । जनमाध्यम**

दहावीच्या निकालाचा दिवस उजाडला आणि वर्धा जिल्ह्याच्या प्रत्येक घरातून आनंदाचा जयघोष घुमू लागला. कुठे आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते, कुठे वडिलांनी लेकराला मिठी मारत अभिमानाने छाती फुगवली, तर कुठे शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या यशाने समाधानाचा नि:श्वास टाकला. शहर आणि गाव, श्रीमंती आणि गरिबी, सुविधा आणि संघर्ष या सगळ्यांच्या पलीकडे जात वर्ध्याच्या ग्रामीण मातीतून यंदा पुन्हा एकदा गुणवत्तेचे तेजस्वी सूर्य उगवले.

कारंजा (घा.) येथील गुरुकुल पब्लिक स्कूलचा विद्यार्थी सृजल विनोद जाधव याने तब्बल ९८.८० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आणि संपूर्ण वर्ध्याचा 'सुपरस्टार' ठरला. तर पिपरी मेघे येथील अग्रग्रामी स्कूलचा विद्यार्थी हिमांशू प्रफुल्ल क्षीरसागर याने ९८.६० टक्के गुणांसह जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ताकद दाखवून दिली. विशेष म्हणजे यंदा जिल्ह्यात प्रथम आणि द्वितीय या दोन्ही स्थानांवर मुलांनी बाजी मारत मुलीच नेहमी अव्वल ही समजूत मोडून काढली आणि जिल्ह्याच्या गुणवत्तेचा झेंडा थेट आभाळात रोवला.

निकाल जाहीर होताच कारंजा शहरात उत्सवाचे रणशिंग फुंकले गेले. सृजलच्या घरासमोर नागरिकांची गर्दी उसळली. पेढ्यांचे ताट रिकामे होत होते आणि अभिनंदनाचा वर्षाव थांबत नव्हता. हा आमच्या कारंज्याचा अभिमान आहे, असे म्हणत नागरिकांनी सृजलला खांद्यावर घेत जल्लोष केला. शिक्षक असलेल्या वडिलांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले, तर आईने मुलाला मिठीत घेत त्याच्या कपाळावर प्रेमाने हात फिरवला. संघर्षाच्या धगेत तावून-सुलाखून निघालेल्या या यशाने संपूर्ण जिल्ह्याची मान उंचावली.

सृजलचे वडील विनोद जाधव हे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. आर्थिक साधेपणा, मर्यादित सुविधा आणि प्रचंड स्पर्धा यामध्येही सृजलने अभ्यासाची ज्योत कधी विझू दिली नाही. पुस्तक वाचन, वक्तृत्व आणि सामान्य ज्ञानाची आवड जोपासत त्याने अभ्यासाला ध्येय बनवले. भविष्यात प्रशासकीय अधिकारी बनून देशसेवा करण्याचे त्याचे स्वप्न असून, मोठे व्हायचे असेल तर मोठी स्वप्ने पाहावी लागतात, हा त्याचा ठाम विश्वास आहे.

पिपरी मेघेच्या हिमांशू क्षीरसागरनेही यशाचा झेंडा रोवत ग्रामीण विद्यार्थ्यांची धमक दाखवून दिली. शांत स्वभाव, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या बळावर हिमांशूने जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधले. त्याच्या यशामुळे पिपरी मेघे गावातही आनंदाचा जल्लोष उसळला.

दरम्यान, कारंजाची अक्षरा इंगळे, पुलगावची अक्षरा वाठोरे आणि आर्वीचा अमेय देशमुख यांनी प्रत्येकी ९८.४० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला. या तिघांनीही अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन आणि जिद्दीच्या बळावर हे यश खेचून आणले. तर आर्वीच्या गौरव तिजारे याने ९८ टक्के गुणांसह जिल्ह्याच्या गुणवंत यादीत आपले नाव कोरले.

देवळी तालुक्यात प्रथम आलेल्या अक्षरा वाठोरेला इंजिनिअर बनून देशासाठी काम करायचे आहे. प्राध्यापक वडिलांचे मार्गदर्शन आणि आईच्या प्रोत्साहनामुळे तिचा आत्मविश्वास अधिक मजबूत झाला. कारंजाची अक्षरा इंगळेला सीए बनून आर्थिक क्षेत्रात मोठे नाव कमवायचे आहे. अपयशाला घाबरू नका, सातत्य ठेवा, असा संदेश तिने विद्यार्थ्यांना दिला.

आर्वीच्या अमेय देशमुखने दिवसातून चार ते पाच तास नियमित अभ्यास करत हे यश मिळविले. आयआयटीमध्ये प्रवेश घेऊन इंजिनिअर होण्याचे त्याचे स्वप्न आहे. शिक्षक असलेल्या वडिलांचे मार्गदर्शन आणि आईच्या पाठिंब्यामुळे तो आत्मविश्वासाने पुढे सरकत राहिला.

सिंदी रेल्वे केंद्रातही विद्यार्थ्यांनी यशाची पताका फडकावली. केसरीमल नगर विद्यालयाचा आदर्श प्रवीण वेले याने ९६.८० टक्के गुणांसह केंद्रात प्रथम क्रमांक पटकावत संस्कृत विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळविले. नाविन्य परांडे, जान्हवी तळवेकर आणि मयंक गायकवाड यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत केंद्राचा गौरव वाढविला.

केसरीमल कन्या शाळेने ९५.९१ टक्के निकालाची परंपरा कायम राखली, तर भरत ज्ञान मंदिरम् शाळेने शंभर टक्के निकाल लावत शिक्षण क्षेत्रात नवा इतिहास घडविला.

वर्ध्याच्या ग्रामीण मातीतून उगवलेली ही जिद्दीची लेकरं आता राज्य आणि देशपातळीवर झेप घेण्यासाठी सज्ज झाली आहेत. दहावीच्या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले, ज्यांच्या डोळ्यांत स्वप्नांची आग असते, त्यांनाच यशाचा सूर्य सलाम करतो,

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा - मुख्यमंत्री



**मुंबई जनमाध्यम :** राज्यात संभाव्य एल निनोच्या संकटाची चाहूल लागल्याने जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे आदेश मुख्यमंत्री अनर्ह्ी ईर्हेन्े यांनी दिले आहेत. 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अंतर्गत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पूर्ण करून भूजल पातळी वाढविण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.


'वर्षा' या शासकीय निवासस्थानी झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री ऐंहर्रेब ेंूप्द्, विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ज्या भागात भूजल पातळी झपाट्याने कमी होत आहे, त्या गावांमध्ये प्राधान्याने जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. जलयुक्त शिवार अभियानातील दुरुस्तीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून १५ मेपूर्वी राज्यस्तरीय आराखड्यांना मंजुरी द्यावी. तसेच गावांबाहेरील आवश्यक १० टक्के कामांनाही प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. नालाखोलीकरणाच्या कामांदरम्यान पुन्हा गाळ साचू नये, यासाठी नाल्यांच्या काठावर बांबू लागवडीचा पर्याय विचारात घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जूनपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यासही त्यांनी सांगितले.

दरम्यान, सचिव जितेंद्र पापळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत आतापर्यंत १ लाख ४४ हजारांहून अधिक कामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १ लाख १० हजार कामे पूर्ण झाली आहेत. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर गाळ काढण्यात आला असून हजारो एकर जमीन सुपीक झाली आहे. तसेच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत २२ हजार कामे पूर्ण झाली असून त्यांचे जिओ-टॅगिंगही करण्यात आले आहे.

# दहावीत मौलाना आझाद उर्दू हायस्कूलची शतप्रतिशत कामगिरी

### मिस्बाह खान शाळेत प्रथम; गुणवंत विद्यार्थ्यांचे यशाने संस्थेचा गौरव



वर्धा जनमाध्यम : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या एसएससी परीक्षा २०२६ च्या निकालात मौलाना आझाद उर्दू हायस्कूल, वर्धा यांनी शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या निकालात कु. मिस्बाह शारिक खान हिने ९२.६० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. कु. निदा सईद मोहम्मद खान हिने ८७ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. जिक्रा फातिमा इरफान खान हिने ८६.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. विशेष म्हणजे, यावर्षी चार विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले असून १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जनाब अख्तर अली, सचिव जनाब हुसेन अली, उपाध्यक्ष जनाब मोहम्मद अली, कोषाध्यक्ष जनाब हमीद अली रिजवी तसेच कार्यकारिणी सदस्य जनाब रोशन अली, सय्यद शाहिद अली, इमरान राही, नूर अली आणि साबीर अली यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक आणि शाळेतील शैक्षणिक वातावरणाला दिले. यावेळी शिक्षक श्री मोहम्मद आरिफ शेख, श्री जावेद खान व शाझिया तबस्सुम यांच्या मार्गदर्शनाचे विशेष कौतुक करण्यात आले. सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि शिस्तबद्ध शिक्षणामुळे शाळेने पुन्हा एकदा यशाची नवी उंची गाठली आहे.

# १९ पानटपरीवर केलेल्या कारवाईत ३ हजार ८०० रुपयाचा दंड वसूल



**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू नियंत्रण कायदा अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनात देवळी येथील १९ पान टपरीवर केलेल्या कारवाईत ३ हजार ८०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आला. सदर कारवाई राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम सामान्य रुग्णालाच्या जिल्हा सल्लागार डॉ. नम्रता सलूजा, सामाजिक कार्यकर्ता राहुल बुचुंडे, हर्षल ढोबळे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी रविराज धाबर्डे, गौरी पिंपरे, पियुश मानवटकर, पोलीस शिपाई अमोल मंडाळकर यांनी केली. देवळी येथील बसस्टॉप, इंदिरा गांधी चौक, एमआयडीसी परिसर व लगतच्या परिसरातील १९ पान टपरीवर कारवाई केली.

जिल्हाधिकारी वान्मथी सी व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या आदेशानुसार तंबाखु नियंत्रण कायदा २००३ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत अन्न व औषध प्रशासन विभाग, पोलिस विभागाच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करण्यात आली. २०२१ च्या शासन निर्णयानुसार सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच तंबाखुजन्य पदार्थाच्या सेवनास, थुंकन्यास व धुम्रपान करण्यास मनाई तसेच सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे, सेवन करणे व धुम्रपान करण्यास कोटपा कायदा २००३ अंतर्गत मनाई आहे, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी कळविले आहे.

# झाडू हाती घेत वर्धा पोलीस उतरले मैदानात

### पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली 'स्वच्छ वर्धा-सुंदर वर्धा'साठी श्रमदान मोहीम; पोलीस दलाने दिला समाजाला स्वच्छतेचा संदेश



**वर्धा जनमाध्यम :** गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणारे, कायदा-सुव्यवस्थेसाठी दिवस-रात्र रस्त्यावर धावणारे पोलीस शुक्रवारी एका वेगळ्याच भूमिकेत दिसले... हातात बंदूक नव्हे, तर झाडू होता... चेहऱ्यावर अधिकाराचा रुबाब नव्हता, तर समाजाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव होती, स्वच्छता हीच सेवा हा मंत्र अंगीकारत वर्धा जिल्हा पोलीस दलाने 'स्वच्छ वर्धा-सुंदर वर्धा' उपक्रमांतर्गत जिल्हाभर भव्य श्रमदान मोहीम राबवून समाजासमोर एक आदर्श उभा केला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या संकल्पनेतून आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. विशेष म्हणजे, आदेश देणारे अधिकारी स्वतः मैदानात उतरले आणि खाकी वर्दीतील प्रत्येक जवानाने खांद्याला खांदा लावत परिसर स्वच्छ करण्यासाठी घाम गाळला.

पोलीस मुख्यालय, शासकीय निवासस्थाने, मोटार परिवहन विभाग, आशीर्वाद मंगल कार्यालय परिसर, पोलीस अधीक्षक कार्यालयाची मुख्य इमारत अशा विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात साफसफाई करण्यात आली. केवळ मुख्यालयापुरतेच नव्हे तर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी आणि अंमलदारांनी श्रमदान करून स्वच्छता हीच खरी देशसेवा असल्याचा संदेश दिला.

सतत तणावाखाली काम करणाऱ्या पोलीस दलाने स्वच्छतेच्या माध्यमातून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला. पोलीस हे केवळ कायद्याचे रक्षक नाहीत, तर समाजाचे जबाबदार घटकही आहेत, हे या मोहिमेतून अधोरेखित झाले. स्वच्छ आणि सुंदर वातावरणामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचा मानसिक तणाव कमी होतो, कामात उत्साह वाढतो आणि नागरिकांनाही पोलीस ठाण्यात येताना विश्वासाचे वातावरण मिळते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल स्वतः झाडू हातात घेऊन साफसफाई करत असल्याचे दृश्य पाहून अनेक नागरिक थबकले. खाकी फक्त धाक दाखवत नाही, तर समाजासाठी घामही गाळते, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. अधिकारी आणि अंमलदारांनी एकत्र येत केलेल्या श्रमदानामुळे पोलीस दलातील सांघिक भावना अधिक मजबूत झाल्याचे दिसून आले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या 'स्वच्छ भारत' अभियानाला बळ देणारी ही मोहीम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरली. आज वर्ध्यात खाकी वर्दीने पुन्हा एकदा सिद्ध केले जनतेच्या सुरक्षेसोबतच समाजाचे संस्कार जपण्याची जबाबदारीही आम्हीच निभावतो,

या मोहिमेत सौरभ कुमार अग्रवाल, सदाशिव वाघमारे, विनोद चौधरी, मजीद शेख यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार आणि पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

# घरफोडीत ७५ हजारांचा सोन्याचा ऐवज लंपास

**वर्धा जनमाध्यम-** शास्त्री चौक परिसरात घरातून सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना समोर आली असून चोरट्यांनी तब्बल ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, मंजुला परमार यांनी घरातील खोलीत पाहणी केली असता सोन्याच्या बांगड्या व कानातील दागिने जागेवर दिसून आले नाहीत. शोधाशोध करूनही दागिने न सापडल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. चोरट्याने सोन्याच्या दोन बांगड्या आणि कानातील दोन जोड असा एकूण ७५ हजार रुपयांचा ऐवज हातोहात लंपास केल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणात संशय व्यक्त करण्यात आल्याने रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी संशयिताविरोधात गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलिसांनी गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रजेवर गेलेला शिक्षाबंदी फरार; कारागृह प्रशासनात खळबळ

**वर्धा जनमाध्यम** संचित रजेवर सोडण्यात आलेला जन्मठेपेचा शिक्षाबंदी नियोजित मुदतीत कारागृहात न परतल्याने कारागृह प्रशासनात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी खरांगणा (मोरांगणा) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, नेरी (पुनर्वसन) येथील श्रीधर पुंडलिक गडलिंग यास २८ दिवसांच्या संचित रजेवर सोडण्यात आले होते. नियमानुसार त्याने ५ मे रोजी स्वतःहून कारागृहात हजर होणे अपेक्षित होते. मात्र, मुदत संपूनही तो परत न आल्याने प्रशासनाने शोधमोहीम सुरू केली.

गडलिंग हा वर्धा कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. रजेचा गैरफायदा घेत तो फरार झाल्याने कारागृह प्रशासनाची धावपळ उडाली आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून फरार शिक्षाबंदीचा शोध सुरू करण्यात आला आहे.

# नाचणगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यातील नाचणगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्राने राष्ट्रीय गुणवता आश्वासन मानांकन अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. ही वर्धा जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून ग्रामीण भागातील आरोग्य सेवांच्या गुणवत्तेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत ॅूदर्हेत पैंटू एबूर्से ेदिल्म णह्यू (ऱ्एिं), नवी दिल्लीच्या वतीने दिनांक २० ते २१ एप्रिल २०२६ रोजी केंद्राचे बाह्य मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनात प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगावने सर्व निकष पूर्ण करत ८४.१९ टक्के गुण प्राप्त केले असून केंद्राला 'ेंर्त्ूब णीग्' दर्जा बहाल करण्यात आला आहे.



या मूल्यांकन प्रक्रियेत रुग्णाभिमुख सेवा, स्वच्छता, संसर्ग नियंत्रण, औषध उपलब्धता, नोंद व्यवस्थापन, मातृ व बाल आरोग्य सेवा, प्रयोगशाळा सेवा तसेच प्रशासनिक कार्यप्रणाली आदी विविध विभागांची तपासणी करण्यात आली. केंद्राने सर्व विभागांमध्ये समाधानकारक कामगिरी करून राष्ट्रीय निकषांची पूर्तता केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नलिनी विखे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ मंगेश रेवतकर, तालुका आरोग्य अधिकारी तालुका डॉ. मोनाली मामीलवार, डॉ. भागवत राऊत डॉ. प्रशांत वाडीभस्मे व डॉ. विनीत झलके यांच्या वेळोवेळी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाने प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त होण्यास यश मिळाले असल्याचे वैद्यकीय अधिका-यांनी सांगितले.

या यशाबद्दल पराग सोमण तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगाव, संबंधित वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका यांचे अभिनंदन केले. ग्रामीण नागरिकांना दर्जेदार आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे मानांकन महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कळविले आहे.

# भरधाव वाहनाने उडवला खांब; व्यक्ती जखमी, शंभर घरांचा अंधार

**वर्धा जनमाध्यम** पुलगाव येथील हरीराम नगर परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेने मोठा अपघात घडला. भरधाव वेगातील वाहनाने थेट महावितरणच्या विद्युत खांबांना धडक दिल्याने एक व्यक्ती जखमी झाला, तर परिसरातील शंभर ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित झाला. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. माहितीनुसार, एमएच ३२ एजे ४७९३ क्रमांकाच्या वाहनाने नियंत्रण सुटल्याने लघुदाब वाहिनीच्या खांबांना जोरदार धडक दिली. या धडकेत विद्युत खांबाचे मोठे नुकसान झाले. अपघातात सूर्यकांत कापसे हे जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# शिक्षण संस्थेतील सात हजारांच्या वायरिंगवर चोरट्याचा डल्ला

**वर्धा जनमाध्यम-** पिपरी (मेघे) येथील शिक्षण संस्था शिक्षा मंडळाच्या परिसरात अज्ञात चोरट्याने विद्युत फिटिंगच्या वायरिंगवर डल्ला मारल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे संस्थेच्या परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.माहितीनुसार, संस्थेचे प्राचार्य परिसरातील पार्किंग व निवासस्थाने पाहण्यासाठी गेले असता इमारतीतील इलेक्ट्रिक वायरिंगची तोडफोड झालेली दिसून आली. अधिक पाहणी केली असता अज्ञात व्यक्तीने वायरिंग उखडून नेल्याचे स्पष्ट झाले. या प्रकारात सुमारे सात हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. चोरट्याने नियोजनपूर्वक वायरिंग कापून चोरी केल्याने परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# मध्यप्रदेशात महिला डेप्युटी जेलरने केले जन्मठेपेतील कैद्याशी लग्न!

**भोपाळ/वृत्तसंस्था :**प्रेम कुठे, कधी, कसे, कोणावरही होउ शकते असे म्हटले जात, हे सिद्ध करणारी घटना मध्यप्रदेशातून समोर आली आहे. कायद्याचे रक्षण करणारी महिला व कायदा भंग करणारा गुन्हेगार यांच्यात झालेले प्रेम समाजाची बंधने झुगारु न आता विवाहबंधनात अडकले आहे. या विवाहाची चर्चा आता देशभर सूरू झाली आहे.

**जेलमध्ये जुळले प्रेमसंबध-**याची कहाणी अशी की २००७ मध्ये एका नगरसेवकाच्या हत्या प्रकरणात धर्मेंद्र सिंग या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. तो सतना मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता यावेळी कारागृहात वॉंरट इनचार्ज म्हणुन कार्यरत असलेल्या फिरोजा खातून यांचे धर्मेंद्र सिंग यांच्यात प्रेमसंबध निर्माण झाले, यातून या कहाणीला सुरवात झाली. जेल मध्येच फूललेले हे प्रेम आता धर्मांची बंधने तोडून विवाह बंधनात अडकले आहेत. धर्मेंद्र सिंग हा जेलमधून बाहेर आल्यानंतर त्यांनी काही वर्षे वाट पाहिली व आता लग्नबंधनात अडकेले आहेत.

**तोपर्यंत महिला अधिका-याने प्रेमाची वाट पाहिली-** धर्मेंद्र याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती त्यामुळे तो सतना जेलमध्ये शिक्षा भोगत होता. धर्मेद हा कारागृहात असताना वारंट संबधी कामांमध्ये जेल प्रशासनाची मदत करत असे यातूनच फिरोजा खातून व धर्मेंद्र यांच्यात ओळख वाढली. त्यांच्यात कामासंबधी संवाद होत होते यातून त्यांच्या संवादाचे रू पांतर हळूहळू प्रेमात झाले. जवळपास १४ वर्षे शिक्षा भोगल्यानंतर धर्मेंद्रची २०२० मध्ये चांगल्या वर्तुणूकीच्या आधारावर जेलमधून सुटका झाली. पण जेलमध्ये असलेल्या प्रेमासाठी खातूनने तो बाहेर येईपर्यंत वाट पाहिली. व त्यांनतर त्यांची प्रेमकहाणी सुरु च राहिली व त्यांनी शेवटी लग्न करण्याचा निर्णय घेतला. हिंदू पद्धतीने विवाह-या विवाहाला फिरोजाच्या घरच्यांचा विरोध होतो कारण दोन्ही वेगळ्या धर्मातील होते . त्यामुळे फातिमाच्या घरचे कोणीही या विवाहासाठी हजर नव्हते. फिरोजा मुस्लिम व धर्मेंद्र हिंदू असून या दोघांचा विवाह हिंदू प्रथेप्रमाणे ५ मे २०२६ रोजी छत्तरपूर जिल्ह्यात पार पडला.

# जरांगे मैदानात; 16 ला जाहीर करणार आंदोलनाची तारीख

**जालना:** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरू न राज्यात पुन्हा एकदा संघर्षाची ठिणगी पडण्याची चिन्हे आहेत. 'सरकारला कितीही मायेने सांगितले तरी ते आपल्या डोळ्यांतील अश्रू पुसणार नाहीत,' अशा कडक शब्दांत टीका करत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. येत्या १६ मे रोजी जालन्यातील अंतरवाली सराटी येथे पत्रकार परिषद घेउन आंदोलनाची पुढील दिशा आणि तारीख जाहीर करणार असल्याची माहिती त्यांनी आज दिली.जालना येथे माध्यमांशी



बोलताना जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, सरकारला मराठा समाजाची कामे होउ द्यायची नाहीत. मराठ्यांची मुले आज कर्जबाजारी होत आहेत आणि या परिस्थितीला सर्वस्वी सरकारच जबाबदार आहे. सरकार जाणूनबुजून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देत नसल्याचा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला. जरांगे पाटील पुढे म्हणाले की, 'आता शांत बसून चालणार नाही. जर आपल्याला आपले हक्क मिळवायचे असतील, तर समाजातील प्रत्येक बांधवाला पुन्हा एकदा कट्टरतेने आंदोलनाच्या पवित्र्यात यावे लागेल.' राज्यात पुन्हा एकदा आंदोलन उभे करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानामुळे शासकीय सेवा अधिक गतिमान

## टेक वारी 2.0 मधील तांत्रिक प्रशिक्षण क्षेत्रात तज्ज्ञांचे मत

**मुंबई, दि. ८ :** कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रणाली आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे शासकीय सेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होत असल्याचे मत सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजीत टेक वारी २.० मधील तांत्रिक प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले. मंत्रालयातील परिषद सभागृहात आयोजित या प्रशिक्षण सत्रात डेटा व्यवस्थापन, माहिती केंद्रे, जीपीयू आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालींच्या वापराबाबत प्रायमस पार्टनर्सचे अभिजित धर, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी), महाराष्ट्राच्या राज्य सूचना अधिकारी सपना कपूर तसेच गुगलचे वरिष्ठ तांत्रिक विशेषज्ञ प्रवीण दवे यांनी मार्गदर्शन केले. सत्राच्या प्रारंभी अभिजित धर यांनी माहिती केंद्रांची मूलभूत रचना, प्रक्रिया प्रणाली, माहिती साठवण व्यवस्था, नेटवर्क प्रणाली आणि आभासी प्रणाली याबाबत मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध डिजिटल सेवा माहिती केंद्रांमधून कशा कार्यरत असतात, तसेच क्लाउड तंत्रज्ञान, माहिती सुरक्षा आणि पर्यायी माहिती केंद्र व्यवस्थेचे महत्व त्यांनी स्पष्ट केले. सपना कपूर यांनी शासनाच्या डिजिटल प्रणालींबाबत माहिती देताना विविध विभागांमधील माहिती एकत्रितपणे जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. नागरिकांना अधिक जलद आणि सुरक्षित सेवा देण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रवीण दवे यांनी जीपीयू, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक माहिती केंद्रांची कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन करताना मोठ्या प्रमाणावर येणा-या सीसीटीव्ही चित्रफितींचे तत्काळ विश्लेषण, वाहतूक नियमभंग ओळखणे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सतर्कता प्रणालींचा वापर याबाबत सोदाहरण माहिती दिली. केंद्रीय प्रक्रिया युनिट आणि जीपीयू यांतील फरक तसेच समांतर प्रक्रिया प्रणालीचे महत्व त्यांनी स्पष्ट केले. सर्वम एआयच्या प्रात्यक्षिकातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शासकीय सेवा अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने कशा देता येउ शकतात, याची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

# मोठ्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत संघभावना, संयम आवश्यक

## निवृत्त आयपीएस अधिकारी आशिष गुप्ता

**मुंबई/ प्रतिनिधी :** शासन अथवा खासगी कोणताही नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविताना सायबर सुरक्षा, डेटा एन्क्रिप्शन आणि गोपनीयतेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असून नाविन्यपूर्ण प्रकल्पावर काम करणा-या टीममध्ये संघभावना, संयम आणि सातत्यपूर्ण काम करणे आवश्यक असल्याचे मत निवृत्त आयपीएस अधिकारी आशिष गुप्ता यांनी व्यक्त केले. मंत्रालयातील परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या टेक वारी २.० उपक्रमांतर्गत इम्प्लिमेंटेशन ऑफ लार्ज आयटी प्रोजेक्ट्स अँड प्रोक्युअरमेंट्स या विषयावरील विशेष व्याख्यानात गुप्ता बोलत होते. आशिष गुप्ता यांनी, आजचे युग हे पूर्णपणे डिजिटल डेटाचे युग असल्याचे सांगितले. आज प्रत्येक व्यक्ती नकळत शेकडो डिजिटल फूटप्रिंट्स तयार करत आहे. मोबाईल वापरण्यापासून विमान तिकीट बुकिंग, ऑनलाइन खरेदी, सोशल मीडिया वापर, सीसीटीव्ही, ओटीटी प्लॅटफार्म्सपर्यंत प्रत्येक गोष्ट डेटा निर्माण करत आहे, असे त्यांनी नमूद केले. दररोज जगभरात प्रचंड प्रमाणात डेटा निर्माण होत असून २०२५ मध्ये दररोज ४६३ एक्साबाइट डेटा निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# DRDO ची 'TARA' शस्त्रप्रणाली? आज पार पडली पहिली यशस्वी चाचणी; शत्रुसाठी ठरणार 'काळ'!

**ओडिशा/वृत्तसंस्था :** संरक्षण क्षेत्रातील 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला बळकटी देणारा एक मोठा टप्पा भारताने गाठला आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय हवाई दलाने ७ मे २०२६ रोजी ओडिशाच्या किनारपट्टीवर 'टॅक्टिकल अडव्हांस्ड रेंज ऑगमेंटेशन' या स्वदेशी शस्त्रास्त्राची पहिली यशस्वी चाचणी घेतली. ही भारताची पहिली स्वदेशी 'ग्लाइड' शस्त्रास्त्र प्रणाली असून, यामुळे भारतीय हवाई दलाची ताकद अनेक पटींनी वाढणार आहे.

'तारा' हे एक मॉड्यूलर रेंज एक्स्टेंशन किट आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, हे तंत्रज्ञान एखाद्या सामान्य आणि 'अनगाइडेड' (ज्याचा मार्ग नियंत्रित करता येत नाही अशा) बाम्बला अत्याधुनिक 'प्रिसिजन गाइडेड' (अचूक लक्ष्य भेदणा-या) शस्त्रात रू पांतरित करते. या किटच्या वापरामुळे जमिनीवरील शत्रू ची ठिकाणे उद्ध्वस्त करण्याची क्षमता आणि अचूकता कमालीची वाढते. हे देशातील पहिले 'ग्लाइड' शस्त्र आहे जे अत्याधुनिक असूनही अत्यंत कमी खर्चात तयार करण्यात आले आहे. यामुळे महागड्या क्षेपणास्त्रांवरील अवलंबित्व कमी होईल.

**संपूर्णपणे स्वदेशी बनावट-**या प्रगत प्रणालीची रचना हैदराबाद येथील 'रिसर्च सेंटर' आणि DRDO च्या इतर प्रयोगशाळांनी मिळून केली आहे. या प्रकल्पात 'डेव्हलपमेंट कम प्राडक्शन पार्टनर्स' आणि भारतातील अनेक संरक्षण उद्योगांनी मोलाचा वाटा उचलला आहे. विशेष म्हणजे, चाचणी यशस्वी होताच या उद्योगांनी आता त्याचे उत्पादनही सुरू केले आहे.

**संरक्षण मंत्र्यांकडून कौतुक**

या ऐतिहासिक यशाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ङ्कडक्र, हवाई दल आणि संबंधित उद्योगांचे अभिनंदन केले. 'भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतेला एका नव्या उंचीवर नेणारे हे महत्त्वाचे पाउल आहे,' अशा शब्दांत त्यांनी या यशाचा गौरव केला. तसेच, DRDO चे अध्यक्ष डॉ. समीर व्ही. कामत यांनीही या प्रकल्पातील शास्त्रज्ञ आणि कर्मचा-यांच्या परिश्रमांचे कौतुक करत ही भारतासाठी एक मोठे यश असल्याचे म्हटले आहे.



# आमच्या पक्षात कुणीही 'एकनाथ शिंदे' नाही!

## मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला? भाजपवर थेट हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी नॅशनल कान्फरन्स (NC) मध्ये फूट पडण्याची शक्यता पूर्णपणे नाकारली आहे. 'आमच्या पक्षात कुणीही 'एकनाथ शिंदे' नाही,' असे अब्दुल्ला यांनी म्हटले आहे. तेसच त्यांनी, भाजपवर सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही केला. ते श्रीनगर येथे पत्रकारांशी बोलत होते.



**मुख्यमंत्रीपदाची खुर्ची बळकावण्याचा त्यांचा प्रयत्न -**विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांच्या विधानांवर बोलताना अब्दुल्ला म्हणाले, भाजप सत्ता मिळवण्यासाठी आतूर आहे. मुख्यमंत्रीपदाची खुर्ची बळकावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील राजकीय उलथापालथीचा संदर्भात देत ते म्हणाले, 'एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या मदतीने पक्ष सोडला होता. मात्र नॅशनल कान्फरन्स एकजूट आहे. सर्व आमदार पक्षासोबत ठामपणे उभे आहेत.' जम्मू-काश्मीरमधील 'विशेष सखोल पुनरीक्षण' (SIR) प्रक्रियेसंदर्भात बोलताना अब्दुल्ला म्हणाले, पुढील विधानसभा निवडणुका २०२९ मध्ये होणार आहेत. यामुळे सध्या तरी याचा फारसा परिणाम होणार नाही. अनुच्छेद ३७० हटवल्यानंतर झालेल्या परिसीमन प्रक्रियेवरही त्यांनी यावेळी भाष्य केले. ही प्रक्रिया म्हणजे, केवळ भाजपला निवडणूक फायदा मिळवून देण्याच्या उद्देशाने आखलेली एक खेळी होती, असे ते म्हणाले.

**'भाजपचे हे राजकारण 'धमकावणारे आणि ब्लॅकमेल' करणारे' -** मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भात बोलताना त्यांनी याचा संबंध थेट राज्याचा दर्जा परत मिळण्याशी जोडला. 'मंत्रिमंडळ विस्तार कुठल्याही भीतीपोटी नाही, तर राज्याचा दर्जा अद्याप न मिळाल्यामुळे थांबला असल्याचे ते म्हणाले.' जोपर्यंत भाजपला राज्यात सत्ता मिळत नाही, तोपर्यंत ते राज्याचा दर्जा परत देणार नाहीत आणि सरकारला नीट काम करू देणार नाहीत, असा आरोपही त्यांनी यावेळी भाजपवर केला. एवढेच नाही तर, भाजपचे हे राजकारण 'धमकावणारे आणि ब्लॅकमेल' करणारे, असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली.

# डीएमकेची काँग्रेससोबतची साथ सुटली

## लोकसभेत जागा बदलण्याची कणीमोझी यांची मागणी

**नवी दिल्ली :** देशातील राजकीय समीकरणे बदलली असून, द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK) पक्षाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेससोबतची आपली युती संपुष्टात आणली आहे. या पार्श्वभूमीवर, लोकसभेत डीएमकेच्या खासदारांच्या बसण्याच्या व्यवस्थेत बदल करण्यात यावा, अशी मागणी डीएमके खासदार कणीमोझी यांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून केली आहे. लोकसभा अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात कणीमोझी यांनी स्पष्ट केले आहे की, आता काँग्रेससोबतची युती अधिकृतपणे संपली आहे. त्यामुळे संसदेच्या कामकाजादरम्यान डीएमकेच्या खासदारांनी काँग्रेस सदस्यांच्या बाजूला बसणे आता योग्य ठरणार नाही. बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे डीएमके आता काँग्रेससोबत युतीमध्ये नाही. नवीन राजकीय समीकरणांनुसार डीएमके खासदारांसाठी स्वतंत्र किंवा योग्य अशा दुस-या जागेची सोय करावी. सध्याच्या आसन व्यवस्थेत बदल करणे हे बदलत्या राजकीय भूमिकांच्या दृष्टीने आवश्यक आहे. डीएमके आणि काँग्रेस हे गेल्या अनेक वर्षांपासून 'इंडिया' (I.N.D.I.A.) आघाडीचे महत्त्वाचे घटक होते. मात्र, कणीमोझी यांच्या या पत्रामुळे आता राष्ट्रीय राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. दक्षिण भारतात अत्यंत प्रभावी असलेल्या डीएमकेने काँग्रेसपासून लांब राहण्याचा निर्णय घेतल्याने आगामी काळातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे. लोकसभा अध्यक्ष या विनंतीवर काय निर्णय घेतात आणि डीएमकेच्या खासदारांना आता सभागृहात नक्की कुठे जागा मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडून दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन

■ राज्यात 92.09 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण
■ मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी 5.40 ने अधिक
■ कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक 97.62 टक्के

**मुंबई/प्रतिनिधी :** दहावीच्या निकालाचा क्षण हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु वारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल मंडळामार्फत जाहीर करण्यात आला असून यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले. या परीक्षेत ज्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावेत, शासन आपल्या पाठिशी आहे, असा विश्वास त्यांनी या विद्यार्थांना दिला.

मंत्री दादाजी भुसे यांनी ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रमाने आणि जिद्दीने या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणारे शिक्षक आणि माता-पिता यांचेही विशेष अभिनंदन केले.



विद्यार्थी हे महाराष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्या कर्तृत्वाने त्यांच्याबरोबरच राज्य आणि देश निश्चितच प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देताना एका परीक्षेचा निकाल तुमचे संपूर्ण आयुष्य किंवा तुमची बुद्धिमत्ता ठरवू शकत नाही. ही पहिली पायरी आहे. त्यामुळे खचून न जाता पुन्हा प्रयत्न करा. शासन तुमच्या पाठीशी आहे. फेरपरीक्षेची संधी उपलब्ध असल्याने तिचा लाभ घ्या, असेही त्यांनी म्हटले आहे.

**निकालाची वैशिष्ट्ये-** या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नउ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५५,०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १४,२०,४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.०९ इतकी आहे.



**मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी अधिक-** दहावीची परीक्षा दिलेल्या एकूण ८,२०,४२७ मुलांपैकी ७,३४,८१४ मुले (८९.५६ टक्के) तर एकूण ७,२२,०४५ मुलींपैकी ६,८५,६७२ मुली (९४.९६ टक्के) उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने अधिक आहे.

**कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक**

सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९७.६२ टक्के) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) आहे. इतर विभागांमध्ये कोल्हापूर विभागाचा निकाल ९५.४७ टक्के, मुंबई- ९४.९७, पुणे- ९४.२४, नाशिक- ९०.५३, अमरावती- ९०.५०, नागपूर- ८९.०७ तर लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के लागला आहे.

**श्रेणीनिहाय निकाल-**एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण २७.४१ टक्के, प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण ३१.२६ टक्के, द्वितीय श्रेणीमध्ये २४.६६ टक्के तर उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८.७५ टक्के इतके आहे.

**श्रेणीसुधार/ गुणसुधार योजना**

परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/ गुणसुधार योजनेअंतर्गत लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुनःश्च प्रविष्ट होता येईल. फेब्रु वारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होउन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेउन प्रविष्ट होणा-या) जून-जुलै २०२६, फेब्रु वारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७ च्या दहावीच्या परीक्षेस श्रेणीसुधार/ गुणसुधार साठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत देण्यात आली आहे.

# न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुलचा १००% निकाल



मेघा कुशवाह, देवांशी गव्हाळे, स्वरा गांडोळे, तेजस्वी वानखडे, ऋषीकेश लाडेकर, एंजल तायवाडे, विनीत हरळ, शौर्य खडसे



आस्था ढंगारे, जोत्सना यादव, देवांश लळे, रीद्धिशा तायडे, हर्षद टेंभरे, यशराज सावळकर, मृणाली देशमुख

**अमरावती/प्रतिनिधी :-** बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी एस. एस. सी. परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष अनिल आसलकर, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री आसलकर, वर्ग शिक्षिका कु. श्रेया चिखलकर तसेच सर्व शिक्षक वृंद यांना दिले, मेघा कुशवाह हिने ९४.८०% गुण मिळवून शाळेमधून प्रथम येण्याचा मान पटकाविला. द्वितीय क्रमांकावर देवांशी गव्हाळे हिने ९३.८०% गुण मिळविले तृतीय क्रमांकावर स्वरा गांडोळे ९३.६०% गुण मिळवले. तर तेजस्वी वानखडे हिने ९३% गुण मिळवून चतुर्थ क्रमांकावर आपली वर्णी लावली. शाळेतील ऋषीकेश लाडेकर ८९.८०%, एंजल तायवाडे ८९.६०%, विनीत हरळ ८८.६०%, शौर्य खडसे ८८.४०%, आस्था ढंगारे ८८.%, जोत्सना यादव ८७%, देवांश लळे ८६%, रीद्धिशा तायडे ८४.८०%, हर्षद टेंभरे ८३.४०%, यशराज सावळकर ८२.२०%, मृणाली देशमुख ८१.४०% यांनी कौतुकास्पद गुण मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला. संस्थाध्यक्ष अनिल आसलकर, मुख्याध्यापिका सौ. जयश्री अनिल आसलकर, तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी प्राविण्य प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करू न कौतुक केलो तसोच त्यांना उज्वल भवितव्याकरीता शुभेच्छा दिल्या

# साहिल प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी




अंबर मिश्रा, कार्तिकी खैरकर, आर्यन गजभिये, तन्मय उके, कु.तृप्ती पुल्लीवार, योगेश्वरी गडलिंग

**अमरावती/प्रतिनिधी -** बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित साहिल प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी एस. एस. सी. परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन करू न शाळेचे नाव उज्ज्वल केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष अनिल आसलकर, संचालिका जयश्री आसलकर, मुख्याध्यापिका सौ. सारिका माथने तसेच सर्व शिक्षक वृंद यांना दिले. चि.अंबर मिश्रा ह्याने ८४.६०% गुण मिळवून शाळेमधून प्रथम येण्याचा मान पटकाविला. द्वितीय क्रमांकावर कार्तिकी खैरकर हिने ८२.८०% गुण मिळविले तर तृतीय क्रमांकावर आर्यन गजभिये ह्याने ७८.८०% गुण मिळविले. शाळेतील तन्मय उके ७९.४०%, कु. तृप्ती पुल्लीवार ७७.२०%, . तसेच योगेश्वरी गडलिंग ७५.२०% यांनी क्रमशः प्राविण्य यादीमध्ये स्थान मिळवले. संस्थाध्यक्ष अनिल आसलकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करू न कौतुक केले तसेच त्यांना उज्वल भवितव्याकरीता शुभेच्छा दिल्या.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी पॉश कायद्याची कडक अंमलबजावणी करणे अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी :**कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळास आळा घालण्यासाठी प?श कायद्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे आणि तिची नोंद केंद्र शासनाच्या शी-बाक्स पोर्टलवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखावर ५० हजार रु पयांपर्यंत दंडाची तरतूद असून, पुनरावृत्ती झाल्यास दुप्पट दंड अथवा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे आयुक्त जगदिश मिनियार यांनी दिली आहे.



नाशिक येथील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर हे निर्देश जारी करण्यात आले असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील काही खाजगी आस्थापनांमध्ये समित्या स्थापन झाल्या असून, आस्थापनांनी तातडीने समित्या स्थापन कराव्यात अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच शी-बाक्स पोर्टलवर नोंदणी तातडीने करण्यात यावी, असे पत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. पाश एक्ट कायद्याअंतर्गत प्रत्येक समितीमध्ये वरिष्ठ महिला अध्यक्ष, किमान दोन कर्मचारी सदस्य आणि स्वयंसेवी संस्थेतील एक सदस्य असणे आवश्यक असून समितीतील किमान ५० टक्के सदस्य महिला असणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र आस्थापनांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन झाल्या आहेत का, त्यांची रचना कायद्यानुसार आहे का, तसेच शी-बाक्स पोर्टलवर नोंदणी झाली आहे का, याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि विविध विभागांच्या नोडल अधिका-यांच्या देण्यात आले आहेत. तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत लैंगिक छळ, पाठलाग, गुप्त चित्रण आणि स्त्रीच्या सन्मानाला धक्का पोहोचविणा-या कृत्यांवर फौजदारी कारवाई होउ शकते, याचीही स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. महिला व बाल विकास आयुक्त जगदीश मिनियार यांनी सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांनी पॉश अक्ट ची तात्काळ व प्रभावी अंमलबजावणी करू न महिलांसाठी सुरक्षित कार्यस्थळ निर्माण करण्याचे आवाहन केले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रुपयाचे अवमूल्यन

**गे**ल्या वर्षात रुपया ५ टक्क्यांनी घसरला; पण चालू वर्षाच्या पाच महिन्यांतच तो ५.६४ टक्क्यांनी घसरला आहे. आयात बिल वाढल्यामुळे देशातून बाहेर जाणारे परकीय चलन निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त होते. यातून चालू खात्यावरील तूट वाढते. परदेशी गुंतवणूकदार आपला पैसा भारतीय बाजारपेठेतून काढून घेण्यास सुरुवात करतात. यामुळे रुपयावरचा दबाव तीव्र होतो. सद्यःस्थितीत डॉलरच्या तुलनेत रुपया ९६ अंकांसमीप पोहोचल्यामुळे आयातदारांत चिंतेचे वातावरण आहे. अनेक भारतीय कंपन्यांनी परदेशातून डॉलरमध्ये कर्जे घेतली आहेत. रुपया घसरल्यामुळे या कंपन्यांवरील कर्जाचा डोंगर आणि व्याजाचा बोजा वाढून त्यांच्या ताळेबंदावर नकारात्मक परिणाम होतो. आयटी क्षेत्राला आणि निर्यातदारांना या घसरणीचा फायदा होत असला तरी सर्वसामान्यांना याच्या झळा महागाईच्या रूपाने सोसाव्या लागतात. इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील संघर्षाची कापूसकोंड्याची गोष्ट संपता संपत नसली तरी जाणाऱ्या दिवसागणिक जागतिक अर्थकारणावर होणारे त्याचे परिणाम चिंता वाढवत आहेत. विशेषतः कच्च्या तेलाच्या दरात झालेल्या वाढीचा फटका भारतासह अमेरिकेलाही बसला आहे. भारत एकूण गरजेच्या ८५ टक्के इंधनाची आयात करतो. यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर डॉलर खर्च करावे लागतात. २०२५ मध्ये वर्षभर तेलाच्या किमती कमी असूनही भारताला १२० ते १४० अब्ज डॉलर्स अदा करावे लागले. जागतिक बाजारात दरवाढ झाल्यास भारतीय कंपन्यांना तेल खरेदीसाठी अधिक डॉलर्सची गरज भासते.बँका आणि परकीय चलन बाजारात डॉलरची ही वाढलेली मागणी रुपयाचा पुरवठा वाढवते आणि रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत घसरते. चलन विनिमय दर हा कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक आरोग्याचा आरसा असतो. चलन जागतिक बाजारपेठेत किती मजबूत किंवा कमकुवत आहे, याचा थेट परिणाम त्या देशाच्या व्यापार, महागाई आणि गुंतवणुकीवर होतो.जागतिक बाजारात तेलाचे दर स्थिर असले तरी रुपयाच्या अवमूल्यनामुळे तेलाच्या किमतीत वाढ होते. याला 'इम्पोर्टेड इन्फ्लेशन' म्हणतात. यावर नियंत्रणासाठी रिझर्व्ह बँकेला व्याज दर वाढवावे लागतात. परिणामी देशांतर्गत कर्जे महाग होतात आणि अंतिमतः महागाई वाढते. अमेरिकेत महागाई रोखण्यासाठी व्याज दर वाढवले जातात, तेव्हा जगभरातील गुंतवणूकदार उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसा काढून घेतात आणि तो अमेरिकन रोखे बाजारात गुंतवतात. कारण तिथे त्यांना अधिक परतावा आणि सुरक्षितता मिळते. या प्रक्रियेत भारतातून मोठ्या प्रमाणावर डॉलर बाहेर गेल्यामुळे बाजारात त्याची टंचाई निर्माण होते आणि मागणी वाढल्याने डॉलर महाग होतो, तर रुपयाचे मूल्य कमी होते. यालाच 'कॅपिटल आऊटफ्लो' म्हणतात. चालू वर्षात परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून २१.२ अब्ज डॉलर काढून घेतले. गेल्या वर्षीही १८.९ अब्ज डॉलरची गुंतवणूक बाहेर गेली.भांडवली प्रवाहात येणारी ही तूट रुपयावर अधिक ताण निर्माण करते. वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी या स्थितीची केलेली मांडणी समर्पक आहे. रुपया कमकुवत होत आहे, असे म्हणण्यापेक्षा डॉलर प्रबळ होत आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था अधिक लवचिक राहिली आहे, असे त्या म्हणतात. माजी गव्हर्नर रघुराम राजन म्हणाले होते की, रुपयाचे अवमूल्यन नेहमीच वाईट नसते, परंतु त्याची गती महत्त्वाची आहे. ही घसरण अनियंत्रित राहिली, तर ती महागाई वाढवू शकते. देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्या मते, सद्यःस्थितीत भारताला कमकुवत रुपयाचा फायदा होऊ शकतो. कारण आपल्या उत्पादनांची जागतिक स्पर्धात्मकता वाढते. आयातीचा खर्च वाढला तरी, निव्वळ नफा-तोटा गुणोत्तर भारताच्या बाजूने आहे. आरबीआय वेळोवेळी रुपयाचे अवमूल्यन रोखण्यासाठी प्रयत्न करते. परंतु, काही वेळा जागतिक प्रवाह इतके प्रबळ असतात की, तिच्या हस्तक्षेपाला मर्यादा येतात. त्यामुळे रुपयाची घसरण थांबवण्यासाठी निर्यातवृद्धी अपरिहार्य आहे. केंद्र सरकार निर्यातीत वैविध्य आणण्याचा प्रयत्न करत आहे. नव्या बाजारपेठांचा शोध सुरू आहे. मुक्त व्यापार करार केले जात आहेत. याखेरीज तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवावा लागेल.जागतिक बाजारात अनिश्चितता असेपर्यंत गुंतवणूकदारांचा ओढा डॉलरसारख्या सुरक्षित चलनाकडेच राहील. कच्च्या तेलाच्या किमती स्थिर राहिल्या आणि विदेशी गुंतवणूकदारांचा ओघ भारतीय बाजारपेठेत परतला तर रुपया पुन्हा सावरू शकेल. तोपर्यंत महागाईचा चटका आणि गुंतवणुकीचे नियोजन हे भारतीयांसमोरचे मुख्य आव्हान असेल. ज्या देशाचे चलन अधिक स्वीकारार्ह आणि स्थिर असते, जगात त्या देशाचा प्रभाव अधिक असतो. त्यामुळे रुपयाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचे प्रयत्न केंद्र सरकार नियोजनबद्धरीत्या करत आहे. रिझर्व्ह बँकेने 'व्होस्ट्रो' खात्यांची संकल्पना राबवली. यामुळे परदेशी बँका भारतीय बँकांमध्ये रुपयाची खाती उघडून व्यापार करू शकतात. रशिया, श्रीलंका आणि आफ्रिकन देशांसोबत भारताने असे करार केलेत. भारताने 'मसाला बाँडस्'च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय बाजारात रुपयाची ओळख निर्माण केली. हे रोखे परदेशात विकले जातात; पण त्यांचे मूल्य रुपयांत असते. याशिवाय सिंगापूर, यूएई, नेपाळ आणि फ्रान्स यांनी यूपीआय यंत्रणा स्वीकारणे, हे रुपयाच्या जागतिक स्वीकृतीचेच लक्षण आहे. ब्रिक्स गटाचाही जोर स्वचलनातील व्यापारावर आहे. जगाला आता डॉलरला पर्याय हवा आहे आणि रुपया हा एक लोकशाहीवादी, स्थिर आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणून एक उत्तम पर्याय ठरू शकतो. ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे. यासाठी भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनावे लागेल. जगाला आवश्यक वस्तूंची स्पर्धात्मक किमतीत निर्मिती करावी लागेल. कारण आपण रुपयात व्यापार करतो, तेव्हा परदेशी देशांकडे मोठ्या प्रमाणावर रुपया जमा होतो; पण त्यांना भारताकडून खरेदी करण्यासाठी पुरेशा वस्तू उपलब्ध नसतील, तर त्या रुपयाचे काय करायचे, हा मोठा प्रश्न उभा राहतो. रशियाबाबत हेच घडले. भारताने केलेल्या तेल खरेदीनंतर त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर रुपया साठला; पण तो खर्च करण्यासाठी त्यांच्याकडे मर्यादित पर्याय होते. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढवून निर्यात प्रबळ करणे हेच रुपयाचा गडगडाट थांबवण्याचे मुख्य सूत्र आहे.

# शिक्षणाचा पाया खिळखिळा




**शिक्षण मंत्रालयाच्या संसदीय समितीने सादर केलेल्या अहवालात राज्यांच्या हलगर्जीपणावर बोट ठेवले आहे. देशात शिक्षकांची तब्बल १० लाख पदे रिक्त असणे आणि त्यातही साडेसात लाख पदे केवळ प्राथमिक स्तरावर असणे, ही भविष्यातील एका संकटाची नांदी आहे.**

**'शि**क्षण' हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा कणा असतो. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने गेल्या दशकांत भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' आणले. केवळ धोरण आणून केंद्र सरकार थांबले नाही, तर 'समग्र शिक्षा अभियाना'सारख्या योजनांच्या माध्यमातून राज्यांना हजारो कोटींचा निधीही उपलब्ध करून दिला; मात्र, केंद्राने दिलेल्या या आर्थिक ताकदीचा विनियोग नेमका कुठे होत आहे? केवळ केंद्राने पाठवलेला पैसा शाळांच्या भिंती रंगवण्यात खर्च होत आहे की विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या शिक्षकांवर या गंभीर प्रश्नांची उत्तरे शिक्षण मंत्रालयाच्या संसदीय समितीने मागितली आहेत. तसेच शिक्षण मंत्रालयाच्या संसदीय समितीने सादर केलेल्या अहवालात राज्यांच्या हलगर्जीपणावर बोट ठेवले आहे. देशात शिक्षकांची तब्बल १० लाख पदे रिक्त असणे आणि त्यातही साडेसात लाख पदे केवळ प्राथमिक स्तरावर असणे, ही भविष्यातील एका संकटाची नांदी आहे. संसदीय समितीने आपल्या ३४९ व्या आणि ३६३व्या अहवालात शिक्षकांच्या रिक्त पदांचा मुद्दा अत्यंत गांभीर्याने मांडला. धक्कादायक बाब अशी की, गेल्या वर्षी मार्चपर्यंत ही पदे भरण्याचे निर्देश देऊनही अनेक राज्य सरकारांनी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. उत्तर प्रदेशसारख्या राज्यात २.१७ लाख पदे रिक्त असणे, बिहारमध्ये १.९२ लाख पदे भरलीच न जाणे, हे त्या राज्यांच्या शैक्षणिक अनास्थेचे प्रतीक आहे. पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, झारखंड आणि अगदी हरियाणासारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या राज्यातही स्थिती वेगळी नाही.

केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी 'समग्र शिक्षा अभियाना' अंतर्गत ४१,२४९ कोटी रुपयांची भरघोस तरतूद केली. हा पैसा करदात्या नागरिकांचा आहे आणि तो देशाच्या भविष्यासाठी खर्च होणे अपेक्षित आहे. मात्र, वास्तवात चित्र अत्यंत खेदजनक आहे. केंद्र सरकार वारंवार सूचना देऊनही, संसदीय समितीने ३४९ व्या आणि ३६३ व्या अहवालात कालबद्ध भरतीचे निर्देश देऊनही अनेक राज्य सरकारे हात बांधून बसली आहेत. शिक्षकांच्या रिक्त पदाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. विविध सर्वेक्षणांमधून समोर आलेले वास्तव चिंताजनक आहे. पाचवीत शिकणाऱ्या मुलाला दुसरीची बेरीज-वजाबाकी करता येत नाही किंवा साधी दोन वाक्ये लिहिता येत नाहीत, हे आपल्या शिक्षण पद्धतीचे अपयश आहे. प्राथमिक शिक्षण हा मुलांच्या सर्वांगीण विकासाचा पाया असतो. जर पायाच कच्चा राहिला, तर त्यावर उभ्या राहणाऱ्या उच्च शिक्षणाच्या इमारतीचा डोलारा कधीही कोसळू शकतो. शिक्षकांची पदे रिक्त असल्याने उपलब्ध असलेल्या शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येतो. अनेक ठिकाणी एकाच शिक्षकाला चार-चार वर्ग सांभाळावे लागतात, अशा परिस्थितीत तो शिक्षक केवळ 'हजेरी' लावण्याचे काम करू शकतो, गुणवत्तेकडे लक्ष देणे त्याला अशक्य होते. हे चित्र बदलण्यासाठी केवळ घोषणा करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष मैदानावर उतरून भरती प्रक्रिया राबवणे गरजेचे आहे.


काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांच्या नेतृत्वाखालील शिक्षण मंत्रालयाच्या संसदीय समितीने आपल्या ३४९ व्या आणि ३६३ व्या अहवालात शिक्षकांची ही रिक्त पदे कालबद्ध पद्धतीने भरण्याची वारंवार शिफारस केली आहे; मात्र अनेक राज्ये याकडे दुर्लक्ष करीत असल्याने संसदीय समितीने आता एक अत्यंत कडक पवित्रा घेतला आहे. जोपर्यंत राज्ये शिक्षकांची रिक्त पदे भरत नाहीत, तोपर्यंत त्यांची 'समग्र शिक्षा' अंतर्गत मिळणारी आर्थिक मदत रोखली जावी, अशी शिफारस समितीने केली आहे. हा निर्णय प्रथमदर्शनी कठोर वाटत असला, तरी राज्यांना शिस्त लावण्यासाठी तो आवश्यक आहे. अनेकदा राज्ये केंद्राकडून मिळणारा निधी इतर कामांकडे वळवतात किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे तो पडून राहतो. आता जर थेट निधीवरच गदा आली, तर कदाचित राज्य सरकारे झोपेतून जागी होतील. 'समग्र शिक्षा' हा एक भागीदारीचा प्रकल्प आहे. यात केंद्राचा मोठा हिस्सा असतो. जर एखादे राज्य केंद्राकडून पैसे घेऊनही शिक्षकांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण करत नसेल, तर त्या राज्याच्या कारभाराचे पुनरावलोकन होणे आवश्यकच आहे.

शिक्षकांची भरती न होण्यामागे केवळ आर्थिक कारणे नसून राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हे मुख्य कारण आहे. अनेक राज्यांमध्ये भरती प्रक्रियेत होणारे घोटाळे, न्यायालयीन कचाट्यात अडकलेल्या भरती प्रक्रिया आणि नोकरशाहीची उदासीनता यामुळे तरुण पात्र असूनही बेरोजगार आहेत आणि शाळा शिक्षक असूनही ओस पडत आहेत. ही विसंगती दूर करणे ही काळाची गरज आहे. दिग्विजय सिंह यांच्या नेतृत्वाखालील समितीने पक्षभेद विसरून हा अहवाल दिला आहे, याचा अर्थ असा की ही समस्या गंभीर आहे आणि राज्यांनी केंद्र सरकारच्या 'मिशन मोड' कार्यपद्धतीशी जुळवून घेणे अनिवार्य आहे. शिक्षण ही गुंतवणूक आहे, खर्च नाही; हे भान राज्यकर्त्यांनी जितक्या लवकर ठेवले तितके चांगले. अन्यथा, 'शिक्षणाशिवाय समाज' ही भविष्यातील सर्वात मोठी शोकांतिका ठरेल. केंद्र सरकार भारतीय शिक्षण व्यवस्थेला जागतिक दर्जावर नेण्यासाठी कटिबद्ध आहे. मात्र, या प्रवासात राज्यांनी 'सहयोगी संघराज्यवादाच्या' भावनेने काम करणे अपेक्षित आहे. शिक्षकांची रिक्त पदे न भरणे हा केवळ राज्यांचा अंतर्गत विषय नसून तो राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे. केंद्र सरकारने आता घेतलेला कडक पवित्रा राज्यांना झोपेतून जागे करेल, अशी आशा आहे.

## पाच राज्यातील निकाल आणि जनमताचा कौल

**नु**कत्याच देशातील पाच राज्यातील निवडणुकांचे निकाल लागले.यामध्ये आसाम व पाँडिचेरी मध्ये जनतेने प्रस्थापितांना निवडून दिले आहे. तर केरळ व तामिळनाडू व पश्चिम बंगाल मध्ये बदल झाला आहे. केरळ मध्ये काँग्रेस प्रणित प्रणित आघाडी डाव्या आघाडीचा पराभव करून सत्तेत आली आहे. तामिळनाडू मध्ये सत्ताधारी द्रमुकचा पराभव झाला असून मुख्यमंत्री स्टॅलिन हे पराभूत झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पराभूत झाली असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला आहे. हे निकाल म्हणजे लोकांनाच असलेला कौल असेच म्हणावे लागेल तथापि पाचही राज्यांची परिस्थिती वेगळी आहे

**पश्चिम बंगाल**-या राज्यात गेली सुमारे १५ वर्षे ममता बॅनर्जी सत्तेवर होत्या. डाव्या पक्षांचा अभेद्य गड भेदून त्यांनी सत्ता मिळविली होती त्यांचा स्वभाव अहंकारी व एकप्रकारे केंद्राला सहकार्य करण्याचा नव्हता राज्यपालांबरोबर सतत संघर्ष करणे, केंद्राचे अनेक ठराव धुडकावून लावणे ही त्यांची खासियत होती. त्या विरोधी आघाडीत होत्या पण निवडणुका आल्या की त्या स्वतंत्रपणे लढत. त्यांची व तृणमूल काँग्रेस ची बंगालमध्ये एक प्रकारची दशहत होती. तेथील आतापर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये हिंसाचार उफाळून आला होता तेथे भाजपने यावेळी सर्व गोष्टींचा अभ्यास करून रणनीती ठरविली होती. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली अगदी बारीक सारीक गोष्टींचे व्यवस्थीत नियोजन केले होते. अर्थातच त्याचा फायदा भाजपाला झाल. त्यांचे २०७ उमेदवार निवडून आले. सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघात पराभव केला पश्चिम बंगालमध्ये भाजपाची लाट एवढी जबरदस्त होती की, तेथील २२ मंत्री निवडणुकीत पराभूत झाले. तेथे तृणमूलला केवळ ८० जगावर समाधान मानावे लागले.निवडणुकीचे निकाल जाहीर होताच ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा न देण्याचा निर्णय घोषित केला व सारे खापर निवडणूक आयोगावर फोडले. या राज्यातील निवडणूक निर्णयाविरुद्ध त्या न्यायालयात जाणार आहेत असे कळते. भाजपने प बंगालमध्ये गेल्या निवडणुकांपासूनच जोरदार संपर्क करून निवडणुकांची तयारी केली होती. आता राज्यपालांनी विधान सभा भंग केली असून नवीन विधानसभा अस्तित्वात येईल त्यामुळे ममता बॅनर्जींचा राजीनामा प्रकरण आता थांबले आहे.



**आसाम**-आसाम मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी तिसऱ्यांदा सत्तेवर आली आहे.भाजपने तेथे आसाम गण परिषद,युनायटेड पीपल्स पार्टी, लिबरल आणि बोडोलँड पीपल्स पार्टी याबरोबर युती केली होती. तेथे भाजप प्रणित आघाडीने १२६ पैकी १०३ जगावर बहुमत मिळविले बांगला देशी घुसखोर, आसामची अस्मिता, महिला सुरक्षा रोजगार या मुद्द्यावर निवडणूक लढविली होती. उद्योगांना कर्जे दिली. कामगारांच्या वेतनात वाढ केली. साहजिकच त्यांना युवक, महिला उधोजक अशा सर्व भरघोस पाठींबा मिळाला मोदी यांनी गेल्या पाच वर्षात आसाम मध्ये ३० पेक्षा अधिक वेळा तेथे भेट दिली होती त्यामुळे योजनांना गती आली मुख्यमंत्री म्हणून तेथे हिमंत बिश्व शर्मा यांची कामगिरी चांगली होती. आसाममध्ये काँग्रेस पक्षाच्या कोणत्याही मोठ्या नेत्याने आसामच्या निवडणुकांकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही.

**केरळ**-केरळमध्ये काँग्रेस प्रणित युडीएफ आघाडीने १४० जागांपैकी तब्बल १०२ जगावर विजय मिळविला आहे.केरळ मध्ये गेल्या दहा वर्षानंतर प्रथमच सत्तांतर झाले आहे गेल्या पाच वर्षातील डाव्यांच्या कारभारावर जनता नाराज होती. मुख्यमंतयाची एकाधिकारशाही, राज्याची आर्थिक स्थिती ही मुख्य करणे पराभवाची आहेत.शबरीमाला चोरी प्रकरण बेरोजगारी, आदिक करणे पराभवास कारणीभूत ठरली. भाजपने तीन जागा प्रथमच जिंकल्या व सहा जगावर दुसऱ्या क्रमांकाची मते मिळविली भाजपाने आपले बस्तान हळू हळू या राज्यात बसविले आहे राज्याच्या ऐकवीस मंत्रांपैकी अनेक मंत्री पराभूत झाले.

**तामिळनाडू**-तामिळनाडू प्रथमच द्रमुक व अद्रमुक हे पक्ष सत्तेबाहेर जाणार आहेत. द्रमुकचे मुख्यमंत्री स्टालिन यांचा पराभव झाला आहे. पहिल्याच प्रयत्नात टीव्हीकेचे विजयन यांचा मोठा विजय झाला आहे. एकूण २३४ जागांपैकी टीव्हीके पक्षाला १०७, तर द्रमुक व अद्रमुक यांना प्रत्येकी ६० व ४७ जागा आहेत. काँग्रेस पक्षाला पाच जागा आहेत इतर पक्षाला १५ जागा आहेत कोणाचीही आघाडी न करता टीव्हीकेनी हे यश मिळविले आहे आता विजयन १०७ संख्येसह कोणाला बरोबर घेऊन बहुमत सिद्ध करतात ते पाहायचे.

**पाँडिचेरी**-येथे सत्ताधारी एनडीए पुन्हा सत्तेवर आली आहे.एकूणच प बंगाल व तामीळ नाडू मध्ये प्रस्थापितांना धक्का बसला आहे तर केरळ मध्ये दहा वर्षांनी युडीएफ सत्तेवर आली आहे. पाँडिचेरी व आसाम मध्ये बीजेपीने आपला गड कायम राखला आहे.

**शांताराम वाघ**

## अकोला-तिरुपती एक्सप्रेस श्रद्धेचा मार्ग

महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशातून आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी धामपर्यंतचा प्रवास आता अधिक सोपा झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेल्या गाडी क्रमांक १७४२९/१७४३० अकोला-तिरुपती-अकोला साप्ताहिक एक्सप्रेसमुळे त प्रवाशांना, विशेषतः ज्येष्ठ भक्तां मोठा दिलासा मिळाला आहे. थे रेल्वेची दीर्घकाळापासूनची मागणं पूर्ण झाल्याने अकोला, वाशिम बुलढाणा आणि नांदेड जिल्ह्यांत लोकांमध्ये आनंदाचे वाता आहे.अकोला-तिरुपती एक्सप्रेस ही केवळ एक रेल्वे नाही, तर विदर्भातील लोकांच्या अनेक दशकांपासूनच्या मागणीचा परिणाम आहे. या गाडीने केवळ प्रवासच सोपा केला नाही,तर श्रद्धेलाही पंख दिले आहेत. प्रवाशांच्या भावना लक्षात घेऊन रेल्वे या गाडीची वारंवारता वाढवेल अशी अपेक्षा आहे, जेणेकरून प्रत्येक भक्ताला भगवान व्यंकटेश्वराचे सहज दर्शन घेता येईल.

**राजेश पी. कारिया**
राधे नगर,अकोला (महा)

## बहुमताशिवाय सत्ता नाही

लोकशाहीत अंतिम कसोटी ही आकड्यांचीच असते आणि ती सभागृहात सिद्ध करावीच लागते. भारतीय लोकशाहीचा इतिहास पाहिला तर माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांचे सरकार केवळ एका मताने पडले होते. हा प्रसंग आजही लोकशाहीतील बहुमताचे महत्त्व अधोरेखित करतो. त्यावेळी नियम वेगळे नव्हते आणि आजही वेगळे नाहीत. सत्ता कोणाचीही असो, संविधान सर्वांना समान निकष लावते.आज अनेक राज्यांमध्ये सत्ता स्थापनेबाबत दावे-प्रतिदावे सुरू असतात. मात्र केवळ 'आमच्याकडे समर्थन आहे' असे सांगून चालत नाही. त्यासाठी ठोस पुरावे आवश्यक असतात. जर बहुमताचा आकडा ११८ असेल, तर त्या ११८ आमदारांच्या सह्यांचे समर्थनपत्र राज्यपालांसमोर ठेवणे गरजेचे आहे. त्यानंतरच मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीसाठी आमंत्रण मिळू शकते. हीच संसदीय लोकशाहीची परंपरा आणि शिस्त आहे.आज देशातील मतदार क जागरूक झाला आहे. ाला केवळ सत्तासंघर्ष नको आहे, तर स्थिर आणि जबाबदार सरकार हवे आहे. त्यामुळे बहुमत सिद्ध रण्याची प्रक्रिया ही केवळ चारिकता नसून लोकशाहीवरील विश्वास टिकवण्याची हमी आहे.

**विरेंद्र सोनवणे**

## हिंदू मुलांमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव

सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला असता लक्षात येते की,अहिंदू समुदायातील मुले पहिल्या वर्गापासून धार्मिक शिक्षण घेत मोठी होतात आणि पुढे धर्माचे आचरण अधिक ठामपणे करतात.दुसरीकडे हिंदूंची मुले पहिल्या वर्गापासून धर्म शिकत नसल्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत अनेकदा धर्मापासून दूर गेलेली दिसतात. आजच्या काळात याची अनेक उदाहरणे आपल्या सभोवताली दिसून येतात. काही शाळांमध्ये प्रार्थना, संस्कारवर्ग किंवा धार्मिक शिक्षण यांना दुय्यम स्थान दिले जाते, तर दुसरीकडे मुलांना आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली केवळ करिअर केंद्रित बनवले जाते. परिणामी, मुलांमध्ये संस्कार, परंपरा आणि धर्माविषयीची जाणीव कमी होत चालली आहे.अनेक पालक स्वतः सांगतात की, मुलांना सण उत्सवांचा खरा अर्थ माहिती नाही.दिवाळी, रामनवमी, गुढीपाडवा यांसारख्या सणांचा आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजण्याऐवजी ते केवळ सुट्टी किंवा मनोरंजन म्हणून पाहिले जाते. काही ठिकाणी तर मुलांना देवपूजा, नामस्मरण किंवा साधनेबद्दल मूलभूत ज्ञानही नसते.

याउलट, ज्या कुटुंबांमध्ये किंवा संस्थांमध्ये लहानपणापासून संस्कारवर्ग, श्लोक, प्रार्थना, धर्मशिक्षण दिले जाते, त्या मुलांमध्ये आत्मविश्वास, नैतिकता आणि कर्तव्यभावना अधिक दृढ झालेली दिसते. अशा मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास अधिक संतुलित आणि मूल्याधारित होतो.म्हणूनच, हिंदू समाजाने या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आपल्या मुलांना लहानपणापासून धर्मशिक्षण देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. घरातूनच साधना, संस्कार आणि परंपरा यांची बीजे पेरली गेली, तरच पुढील पिढी धर्माभिमानी, सज्जन आणि आदर्श नागरिक म्हणून घडू शकेल.

**रमा देशमुख**

## ही विसंगती का?

एकीकडे केंद्र सरकार सूर्या घर योजना अमलात आणतात शिवाय त्यावर सबसिडी देतात आणि त्यामुळे ग्राहकांचा उत्साह वाढतो. परंतु त्या विरोधात राज्य सरकार या योजनेवर कर लावण्याचा विचार करतात, ही विसंगती कशी? कर लावल्यामुळे ग्राहकांचे मनोबल खचत आहे. सूर्य जेव्हा उष्णता विनामूल्य देत आहे, तेव्हा राज्य सरकारने अशा प्रकारचा कर लावणे हाच जनतेशी केलेला विश्वासघात नव्हे का? सूर्याघर योजनेमुळे विकासाच्या पथावर चालणारा भारत, राज्य सरकारच्या या नियमामुळे मागे तर येणार नाही ना? महाराष्ट्र विद्युत महावितरण संस्थेवर ओझे येऊ नये म्हणून काढलेल्या या सूर्याघर योजनेचे तीन तेरा राज्य सरकार तर वाजत नाही ना? कुठलीही योजना लागू करताना सामंजस्याने, जनतेशी संवाद साधून, विचारपूर्वक निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**डॉ. भारती हेडाऊ,**
यवतमाळ

# आकुंचन पावत असलेला 'मोकळा परीघ'

**मी** शेअरींग रिक्षात बसायचे सोडून दिले. तिन्ही जागी महिलाच असतील, असे दर वेळी जमत नाही. पुरुष अंग चोरायची, सावरुन बसायची तसदी अजिबात घेत नाहीत. हात, कोपर यांचा स्पर्श बाजूला बसलेल्या बाईच्या पोटाला, छातीला झाला तर बाईच शहारून अंग चोरते पण पुरुष आंबटशौक व्यवस्थित जोपासतात.मुद्दाम रेटून बसणे, ढूंगणाशी ढूंगण,मांडीशी मांडी घासली तरी गावचेच नाही असा चेहरा ठेवणे...या गोष्टींची दिवसेंदिवस शिसारी यायला लागली. शेवटी मीच शेअररिक्षाला टाटा बाय बाय केले.

रेल्वे प्लॅटफॉर्म बदलून दुसरीकडे जाताना गर्दीच्या वेळी अनेक स्त्रिया हातात टोकदार वस्तू ठेवतात. का ते सांगायला हवे? काही वर्षांपूर्वी असेच गर्दीच्या वेळेत माझ्या हाताच्या पंजात एक बोट सापडले. मी जीवाच्या कराराने ते बोट उलट्या बाजूला असे काही दाबून मोडून ठेवले की ज्याचे नाव ते! आत्तापर्यंतच्या एकूणएक घाणेरड्या स्पर्शांचा राग मी त्या बोटावर काढत होते. गर्दी तशीच हळूहळू हळूहळू पुढे सरकत होती. कोणा एका पुरुषाचा जोराने बोंब ठोकण्याचा आवाज,बोट सोडवून घ्यायची निष्फळ धडपड मला अत्यंत आसूरी आनंद देऊन जात होती.

फार तरुण होते तेव्हा बसमधून प्रवास करताना एकाने घाण स्पर्श केला,त्याला हातातल्या पर्सने झोडून काढायला त्याच्या मागे चवताळून धावले होते. मी चिडून ओरडतही होते. तो घाबरून पटापट पटापट बसमधून खाली उतरून गेला. माझ्या बरोबर मैत्रीणी होत्या,त्यांनी मला शांत करायचा प्रयत्न केला.

सशक्त आणि आदर्श सामाजिक व्यवस्थेत अन्याय करणाऱ्याला भीती असते. पण प्रत्यक्षात अशी आदर्श सामाजिक व्यवस्था कधीही अस्तित्वात नव्हती आणि नसेल. आपण व्हिक्टीम होणार नाही याची काळजी आपल्यालाच घ्यावी लागते. कितीही चुकीचे/अन्याय्य वाटत असले तरी दुर्दैवाने हेच वास्तव आहे.

हे सगळीकडे आहे. लहान सहान गोष्टींमधे आहे.उदाहरणार्थ, मेसेंजरमधे त्रासदायक मेसेज येतायत?- OK, तू (च) मेसेंजर वापरणे सोडून दे.जर ते करत नसशील तर उगीच (?) कटकट, तक्रार करत बसू नकोस.मेसेंजर काय आपोआप उघडणार का? तुलाच तसल्या मेसेजेस मधे गंमत येते...ही पुढची पायरी असते निष्कर्ष काढणाऱ्यांची.



संकटात सापडू नये म्हणून काळजी आपली आपण घ्यायची. ही जी काळजी घ्यायची आहे तिचा परिघ वाढत वाढत जाईल आणि स्त्रियांकरता असलेला 'मोकळा परीघ' मात्र अधिकाधिक आकुंचन पावत राहील.

गेल्या काही वर्षापासून स्त्रियांवरील बलात्कार अधिकाधिक क्रूर होत चालले आहेत. हे बलात्कार फक्त वासनापूर्ती पुरते मर्यादित नाहीत. हे वाढते क्रौर्य महिलांना, समाजाला घाबरवण्यासाठी, एक विशिष्ट संदेश पोहोचवण्यासाठी आहे.

परदेशी, परधर्मिय आक्रमक शत्रूला मानसिक दृष्ट्या नामोहरम करण्यासाठी शत्रुच्या स्त्रियांवर बळाचा वापर करत/करतात. हे तेच आहे.स्त्रिया, त्यांची प्रगती, स्त्री चे सक्षम स्वावलंबी होणे, लग्न करण्यास नकार, तिची आत्मनिर्भर निर्णय क्षमता.. या सगळ्या गोष्टी पुरुषप्रधान समाजाच्या शत्रू आहेत. स्त्रिया जितकी प्रगती करतील तितकी ही संकटे वाढतील, भयंकर होतील.

अगदी शंभर टक्के आदर्श सामाजिक व्यवस्था...अशी स्वप्नवत् दशा गाठणे कदाचित शक्य नसेल. पण त्या उत्तमाच्या जास्तीत जास्त जवळ जाण्यासाठी निकराने प्रयत्न करणे मात्र नक्कीच शक्य आहे.हे प्रयत्न करणे म्हणजे सुरक्षा यंत्रणांचा (पोलीस) यथोचित धाक, वचक अपराधी वृत्तीच्या लोकांना वाटणे.

न्यायव्यवस्थेची गुन्हेगारांवर जरब असणे. एक निडर, ठाम, निष्पक्ष आणि गुन्हेगाराप्रती भावनाशून्य भूमिका घेणारे सरकार हवे. सगळे पुरुष 'तसे' नाहीत .... या वाक्यातील 'तसे' नसणाऱ्या पुरुषांच्या सहभागाची अपेक्षा काही वेगळी अधोरेखित करायची गरज नाही. नाही का 'वेगळ्या' पुरुषांनो?

हे होईल तेव्हा होईल. पण तोपर्यंत स्वतःची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.ते कितीही अन्यायकारक आहेसे वाटले तरी करायला हवे. लहान मुलांना आणि मुलींना जपायला हवे.

जायचे तर पुढेच ... भले तीळभर मागे जावे लागेल,गहूभर पुढे जायचे म्हणजे जायचेच.

**-प्रज्ञा अहिरे**

## आई..

नका आसवांना रोखू माझ्या,
नका दुःख अडवू कुणी,
आईचा विरह माझ्या,
नेत्रातूनी पाझरता क्षणी...
आईचा वियोग माझ्या,
कसा साहू,सावरू आता,
जन्मदात्री चिरनिद्रेतूनी
न ये जागवता मला .....
हात हाती घेऊनी जेंव्हा,
स्पर्शातूनी बोलायची ती,
कळत नकळत तो स्पर्शही,
अश्रुतूनी ओघळतो गाली....
आजही नसा नसातूनी
वाहते,रक्त मज सांगते,
तिच्याच रक्तमासांमुळे
आयुष्य मज हे लाभले....
देह दिधला झोकून जरी
ऋण फिटावे तिचे कसे?
देवा,तुला प्रार्थना ही की,
आई हिच सदा हवी असे...

**ॲड.सुलभा गोगरकर,** अमरावती.

# स्काय डायव्हिंग 'बकेट लिस्ट' मधला टॉपर



**प्र**त्येकाची एक 'बकेट लिस्ट' असते आणि ते पूर्ण करण्याचे सामर्थ्य प्रत्येकाला मिळतेच. Paulo Coelho च Alchemist मधील या आशयाचे वाक्य जे नंतर शाहरुख चा डायलॉग म्हणून प्रसिद्ध झाले.

आमचे वरुडीच घर एकदम पारासमोर. समोर मारुतीच देऊळ, त्याच्या बाजूला जुनी शाळा आणि समोर एक मोठा ओटा .त्यावर एक निंबाचे झाड. हा मारुतीचा पार म्हणजे संध्याकाळी सर्वांनी एकत्र येण्याचे ठिकाण मुलांचे खेळणे, मोठ्यांच्या गप्पा इथेच होत. लग्न सुद्धा इथेच लागायची.शाळेजवळ नंतर पिंपळ लावला गेला,नंतर तो मोठा झाला परंतु पूर्वीपासून मोठ्या झाड फक्त कडू निंबाचे. मला लहानपणी एक स्वप्न सारख पडायच. मला पंख फुटलेत आणि मी पक्षासारखा लिंबाच्या त्या झाडावर या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारतोय आणि उडतोय.

काही वर्षानंतर हे स्वप्न पूर्ण बंद झाले आणि नंतर 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' पाहल्यानंतर ते स्वप्न परत परत पडायला लागले. पाकीजा, वहिदा रहमान चा खामोशी,अमर प्रेम, आनंद, पिंजरा ,शोले आणि नवीन चित्रपटांपैकी मुन्नाभाई एमबीबीएस, थ्री इडियट्स आणि 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' हे चित्रपट मी कितीही वेळा पाहू शकतो. तसेच मध्येच कुठूनही सुरुवात करून पाहू शकतो. जिंदगी ना मिलेगी दोबारा पाहिल्यानंतर हवेत उडण्याची इच्छा परत सुरु झाली आणि ते स्वप्न पुन्हा पडायला लागले. समुद्रावर पॅरासेलिंग केले परंतु त्यात स्वतःहून उडण्याचे पूर्ण समाधान नव्हते.न्युझीलॅंड टूर फायनल झाल्यानंतर या वेळेस 'स्काय डायव्हिंग' करायचे हा निश्चय केला.एडवेंचर स्पोर्ट्सची सुरुवात न्युझीलॅंड मध्ये झालेली आहे. जगातला पहिला बंजी जम्पिंग पॉईंट हा न्यूझीलंड मध्ये आहे.न्युझीलॅंड मधील एडव्हेंचर स्पोर्ट्स हे सर्वात सुरक्षित मानले जातात. केसरीचा टूर हा अत्यंत सुनियोजित असतो. क्वीन्सटाऊन ला चार दिवसाचा मुक्काम व त्यातला एक दिवस एडव्हेंचर स्पोर्टसाठी फ्री होता.

मी आणि माझी सून अंकिता आम्ही दोघांनी टूर गाईडकडे स्काय डायव्हिंग साठी नाव नोंदविले.परंतु त्या दिवशी नेमका रविवार होता आणि आमचे बुकिंग झाले नाही. इतक्या जवळ आलेली संधी सोडायची नव्हती. क्वीन्सटाऊन एक छोटेसे शहर आहे. मुख्य बाजारपेठ फिरण्यासाठी जास्तीत जास्त अर्धा तास लागतो. स्काय डायव्हिंग करण्याची तीव्र इच्छा होती. त्यामुळे शोध सुरू केला. मी भारतीयांसोबत किंवा स्टेज वरून भारतीय ॲक्सेंटमध्ये इंग्लिश fluent बोलू शकतो, परंतु न्युझीलॅंडचा एक्सेंट वेगळाच आहे. म्हणून मृण्मयीला सोबत घेतले.सुरक्षा सूचना पूर्ण समजून घेणे ही प्राथमिकता होती.ती इंग्लिश कम्युनिकेशनमध्ये एक्सपर्ट. पहिल्याच शॉपमध्ये बुकिंग मिळाले. रविवार दुपारी एक वाजताचा स्लॉट मिळाला. काउंटर क्लार्कने सुरक्षेसाठीच्या प्राथमिक सूचना दिल्या आणि दुसऱ्या दिवशी साडेबाराला हजर राहायला सांगितले. त्यापुर्वी एक फॉर्म ऑनलाईन भरायचा होता,त्यामध्ये तुम्हाला ब्लडप्रेशर, शुगर vertigo ,सांध्याचे ऑपरेशन झाले आहेत काय वगैरे अनेक प्रकारची माहिती होती. काहीही अघटीत झाले तर जबाबदारी माझी.मला ब्लड प्रेशर साधारणतः पंधरा वर्षांपासून आणि डायबिटीस पाच वर्षापासून आहे. हवेत उडी मारण्याची इच्छा जबरदस्त होते,मी सरळ मला काही नाही असे ऑप्शन निवडले.

सकाळी अर्धाच नाष्टा केला.इतक्या उंचावरून खाली यायचे म्हणजे पोट भरलेल नको.फ्लाईंग पॉईंट आमच्या हॉटेलपासून जवळच होता. तिथे गेल्यानंतर instructor ने परत सर्व सेफ्टी गाईडलाईन्स समजावून सांगितल्या. फ्लाईंग सूट, गॉगल,हॅट आणि ऑक्सिजन मास्क घातला. माझ्या tandem च नाव Linley.अत्यंत गमती गडी. तु पहिल्यांदाच स्काय डायव्हिंग करतो का हा पहिला प्रश्न, मी हो म्हटल्यानंतर माझी सुद्धा पहिलिच वेळ आहे म्हणाला. मी तितक्याच उत्स्फूर्तपणे त्याला म्हटले आपण दोघे एकत्र शिकूया, आणि Linley सोबत गट्टी जमली. विमानातून हवेत उडी मारताना तीन ऑप्शन्स असतात. ९०००,१२००० आणि १५०००फूट. मी १५००० निवडले होते. पंधरा हजार फुटावरून उडी मारल्यानंतर पहिले ६० सेकंद हा फ्री फॉल असतो. पॅराशुट उघडली जात नाही. Tandem म्हणजे गाईड ला प्रत्येक स्काय डायव्हर हा जोडलेला होता.अशा सात जोड्या बसतील अस छोटसे विमान होते. विमानात चढल्यानंतर बसायला बेंच.दोन्ही बाजूने पाय टाकून बसायचे. बसेपर्यंत मी स्वतः एकटा होतो. बसल्यानंतर Linley माझ्या मागे बसला आणि माझा फ्लाईंग सूट, त्याच्या फ्लाईंग सूट सोबत जोडून घेतला. विमान छोटेसे असल्यामुळे Runway नाही. गवतावरूनच start घेतला आणि 'टेक ऑफ' घेऊन विमान हवेत.संपूर्ण क्वीन्स टाऊन शहर नजरेखाली यायला लागले. विमान उंच डोंगरावरून फिरायला लागले. विमान जसे उंच जायला लागले तसे ऑक्सिजन दिला गेला, कारण एवढ्या उंचीवर ऑक्सिजन नसल्यामुळे उडी मारल्यानंतर त्रास होऊ शकतो.

आणि शेवटी ती वेळ आली.मी समोर Linley मागे जोडलेला आणि पंधरा हजार फुटावरून आम्ही विमानाच्या बाहेर उडी मारली. पहिले साठ सेकंद(एक मिनिट) या फ्री फॉल मध्ये अत्यंत विलक्षण अनुभव आला.शाळेत असताना गुरुत्वाकर्षण शिकलो होतो आणि ते अशाप्रकारे प्रत्यक्षरीत्या अनुभवायला मिळेल असे कधी वाटले नव्हते.अत्यंत वेगाने जमीनीकडे येत होतो अगोदर harness घट्ट धरून होतो नंतर मात्र हात हवेत पसरून दिले आणि प्रचंड वेगाने खाली पडण्याचा आनंद घेऊ लागलो. खाली पडण्याचा वेग किती असेल ते सांगता येणार नाही. खूप जास्त होता एवढे नक्की. व्हिडिओमध्ये पाहताना लक्षात आले की हवेच्या प्रेशर मुळे गाल वर गेलेले आहेत.भीती नव्हतीच आश्चर्य आणि अत्यानंद हा अनुभव घेतला तो कधीही विसरता येण्यासारखा नाही. एक मिनिटानंतर पॅराशुट उघडले आणि गती एकदम कमी झाली. निवांतपणे हवेत तरंगू लागलो. क्वीन्सटाउन आणी Wakatipu lake अद्भुत नजारा होता. Queenstown हे आपल्या नैनिताल सारख तलावाच्या आजूबाजूला काठावर वसलेले शहर. त्याच्या मागे उंच डोंगर. हे सर्व पाच- सात हजार फूट उंचावरून बघतांनाचा आनंद शब्दात वर्णन करणे अशक्य.



कन्सेंट फॉर्ममध्ये मला कुठलाही त्रास नाही हे लिहिलेले होते. त्यामुळे Linlay ने गिरक्या घ्यायला सुरुवात केली आणि आडव उलट अस हवेत खूप फिरवले.शेवटी लॅंडिंगची वेळ आली.मला काहीच करायचे नव्हते फक्त पाय पुढे पसरवून द्यायचे. Linley अगोदर गवतावर घासायला लागला त्यानंतर मी घासायला लागलो,अत्यंत सुरक्षित लॅंडिंग केले.उठून उभा राहण्याची इच्छा नव्हती. स्काय डायव्हिंग सुट तसाच अंगावर ठेवून इथे शांतपणे पडून राहावे असे वाटते होते.परंतु मागून लॅंडिंगला येणारे स्काय डायव्हर असल्यामुळे उठलो आणि परत निघालो.

एक मिनिटाच्या फ्री फॉल मध्ये कान पूर्णपणे बंद झाले होते तसे मनही सुन्न झाले होते. इतके दिवसांची इच्छा पूर्ण झाली होती आणि फक्त शांतपणे बसून राहायचे होते.एक जागा निवडली आणि दहा मिनिट काहीही न करता शांत बसलो आणि फ्री फॉल चा अनुभव मनात साठवत होतो.दुसरा दिवस क्वीन्सटाउन ते फॉक्स glacier प्रवासाचा होता.अत्यंत सुंदर रस्ता परंतु स्काय डायव्हिंगचा हॅंग ओव्हर काही उतरायला तयार नव्हता. संध्याकाळी फॉक्स glacier ला पोहोचलो.तिथले नितांत सुंदर आणि शांत वातावरण पाहून नवीन अनुभवाला तयार झालो.

**-अशोक खरात,** बुलडाणा

# महाराणा प्रतापःस्वाभिमान, शौर्य आणि राष्ट्रप्रेमाचे अमर प्रतीक

**भा**रतभूमी ही वीरांची, त्यागी महापुरुषांची आणि राष्ट्रभक्तांची भूमी म्हणून ओळखली जाते. या मातीत अनेक महान योद्ध्यांनी जन्म घेऊन आपल्या पराक्रमाने इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला आहे.अशाच महान योद्ध्यांमध्ये महाराणा प्रताप यांचे नाव अत्यंत अभिमानाने घेतले जाते. ते केवळ मेवाडचे राजे नव्हते,तर स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि मातृभूमीवरील निस्सीम प्रेम यांचे जिवंत प्रतीक होते. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्ष,त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० रोजी राजस्थानमधील कुंभलगड किल्ल्यावर झाला.त्यांचे वडील राणा उदयसिंह आणि आई जयवंताबाई होत्या. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये शौर्य, धाडस आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. त्यांना युद्धकला, तलवारबाजी, घोडेस्वारी आणि राज्यकारभाराचे शिक्षण देण्यात आले. ते उंच, बलवान आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे धनी होते.त्या काळात भारतात मुघल सम्राट अकबर याचे साम्राज्य विस्तारत होते. अनेक राजांनी अकबराची अधीनता स्वीकारली होती; परंतु महाराणा प्रताप यांनी आपल्या स्वाभिमानाशी कधीही तडजोड



केली नाही.त्यांनी ठामपणे ठरवले होते की, मेवाडची स्वतंत्रता कोणत्याही परिस्थितीत मुघलांच्या हाती जाणार नाही. म्हणूनच त्यांचे नाव इतिहासात स्वाभिमानाचे प्रतीक म्हणून अमर झाले.

१५७२ मध्ये महाराणा प्रताप मेवाडच्या सिंहासनावर आरूढ झाले. त्या वेळी मेवाडची परिस्थिती अत्यंत कठीण होती. चित्तोडगडावर मुघलांचे वर्चस्व होते आणि राज्य आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाले होते. तरीही महाराणा प्रताप यांनी हार मानली नाही. त्यांनी जंगलात, डोंगरदऱ्यांमध्ये राहूनही संघर्ष सुरू ठेवला. त्यांचा विश्वास होता की, 'राजपूताचे मस्तक कापले जाईल, पण ते कधीही झुकणार नाही.'

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वात प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीचे युद्ध होय. हे युद्ध १८ जून १५७६ रोजी महाराणा प्रताप आणि अकबराच्या सैन्यामध्ये झाले. अकबराच्या सैन्याचे नेतृत्व राजा मानसिंह करत होते. मुघल सैन्य संख्येने आणि साधनांनी अत्यंत बलाढ्य होते, तर महाराणा प्रताप यांच्याकडे मर्यादित सैन्य होते. तरीदेखील त्यांनी अद्वितीय पराक्रम गाजवला.हळदीघाटीचे युद्ध हे केवळ भूमीसाठी नव्हते, तर स्वाभिमान आणि स्वातंत्र्यासाठी होते. महाराणा प्रताप यांनी आपल्या शूर सैनिकांसह युद्धभूमीत असा पराक्रम दाखवला की, शत्रूंनाही त्यांच्या शौर्याची दाद द्यावी लागली. त्यांच्या प्रिय घोड्याने चेतक या युद्धात अतुलनीय धाडस दाखवले. गंभीर जखमी झाल्यानंतरही चेतकने आपल्या स्वामीला सुरक्षित ठिकाणी पोहोचवले आणि त्यानंतर प्राणत्याग केला. चेतकची स्वामीनिष्ठा आजही प्रत्येकाला प्रेरणा देते.

हळदीघाटीच्या युद्धानंतरही महाराणा प्रताप यांनी संघर्ष थांबवला नाही. त्यांनी अनेक वर्षे जंगलात राहून अत्यंत कठीण जीवन जगले. काही वेळा त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला गवताच्या भाकऱ्या खाऊन दिवस काढावे लागले; परंतु त्यांनी कधीही मुघलांची अधीनता स्वीकारली नाही. हा त्याग आणि स्वाभिमानाचा सर्वोच्च आदर्श आहे.महाराणा प्रताप यांच्या संघर्षामध्ये त्यांच्या सहकाऱ्यांचेही मोठे योगदान होते. विशेषतः भामाशाह यांचे नाव आदराने घेतले जाते. भामाशाह यांनी आपली संपूर्ण संपत्ती महाराणा प्रताप यांच्या चरणी अर्पण केली. त्यामुळे महाराणांनी पुन्हा सैन्य उभे केले आणि मेवाडचे अनेक प्रदेश पुन्हा जिंकले. ही घटना मैत्री, त्याग आणि राष्ट्रभक्तीचे अद्भुत उदाहरण आहे.

महाराणा प्रताप हे केवळ महान योद्धेच नव्हते, तर आदर्श शासकही होते. त्यांना आपल्या प्रजेबद्दल अत्यंत प्रेम होते. त्यांनी नेहमी जनतेच्या हिताला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांना समान सन्मान मिळत असे. त्यांचा उद्देश फक्त मेवाडची स्वतंत्रता आणि जनतेचे रक्षण हा होता.महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला अनेक महत्त्वपूर्ण शिकवणी देते. सर्वप्रथम शिकवण म्हणजे स्वाभिमान. त्यांनी कधीही आपल्या आत्मसन्मानाशी तडजोड केली नाही. दुसरी शिकवण म्हणजे संघर्षशीलता. जीवनात कितीही संकटे आली तरी संघर्ष सोडायचा नाही. तिसरी शिकवण म्हणजे राष्ट्रप्रेम. त्यांनी आपले संपूर्ण जीवन मातृभूमीच्या रक्षणासाठी अर्पण केले.

आजच्या तरुण पिढीसाठी महाराणा प्रताप हे महान प्रेरणास्थान आहेत. आधुनिक जीवनात लोक लहानसहान अडचणींनी खचून जातात; परंतु महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला धैर्य, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा संदेश देते. ते शिकवतात की, खरा वीर तोच असतो जो संकटांसमोर झुकत नाही, तर त्यांच्याशी लढतो.

भारतीय इतिहासात अनेक शूरवीर झाले; परंतु महाराणा प्रताप यांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते केवळ राजस्थानचे किंवा राजपूत समाजाचे नव्हेत, तर संपूर्ण भारताचे अभिमान आहेत. त्यांच्या शौर्यगाथा आजही लोकगीतांमध्ये, कवितांमध्ये आणि इतिहासाच्या पानांमध्ये जिवंत आहेत.महाराणा प्रताप यांचे निधन १९ जानेवारी १५९७ रोजी झाले; परंतु त्यांचे विचार, आदर्श आणि पराक्रम आजही भारतीयांच्या मनात जिवंत आहेत. त्यांचे नाव घेताच मनामध्ये शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना जागृत होते.

शेवटी असे म्हणता येईल की, महाराणा प्रताप हे भारतीय इतिहासातील असे अमर नायक आहेत, ज्यांनी सिद्ध केले की स्वातंत्र्य आणि स्वाभिमान हे कोणत्याही वैभवापेक्षा अधिक मौल्यवान असतात. त्यांचे जीवन हे केवळ इतिहासाचे पान नाही, तर प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ आहे. त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करून आपण राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांना आपल्या जीवनात जपले पाहिजे.

**-कुमार व्यंकटेश नेरकर**

लेखक,अमरावती

मो.७६२०६८७३०३

# शाही विवाहाचे डिजिटल पध्दतीने रेखाटन



**अ**मरावतीत शाही विवाहाचे चि.गौरव चि.सौ.का.शिवानी व श्री राम राजेश्वराचार्य माऊली सरकार यांचे प्रा.सारंग नागठाणे यांनी डिजिटल पध्दतीने चित्र रेखाटले. शहरात पार पडलेल्या एका भव्य आणि अनोख्या विवाह सोहळ्याने सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. श्री रुक्मिणी विदर्भ पीठ, कौंडण्यपूर येथील जगद्गुरु स्वामी श्री राम राजेश्वराचार्य माऊली सरकार यांच्या मानस कन्येचा विवाह अत्यंत शाही थाटामाटात संपन्न झाला. या विवाहाची सर्वात मोठी आकर्षण ठरली नवरीची हत्तीवरून निघालेली भव्य वरात. पारंपरिक संस्कृती आणि राजेशाही अंदाजाचा संगम पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या विवाहातील खास आकर्षण: नवरीची हत्तीवरून शाही एंट्री दक्षिण भारतातून आलेला खास बॅंड साधू-संतांची विशेष उपस्थिती भव्य सजावट आणि राजेशाही वातावरण.प्रा.सारंग नागठाणे हे अमरावती मधील सुप्रसिद्ध चित्रकार आहे त्यांनी आतापर्यंत १५०००पेक्षा जास्त डीजीटल पध्दतीने चित्र रेखाटले आहे व ते श्री जगद्गुरु स्वामी श्री राम राजेश्वराचार्य माऊली सरकार चे ५०ते ६०चित्र रेखाटले आहे.म्हणून माऊली सरकार यांनी प्रा सारंग नागठाणे यांना चित्र रेखाटन करण्यास सांगितले होते. तेव्हा त्यांनी रेखाटले व ते सर्वच चित्र सर्वांना आवडले.प्रा.सारंग नागठाणे यांनी सर्वांचे आभार मानले.

**सारंग नागठाणे**

अमरावती



# अकोल्यात पुन्हा ‘जुगार साम्राज्य’ सक्रिय?

## पोलिसांच्या कारवाईनंतरही टेबल-वरली अड्डे सुरुच; स्थानिक पोलिसांवर मूक संमतीचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला शहरात अवैध धंदे आणि जुगार अड्ड्यांनी पुन्हा डोके वर काढल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जुने शहर, खदान परिसरासह विविध भागांमध्ये टेबल आणि वरली जुगार अड्डे पुन्हा सुरू झाल्याची तक्रार थेट पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, याआधी अनेक ठिकाणांची माहिती देऊनही केवळ ‘कागदोपत्री कारवाई’ झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.*

तक्रारीनुसार, काही महिन्यांपूर्वी जुने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या टीनशेडमध्ये सुरू असलेल्या टेबल व वरली जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई केली होती. त्या कारवाईत ‘रहीम-भन्साळी’ नावाने ओळखल्या जाणाऱ्या अवैध धंद्याचे जाळे उद्ध्वस्त झाल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, काही दिवस शांत राहिल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अवैध व्यवहार सुरू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ‘कारवाई केवळ दिखाऊ होती का?’ असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

तक्रारीत स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवरही गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. अवैध धंदे पुन्हा सुरू होण्यासाठी स्थानिक स्तरावर मूक संमती मिळत असल्याचा आरोप करण्यात आला असून, पोलिसांच्या गस्त आणि गुप्त माहिती यंत्रणेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### ‘मोठे मासे’ मोकाट, किरकोळांवरच कारवाई?

तक्रारीत आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई करताना केवळ छोट्या पातळीवरील लोकांवरच गुन्हे दाखल केले जातात, तर मोठ्या आर्थिक उलाढाली करणाऱ्या अड्ड्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी तक्रारदारांची नावेच संबंधित अवैध धंदे चालविणाऱ्यांना सांगितली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. जर हा आरोप खरा असेल तर पोलिस यंत्रणेतील गोपनीयता आणि विश्वासार्हतेवरच मोठा प्रश्न निर्माण होणार आहे.

### ‘गुप्त कारवाई करा; स्थानिकांना कल्पना देऊ नका’

तक्रारदाराने पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट मागणी केली आहे की, संबंधित पोलिस स्टेशन किंवा स्थानिक गुन्हे शाखेला कोणतीही माहिती न देता थेट विशेष पथकाद्वारे छापेमारी करण्यात यावी. कारण, यापूर्वी दिलेल्या माहितीनंतरही बोरगाव, बर्शीटाकळी, पातूर, जुने शहर आणि खदान परिसरात केवळ औपचारिक कारवाया झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून दोषींवर कठोर विभागीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### कैलास टेकडी परिसरात गुंडांच्या संरक्षणाखाली जुगार?

खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत कैलास टेकडी स्मशानभूमीजवळ मोठा टेबल जुगार अड्डा सुरू असल्याचा धक्कादायक दावा तक्रारीत करण्यात आला आहे. या अड्ड्यावर गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वावर वाढला असून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगण्यात आले आहे. नागरिक भीतीपोटी तक्रार करण्यास धजावत नसल्याने हा प्रकार अधिक बळावत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. स्थानिकांच्या मते, रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या अड्ड्यांमुळे परिसरात संशयितांची गर्दी वाढली आहे. अनेक युवक या जुगाराच्या विळख्यात अडकत असून काही कुटुंबांचे आर्थिक संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा सुरू आहे.

### शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न

अकोल्यात वाढत्या अवैध धंद्यांमुळे गुन्हेगारी, दहशत आणि युवकांचे व्यसनाधीनतेकडे झुकणे या समस्या अधिक तीव्र होत असल्याचे सामाजिक संघटनांचे म्हणणे आहे. शहरात जुगार अड्डे खुलेआम सुरू राहत असतील आणि त्यावर प्रभावी कारवाई होत नसेल, तर सामान्य नागरिकांचा पोलिस यंत्रणेवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता पोलिस अधीक्षक या तक्रारीची कितपत गंभीर दखल घेतात आणि ‘जुगार माफियां’वर खरोखरच कठोर कारवाई होते का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## आस्की किड्स पब्लिक स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल



■ प्रतिनिधी | अकोला ■

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपत आस्की किड्स पब्लिक स्कूलने यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेत शाळेचे सर्व ८८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी तब्बल ३० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

यंदाच्या निकालात ८२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले असून ५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. विशेष म्हणजे गणित व विज्ञान विषयात २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. निरज काळे याने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष कौतुक मिळवले आहे.

शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये ईश्वरी वाघमारे, पूर्वा लांडे आणि विधाता गोठवाड यांनी प्रत्येकी ९६.४० टक्के गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. त्याखालोखाल चारुल गुप्ता व समर्थ गणोरकर यांनी ९५.८० टक्के, तर सृष्टी चेडे, रिद्धी पोटदुखे, मयूर तळोकर आणि निरज काळे यांनी प्रत्येकी ९५.४० टक्के गुण मिळवले. तसेच प्राची कुटे (९५), शौर्य ठाकूर (९४.८०), आयुष उकळकर (९४.२०), श्रावणी धर्मे (९४), परी फुलारी (९३.६०), वेदांश अग्रवाल (९३.४०), अथर्व भगत (९३.२०), अथर्व वनकर व गौरी कतोरे (९२.८०), आराध्य लाडोळे व कृष्णा सिरस्कार (९२.६०), भक्ती मेहरे (९२.२०), सोज्वळ भिसे (९१.८०), कृतिका टावरी व लावण्या टापरे (९१.६०), प्रसन्न कळसकर (९१.४०), सार्थक भगत (९०.८०), आयुष गणोरकर (९०.६०), शिवपाल बेठेकर (९०.४०), श्रावणी नागोलकर व पल्लवी तायडे (९०.२०) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.

या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष मिलिंद झाडे व नितीन झाडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्या नेहा झाडे, पर्यवेक्षक पवन चितोडे, वर्गशिक्षक रुपाली मानकर, मंजुषा हरणे, विशाल वाबळे तसेच विषय शिक्षक नवनाथ उबाळे, मनिष सरकटे, जमील शेख, गिरीश धानोरकर, पूजा भट्टी आणि संपूर्ण शिक्षकवृंदाला दिले.

## निष्ठावंत कार्यकर्त्यांना ‘छावा’कडून दुचाकी भेट

### लोकसहभागातून राबविला अनोखा गौरव उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक आणि विधायक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या ‘छावा’ संघटनेने आपल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अनोख्या पद्धतीने गौरव केला आहे. संघटनेच्या वतीने तीन कार्यकर्त्यांना नव्या कोऱ्या ‘शाईन’ दुचाकींचे वाटप करण्यात आले. स्थानिक शासकीय विश्रामगृहात झालेल्या कार्यक्रमात जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांच्या हस्ते गाड्यांच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.



बार्शीटाकळी तालुक्यातील आळंदा येथील संजय घटाळे, बाळापूर तालुक्यातील मांजरी येथील मंगेश साबळे आणि तेल्हारा तालुक्यातील वरूड बिहाडे येथील गणेश इंगळे या तिघांचा या उपक्रमांतर्गत सन्मान करण्यात आला. संघटनेने पुढील काळात आणखी दहा गाड्यांचे वाटप करण्याचा मानस व्यक्त केला असून, त्यातील पहिल्या टप्प्यात तीन गाड्या वितरित करण्यात आल्या.

या कार्यक्रमाला ‘छावा’चे मार्गदर्शक डॉ. संजय सरोदे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, रितेश मिर्झापुरे, अरविंद कपले, निवृत्ती वानखडे, अनिरुद्ध भाजीपाले, योगेश गोतमारे, डॉ. संतोष भिसे, श्याम कोल्हे, बाळासाहेब लाहोळे, मनोहर मांगटे पाटील, अमोल हिंगणे, निखिल श्रीनगर, बबलू वसु, श्याम कुलट, महेंद्र काळे, चेतन लोखंडे, परीक्षित बोचे, प्रवीण बाणेरकर, अरविंद बाणेरकर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. लोकसहभागातून जमा झालेल्या वर्गणीतून कोणताही अवास्तव खर्च न करता हा उपक्रम राबविण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. संघटनेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान राखण्यासाठी आणि त्यांच्या गरजा लक्षात घेऊन प्रातिनिधिक स्वरूपात गाड्यांचे वाटप करण्यात आल्याची माहिती जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांनी दिली.

समाजहिताचे विविध उपक्रम राबविण्यात ‘छावा’ संघटना जिल्ह्यात आघाडीवर असल्याचे सांगत रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून संघटनेने विशेष काम केले आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या रक्तदान शिबिराचा विक्रमही संघटनेच्या नावावर असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. भविष्यातही समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाहीही वाकोडे यांनी दिली.

## दहावी बोर्ड परीक्षेत जयश्री अग्रवालची ‘गगनभरारी’; ९८.२० टक्क्यांसह अकोल्यात अव्वल

■ प्रतिनिधी | अकोला ■



दहावी बोर्ड परीक्षेच्या निकालात अकोल्यातील माऊंट कारमेल शाळेची विद्यार्थिनी कुमारी जयश्री योगेश अग्रवाल हिने ९८.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान, गणित आणि संस्कृत या विषयांत शंभर पैकी शंभर गुण मिळवत तिने आपल्या गुणवत्तेची चमक दाखवून दिली. तिच्या या यशामुळे शाळेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जयश्रीने सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. तिच्या यशामागे कुटुंबीयांचे प्रोत्साहन व सकारात्मक शैक्षणिक वातावरण महत्त्वाचे ठरल्याची भावना तिने व्यक्त केली. विशेषतः आजोबा रूपचंद अग्रवाल, मोठेबाबा तसेच आई-वडिलांनी दिलेल्या पाठबळामुळे आत्मविश्वास वाढल्याचे तिने नमूद केले.

जयश्रीचा मोठा भाऊ तेजस अग्रवाल हा सध्या एमबीबीएसचे शिक्षण घेत असून त्याच्याकडूनही तिला सतत प्रेरणा मिळत असल्याचे सांगण्यात आले. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन समाजसेवा करण्याचे तिचे ध्येय आहे. दरम्यान, शाळेच्या मुख्याध्यापकांनी जयश्रीचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दहावीत विधी वैष्णव अव्वल; ९७.२० टक्क्यांनी यश; स्वामी विवेकानंद ज्ञानपीठाचा शंभर टक्के निकाल



**तेल्हारा :** सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित स्वामी विवेकानंद ज्ञानपीठाने यंदाही दहावीच्या निकालात शंभर टक्के यश संपादन केले. यामध्ये विधी प्रविण वैष्णव हिने ९७.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला असून तिच्यावर परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.ष्यंदाच्या एसएससी बोर्ड परीक्षेसाठी ज्ञानपीठातून एकूण ९७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ७२ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य श्रेणी मिळवली, तर २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शाळेच्या उज्ज्वल निकालामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. प्रथम क्रमांक मिळविणारी विधी वैष्णव ही अभ्यासू, जिद्दी व मेहनती विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते. ती शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण वैष्णव यांची कन्या आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि चिकाटीच्या बळावर तिने हे यश संपादन केल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. शाळेच्या संचालक मंडळ, प्राचार्या तसेच शिक्षकवृंदांनी विधीचे अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१४/२०२५ — प्रोसेस नं.२२१५/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ — दिनांक : १६/०२/२०२६

**अर्जदार :** १. शिल्पा अनुराग अवस्थी उर्फ शिल्पा विजयकुमार दुबे रा. मु. पो. पटेल कॉलनी, दशरा मैदान बडवाह, बरवाह, खारगावने, बरवाह मध्य प्रदेश. ४५१११५ २. अभिषेक विजयकुमार दुबे रा. शिशक नगर, अ/ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४५२००५ ३. सुमित विजयकुमार दुबे रा. एअरपोर्ट रोड, अ/ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४५२००५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मनोरमा विजयकुमार दुबे २. विजयकुमार मदनलाल दुबे
**पत्ता :-** रा. दोघेही रा. एअरपोर्ट रोड, अ/ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४५२००५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनोरमा विजयकुमार दुबे यांचे दि. २३/०९/२०१९ रोजी शासकीय कॅन्सर हॉस्पिटल इंदौर. मध्यप्रदेश. येथे निधन झाले आहे. तसेच मयत विजयकुमार मदनलाल दुबे यांचे दि. २०/०२/२०२० रोजी श्री. अरबिंदो इन्स्टिट्यूट मेडिकल सायन्स इंदौर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७२४/२०२६ — प्रोसेस नं.६४३५/२०२६
चौ.ता. ३०/०६/२०२६ — दिनांक : ०६/०५/२०२६

**अर्जदार :** १. इंदीरा रामदास लायबर रा. फ्लॅट क्र. ६०४, यशोधन-२, आत्माराम नगर, निलगीरी अपार्टमेंट जवळ, लोक ग्रामनेट, कल्याण, पो. काटेमानीवली, जि. ठाणे ह. मु. राष्ट्रीय शाळे जवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. संदिप रामदास लायबर रा. बि. के. नं. १६१४/ ३, सेक्शन ३२, स्टेशन रोड, उल्हास विद्यालय, उल्हास नगर ४, उल्हास नगर, ठाणे. ता. जि. ठाणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास भास्कर लायबर
**पत्ता :-** रा. राष्ट्रीय शाळे जवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास भास्कर लायबर यांचे दि. २४/०९/२०२५ रोजी राष्ट्रीय शाळा, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/ गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस
प्रोसेस नं.१६८०/२०२६ — दिनांक : ०६/०५/२०२६
Guardian Ward No. 215/2026 — Fix for: 10/06/2026

1) Manoj Vishwas Dahake, 2) Jay Manoj Dahake, Applicant No. 2 minor through natural guardian father i.e. applicant no. 1. Both R/o Ghusar, Tq. and Dist. Akola

Vrs --
Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी ‘जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला’ या न्यायालयामध्ये 'APPLICATION UNDER SECTION 8 (2) OF HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956 SECTION 29 OF GUARDIANS AND WARDS ACT, 1890 FOR GRANT OF PERMISSION FOR SELLING THE PROPERTY OF MINOR' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १०/०६/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १०/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ०६ माहे मे सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**अधिक्षक**
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७५५/२०२६ — प्रोसेस नं.६५१६/२०२६
चौ.ता. ०७/०७/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. संजय सोमा वणी २. अशोक सोमा वणी दोघेही रा. ग्रामीण बँक समोर, अंबिका नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रकाश सोमा वणी रा. बिरला राम मंदिर जवळ, बिरला सी कॉलनी, अकोला. पो. जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. ४. रमेश सोमा वणी रा. रूम नं. १२, अनंत कडू, चाळ न्यू-२, अशाळे पाडा, गणपती मंदिर जवळ, उल्हासनगर ४. ता. उल्हासनगर, जि. ठाणे. ५. रेखा अशोक पाटील, लग्नानंतरचे नाव रेखा सोमा वणी, लग्नाआधीचे नाव रा. मु पो सालवे, ता. धरणगाव, जि. जळगाव

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुळसाबाई सोमा वणी
**पत्ता :-** रा. ग्रामीण बँक समोर, अंबिका नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुळसाबाई सोमा वणी यांचे दि. १७/०५/२०२२ रोजी मलकापूर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३३/२०२६ — प्रोसेस नं.६३५३/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. अमृता जुलियास भिसे २. नॅन्सी राजू तुरणकर रा. फ्लॅट नं. ३०६, श्री साई अपार्टमेंट, लोहार समाज भवन जवळ, बाबुलखेडा, पार्वती नगर, ता. जि. नागपूर ४४००२७ ३. जॉस्पिन जुलियास भिसे ४. जस्टीन जुलियास भिसे अर्जदार क. १, ३ व ४ रा. ख्रिश्चन कॉलनी, खदान, चांदूर, पो. गांधीनगर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जुलियास जोसेफ भिसे
**पत्ता :-** रा. ख्रिश्चन कॉलनी, खदान, चांदूर, पो. गांधीनगर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जुलियास जोसेफ भिसे यांचे दि. १६/१०/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६५८/२०२६ — प्रोसेस नं.५६७२/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : २७/०४/२०२६

**अर्जदार :** १. प्रविणकुमार चिमनलाल जोगी २. घनश्याम चिमनलाल जोगी ३. नरेंद्र चिमनलाल जोगी ४. पारेश चिमनलाल जोगी ५. हितेश चिमनलाल जोगी ६. भारत चिमनलाल जोगी सर्व १,४,५,६ रा. आनंद भवन, आळशी प्लॉट, जोगी भवन जवळ, ता. जि. अकोला. ७. हरिष चिमनलाल जोगी ८. कामिनी विजय पाडिया रा. व्रज निवास, प्लॉट नं .१८, आमराईच्या मागे, व्यंकटेश नगर, सांगली, मिरज. ४१६४१६ ९. हेमनसुख चिमनलाल जोगी सर्व ३,७,९,२ रा. महाकाली अपार्टमेंट, खोलेश्वर रोड, परशुराम चौक, चौक, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चिमनलाल तुळशीदास जोगी
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. बी २, खोलेश्वर, महाकाली अपार्टमेंट, रजपूतपुरा, ता. जि. अकोला. मो. नं. ९७६५५११११०२

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चिमनलाल तुळशीदास जोगी यांचे दि. २९/१२/२०१४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६८/२०२६ — प्रोसेस नं.४९१/२०२६
चौ.ता. १२/०६/२०२६ — दिनांक : २०/०४/२०२६

**अर्जदार :** १. रामराव भिमराव देशमुख वय ७६ वर्ष धंदा- शेती रा. बेलुरा खुर्द ता. पातुर जि. अकोला २. विजया रमेशराव देशमुख वय ७१ वर्ष धंदा-शेती रा. इंजीनिअरींग कॉलेज जवळ, एस.बी.आय कॉलनी, रेगांव ता. शेगांव जि.बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : इंदिराबाई भिमराव देशमुख
**पत्ता :-** रा. बेलुरा खुर्द ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत इंदिराबाई भिमराव देशमुख यांचा मृत्यु दि. २६/०९/२००० रोजी बेलुरा खुर्द पातुर जि. अकोला येथे झाला. मयत यांचे पती नामे भिमराव जयंतराव देशमुख यांचा मृत्यु ६५ वर्षांपूर्वी झाला. मयत यांची मुलगी नामे रत्नमाला वसंतराव देशमुख हि दिनांक १३/०८/१९७२ रोजी लग्नानंतर ५ महिन्यांनी मयत झाली. रत्नमाला यांचे पती हे दिनांक २१/०७/१९९८ रोजी मयत झाले. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकील मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २८/०४/२०२६
पातुर
शिक्का
**आदेशानुसार.**
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाउस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे देशात आधुनिक जलवाहतुकीचा नवा अध्याय सुरू होणार-मुख्यमंत्री

## महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेच्या मे. हायके एएस यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई/जनमाध्यम**

मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीवर शाश्वत आणि पर्यावरणपूरक उपाय म्हणून मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्प देशात जलवाहतुकीचा नवा अध्याय लिहिणार आहे, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेतील सागरी तंत्रज्ञान कंपनी मे. हायके एएस यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. वर्षा निवासस्थानी झालेल्या या करारामुळे मुंबईच्या जलवाहतुकीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान मिळणार आहे.या वेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, परदेशी प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. आणि हायके एएसचे अध्यक्ष चार्ल्स पेम्ब्रोक बिर्स यांनी करारावर स्वाक्षरी केली.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दशकभरापासून राज्य शासन शाश्वत जलवाहतुकीच्या संकल्पनेवर सातत्याने काम करत आहे. मुंबईसारख्या महानगरात जलमार्गांचा प्रभावी वापर झाल्यास रस्त्यांवरील वाहतूक ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. भविष्यात जलवाहतूक ही केवळ पर्याय नव्हे तर गरज ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पांतर्गत विद्यमान २१ जलमार्गांवरील २४ टर्मिनलचे आधुनिकीकरण आणि नव्याने १० जलमार्गांसाठी २१ टर्मिनल उभारण्याचा प्रस्ताव आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जलयाने उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे.नॉर्वेतील मे. हायके एएस ही कंपनी शहरी जलवाहतुकीसाठी अत्याधुनिक जलयान निर्मितीमध्ये आघाडीवर असून महाराष्ट्रात जहाजबांधणी सुविधा उभारण्यासही ती इच्छुक आहे. या भागीदारीमुळे महाराष्ट्राच्या सागरी विकासाला नवी दिशा मिळणार आहे.मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पात सहभागी सर्व आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत भागीदारांचे कौतुक करत, मुंबई वॉटर मेट्रो ही संकल्पना पुढील काळात देशातील इतर शहरांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# शिक्षकांना मोठा दिलासा; जनगणनेच्या जबाबदारीमुळे प्रशिक्षणाचे वेळापत्रक बदलले

## नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण पुढे ढकलले

**वर्धा/पुणे जनमाध्यम**

राज्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीच्या नवीन अभ्यासक्रमासाठी होणारे तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण पुढे ढकलण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी याबाबत अधिकृत आदेश जारी केला आहे.

२०२७ च्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर १६ मे ते १४ जून या कालावधीत कुटुंब गणनेचे काम सुरू होणार आहे. या कामासाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची सेवा अधिग्रहित करण्यात येणार आहे. याच कालावधीत प्रशिक्षणाचे नियोजन झाल्याने शिक्षकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सातत्यपूर्ण पाठपुरावा करत प्रशिक्षण पुढे ढकलण्याची मागणी लावून धरली होती.

समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी राज्य पातळीवर हा मुद्दा सातत्याने मांडला. तसेच डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रालयीन बैठकीतही हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.या सर्व घडामोडीनंतर परिषद संचालक डॉ. हेमंत कुमार वसेकर यांनी जनगणनेच्या कामाला प्राधान्य देत प्रशिक्षणाचे वेळापत्रक पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. परिषद आणि जनगणना विभागाच्या संयुक्त बैठकीत यावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.या निर्णयामुळे शिक्षकांवरील दुहेरी जबाबदारीचा ताण कमी झाला असून जनगणनेचे काम अधिक सुरळीत पार पडण्यास मदत होणार आहे. राज्यातील हजारो शिक्षकांनी या निर्णयाचे स्वागत करत शासनाचे आभार मानले आहेत.

## संक्षिप्त

### कालव्याचे आऊटलेट नष्ट; पाच लाखांचे नुकसान

**वर्धा-** सेलू तालुक्यातील हिवरा बांगडा शेतशिवारात कालव्यालगतच्या सर्व्हिस रोडवर जेसीबीने खोदकाम करत दोन आऊटलेट नष्ट केल्याचा प्रकार उघडकीस आला. यामुळे पाटबंधारे विभागाचे सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले. पिपरा वितरिकेवरून जाणाऱ्या हिवरा मायनर कालव्यालगत सेलडोह येथील केशव धोंगडे यांच्या शेताजवळ खोदकाम करण्यात आले. या खोदकामामुळे काही शेतकऱ्यांचा रस्ताही बाधित झाला असल्याची माहिती पाटबंधारे विभागाला मिळाली. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता कालव्यालगतची संरचना नुकसानग्रस्त झाल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी तक्रारीवरून सिंदी (रेल्वे) पोलिसांनी केशव धोंगडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### मजुरीचे पैसे मागितल्याने मारहाण

**वर्धा-** कामाचे पैसे मागितल्याच्या कारणावरून मिस्त्री काम करणाऱ्या व्यक्तीस मारहाण करण्यात आल्याची घटना आलोडी येथील मिसाळ ले-आऊट परिसरात घडली. संजय बापूराव परतेकी (रा. आर्वीनाका, इंदिरानगर) यांनी याबाबत सेवाग्राम पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनुसार, संजय परतेकी यांनी मागील आठ दिवसांच्या कामाचे पैसे विनायक कोल्हे यांच्याकडे मागितले. यावरून आरोपींनी शिवीगाळ करत त्यांना मारहाण केली. घटनेनंतर जखमी अवस्थेत परतेकी यांनी पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी विनायक कोल्हे व अन्य एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सेवाग्राम पोलिस करीत आहेत.

### ब्रेकरवरून दुचाकी उसळली; इसम ठार

**वर्धा -** वर्धा नदी पुलावर ब्रेकरवरून दुचाकी उसळल्याने रस्त्यावर पडून एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. किसनाजी नानाजी पाल (रा. वाठोडा, ता. राळेगाव, जि. यवतमाळ) असे मृताचे नाव आहे. ते मित्रांसह लग्न समारंभासाठी डोमाघाट येथे आले होते. समारंभ आटोपल्यानंतर परत जात असताना कारेगावसमोरील वर्धा नदी पुलावर दुचाकी ब्रेकरवरून जोरात उसळली. यात किसनाजी पाल रस्त्यावर कोसळून गंभीर जखमी झाले. त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा केला. याप्रकरणी वडनेर पोलिसांनी नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### सिगारेटच्या पैशांवरून कॅन्टीन चालकाला मारहाण

**वर्धा -** शिरपूर (होरे) येथील पेट्रोलपंपाजवळ सिगारेटच्या पैशांवरून दोन जणांनी कॅन्टीन चालकाला मारहाण केल्याची घटना घडली. मोहम्मद नसिम अन्सारी हे त्यांच्या कॅन्टीनमध्ये असताना देवळी येथील प्रवीण कामडी व भिडी येथील प्रवीण लडके यांनी सिगारेट मागितली. अन्सारी यांनी आधी पैसे देण्यास सांगितल्याने दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत अन्सारी यांना मारहाण केली. घटनेनंतर जखमी अन्सारी यांनी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी प्रवीण कामडी व प्रवीण लडके या दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.




# गरीबांच्या लेकरांच्या हातातून शिक्षण हिरावण्याचा सरकारचा डाव

## परीक्षा फी वाढ, मराठी शाळा बंद, कार्पोरेट शिक्षणाच्या नादात ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला

**वर्धा/जनमाध्यम**

शेतकरी कर्जात मरतोय,मजूर पोटासाठी झिजतोय, आईबाप लेकरांना शिकवण्यासाठी आयुष्य वेचतायतष्ठ आणि सरकार मात्र गरीबांच्या मुलांच्या हातातून शिक्षणाचं पुस्तकच हिसकावून घेत आहे, अशा जळजळीत शब्दांत खासदार अमर काळे यांनी राज्य सरकारच्या शिक्षण धोरणावर आग ओकली आहे. परीक्षा शुल्क वाढ आणि मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर सरकारने कुऱ्हाड चालवल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय जाहीर केला. त्याचवेळी राज्यातील अनुदानित मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यमांच्या २१ शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यात वर्धा जिल्ह्यातील तब्बल ८ शाळांचा समावेश आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागात संतापाची लाट उसळली आहे.खा. अमर काळे यांनी सरकारवर थेट निशाणा साधताना म्हटले की, राज्यातील ६० टक्के विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. त्यांचे पालक शेतकरी, शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे कष्टकरी आहेत. आधीच महागाई, नापिकी, बेरोजगारी आणि शेतमालाला भाव नसल्याने जनता होरपळत आहे. अशा परिस्थितीत परीक्षा फी वाढवणे म्हणजे गरीबांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ढकलण्याचाच प्रकार आहे.



ते पुढे म्हणाले, शासन मोठमोठ्या घोषणा करतं शिक्षण सक्तीचं असल्याचं सांगतंष्ठ पण दुसऱ्या बाजूला मराठी शाळाच बंद करतं.

हा दुटप्पीपणा नाही तर काय, अमर काळे यांनी सरकारच्या धोरणावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका करत म्हटले की, इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांना भरमसाठ परवानग्या द्यायच्या आणि जिल्हा परिषदांच्या मराठी शाळांना पटसंख्येच्या नावाखाली बंद करायचं हे धोरण म्हणजे गरीबांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचं षडयंत्र आहे. त्यांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेचाही समाचार घेतला. ज्या बहिणींना डोक्यावर घेऊन सरकारने घोषणा केल्या, त्याच बहिणींना आज १५०० रुपयांसाठी उन्हात कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. २१०० रुपये तर दूरच, पण साधा न्यायही मिळत नाही, असा टोला त्यांनी लगावला. शिक्षणाचा अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून सर्वसामान्यांना दिला.

पण आजचे सरकार त्या अधिकारालाच महागाईच्या फासात अडकवत आहे, असा आरोप करत अमर काळे यांनी सरकारला सुनावले.गरीब कुटुंबांच्या वेदनांना हात घालत त्यांनी भावनिक शब्दांत सरकारला प्रश्न केला, गरीबांच्या मुलांना एवढं तरी शिकू द्या की, आई-वडिलांनी आणलेली मजुरीची रक्कम ते मोजू शकतील. शेतातील पिकाचा भाव समजू शकेल. किराणा दुकानातील हिशेब करता येईल.

एवढं शिक्षणही या सरकारला गरीबांना द्यायचं नाही का?तुमच्या कार्पोरेट शाळा चालवाष्ठ श्रीमंतांकडून लाखोंच्या फी घ्याष्ठ पण गावखेड्यातील मराठी शाळा बंद करून गरीबांच्या भविष्याचा गळा घोटू नका, असा इशारा देत खा. अमर काळे यांनी सरकारच्या शिक्षण धोरणाचा तीव्र निषेध नोंदवला.

# २१ हजारांत संसार कसा चालवायचा

## सरकारी योजनांसाठी उत्पन्न मर्यादा अडीच लाखांपर्यंत वाढविण्याची सजग दिव्यांग मंचाची मागणी

**सेलू/जनमाध्यम**

वाढती महागाई,घरभाडे, औषधोपचार आणि दैनंदिन खर्चाच्या वाढत्या ओझ्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले असताना शासकीय योजनांसाठी असलेली अत्यल्प उत्पन्न मर्यादा आता बदलण्याची गरज असल्याची मागणी जोर धरू लागली आहे. सजग दिव्यांग मंच, सेलूच्या वतीने राज्य सरकारकडे वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवून ती किमान अडीच लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री तथा देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री यांना लवकरच लेखी निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.सध्या काही शासकीय योजनांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा केवळ २१ हजार रुपये, तर निराधार योजनांसाठी ५० हजार रुपये इतकी आहे. मात्र आजच्या महागाईच्या काळात एवढ्या अल्प उत्पन्नात कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य असल्याचे मंचाने म्हटले आहे. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.तसेच उत्पन्न दाखल्याची वैधता केवळ एका वर्षापुरती असल्याने नागरिकांना दरवर्षी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. या प्रक्रियेमुळे वेळ आणि पैशांचा अपव्यय होत असून एजंटांची साखळीही वाढत असल्याचे मंचाने नमूद केले. त्यामुळे उत्पन्न दाखल्याची वैधता किमान तीन वर्षे करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.आधार संलग्न डिजिटल पडताळणी प्रणाली लागू केल्यास पारदर्शकता वाढेल आणि लाभार्थ्यांचा त्रास कमी होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.आजच्या काळात २१ हजार रुपयांत कुटुंब जगवणे निव्वळ अशक्य आहे. अशा जाचक अटी म्हणजे निराधारांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया सजग दिव्यांग मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.कोरोनानंतर अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती खालावली असून विशेषतः घरकाम करणाऱ्या महिला, दिव्यांग आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना



योजनांचा लाभ मिळवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनांचा पुनर्विचार करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# ७० दिवसांपूर्वीच्या अपघातप्रकरणा मृत युवकावरच गुन्हा

## स्टंटबाजी ठरली जीवघेणी

**वर्धा/जनमाध्यम**

हिंदी विश्व विद्यालयासमोरील उड्डाण पुलावर ७० दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या युवकावरच आता तपासाअंती रामनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सुरुवातीला या प्रकरणी मर्ग दाखल करण्यात आला होता. मात्र चौकशीत भरधाव वेगात स्टंटबाजी करत निष्काळजीपणे मोटारसायकल चालवल्याचे निष्पन्न झाल्याने मृत युवकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

मृत युवकाचे नाव भावेश महेश चांदेकर (वय १९, रा. वृंदावन नगर, केशव सिटी, सिंदी मेघे) असे आहे. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री तो मित्र पार्थ पलेरिया याच्यासोबत पेट्रोल भरून नागपूर महामार्गावरून जात होता. हिंदी विश्व विद्यालयासमोरील उड्डाण पुलावर भावेश हा एमएच-३१-एफएफ-६८४२ क्रमांकाची मोटारसायकल भरधाव वेगात चालवत स्टंट करत होता. त्यावेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मोटारसायकल पुलावरील डिव्हायडरवर आदळली.अपघातानंतर मित्रांनी त्याला सावंगी मेघे रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर सुरुवातीला मर्ग दाखल करण्यात आला होता. तब्बल पंधरा दिवसांच्या तपासानंतर साक्षीदारांचे जबाब, घटनास्थळ पंचनामा व अन्य पुरावे तपासून मृतक भावेश चांदेकर याच्यावरच कलम २८१, १०६(१) बीएनएस तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अजय भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राहुल इंगोले, व बंडू महाकाळकर करीत आहेत.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर P0783411 वरील माझे ISHRAT FATMA MOHAMMED SADIQUE PATEL असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील ISHRAT FATIMA FAIZAN DOSHI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : हवालदारपुरा ठाकरे मार्केट,वर्धा 442001**


### आज सावंगी येथील विविध विकास कामांचे लोकार्पण

**वर्धा-** पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सावंगी मेघे येथील विविध विकास कामांचे तसेच ग्राम पंचायत भवन व आपले सरकार सेवा केंद्राचे लोकार्पण आज शनिवार दि. ९ मे रोजी सकाळी ८.३० वाजता होणार आहे.सावंगी मेघे ग्रापं जिल्ह्यातील एक मोठी ग्राम पंचायत आहे. सावंगी परिसरातील नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सतत पुछाकर घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रापं क्षेत्रातील विविध विकास कामांसाठी तीन कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला होता. यामध्ये ग्रामपंचायत भवन, आपले सरकार केंद्र व नागरी सुविधांशी संबंधित कामे करण्यात आली आहे. या कामांचे लोकार्पण शनिवारी होणार आहे. ग्रामपंचायत परिसरात आयोजित कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आव्हान माजी सरपंच मिनाक्षी जिंदे व उपसरपंच विलास दौड यांनी केले आहे.

# शेतकऱ्याच्या घरात उरले फक्त हुंदके  हेलोंडे यांच्यापुढे आई-पत्नीचा अश्रूंचा बांध फुटला

## आत्महत्याग्रस्त डहाके कुटुंबाला निलेश हेलोंडे यांची सांत्वना भेट

**साहूर/जनमाध्यम**

कर्जबाजारीपणा, आर्थिक विवंचना आणि सततच्या संकटांनी होरपळलेल्या शेतकऱ्याच्या घरात आता फक्त वेदना, हुंदके आणि उपासमारीचे सावट उरले आहे. सावंगा (पुनर्वसन) येथील शेतकरी नंदू वासुदेवराव डहाके यांनी मागील वर्षी आर्थिक चणचणीला कंटाळून आत्महत्या केली होती. त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबाची व्यथा ऐकताना वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त निलेश हेलोडें यांचेही मन गहिवरून आले.



निलेश हेलोंडे यांनी डहाके कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत त्यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलण्यासह सर्वतोपरी शासकीय व आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. मात्र यावेळी घरातील परिस्थिती सांगताना मृतकाची पत्नी आणि वृद्ध आई यांचा अश्रूंचा बांध फुटला.

घरचा कर्ताच गेलाष्ठ आता आमचं कसं होणार असा हृदय पिळवटून टाकणारा प्रश्न त्यांनी हेलोंडे यांच्यापुढे केला. डहाके कुटुंबाची अवस्था अत्यंत हलाखीची असून घरात अक्षरशः अठराविश्व दारिद्र्य असल्याचे चित्र आहे. नंदू डहाके हेच घराचे आधारस्तंभ होते. त्यांच्या मृत्यूनंतर वृद्ध आई, पत्नी, लहान भाऊ आणि दोन चिमुकल्या मुलांवर उपासमारीची वेळ आली आहे.

घरात कमावणारा हात निघून गेल्याने संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे.कुटुंबाची व्यथा ऐकताना उपस्थित अधिकारी आणि ग्रामस्थांच्याही डोळ्यांत अश्रू तरळले.

हेलोंडे यांनी तात्काळ कृषी, महसूल आणि महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना या कुटुंबाला शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याच्या सूचना दिल्या.

'सानुग्रह मदतीने नुकसान भरून निघणार नाही, पण शासन कुटुंबाच्या पाठीशी उभे राहील, असा दिलासाही त्यांनी दिला. यावेळी तहसीलदार ऐश्वर्या गिरी, गटविकास अधिकारी पी. जी. परांजपे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तृप्ती चव्हाण, तालुका कृषी अधिकारी शरद वरणकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कांबळी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हेलोंडे यांनी दाखवलेली आत्मीयता आणि आपुलकी ही माणुसकीचा जिवंत परिचय असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. शासनाची मदत किती मिळेल माहिती नाही, पण संकटाच्या वेळी कुणीतरी आधार देण्यासाठी उभं राहिलं, हेच आमच्यासाठी मोठें केल अशा शब्दांत डहाके कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली.


### नावात बदल

माझे पूर्वी SHANO PARVEEN MOHAMMAD YOUSUF असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील SHAHIN EKBAL TAGALE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- नुरी मस्जिद भिसे लेआऊट स्टेशन फैल वर्धा 442001**

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर K8528646 वरील माझे MAHAMUD KARIM SHEIKH असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व बँक खात्या वरील MAHEMUD KARIM SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- मदिना मस्जिद आर्वी नाका,वर्धा 442001**

### नावात बदल

माझे पूर्वी NIKHAT BANO SHAIKH JAMIL असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NIKHAT FAIM SHEIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- मदिना मस्जिद जवळ आर्वी नाका वर्धा 442001**

### नावात बदल

माझे पूर्वी SHUBHA ATUL AGADE असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SUSHMA ATUL AGADE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- मोहनी नगर वर्धा 442001**



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# धामणगावच्या तरुणाचा बैतूलमध्ये अपघातात मृत्यू

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- तालुक्यातील तरुण बैतूल जिल्ह्यातील चिंचोली येथे आपल्या सासुरवाडीला गेला असता तिथे अपघातात त्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.डीजेचे सामान घेण्यासाठी तो घरून बाहेर निघाला आणि परत येताना ही घटना घडली. या अपघातात त्याचा मुलगा थोडक्यात बचावला. राहुल रमेश रॉय (वय ४०) असे मृतकाचे नाव आहे. माहिती नुसार राहुल रॉय आपल्या दुचाकीने पत्नी आणि दोन्ही मुलांना घेऊन धामणगाव वरून सासुरवाडी चिंचोलीला गेला होता. सासुरवाडी पोहोचल्यानंतर तो डीजेचा सामान घेण्यासाठी पुन्हा बैतूल जाण्यासाठी निघाला. पत्नीने त्याला दुचाकी ऐवजी फोर व्हीलर ने जाण्याचे म्हटले होते पण त्याने ऐकले नाही आणि आपल्या १३ वर्षाच्या मुलाला घेऊन तो दुचाकीने बैतुलकडे रवाना झाला. बैतूल मधून साहित्य घेऊन तो पुन्हा चिंचोली कडे येत होता. त्यावेळी मागून येणाऱ्या एका दुचाकी स्वाराने त्याच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. यामध्ये राहुलचे वाहना वरील नियंत्रण बिघडले आणि त्याची दुचाकी एका तिसऱ्या दुचाकीला भिडली. या अपघातात राहुलच्या डोक्याला जबर मार लागला.

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१४७/२०२६ ने.ता. २०.०६.२०२६

**अर्जदार :** १. हरीदास केशव शेटे,
२. घनश्याम केशवराव शेटे, दोन्ही रा.लोणी टा. ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. रघुनाथ केशवराव शेटे, रा.प्रोफेसर कॉलनी, नवी वस्ती अमदापूर,जि.अमरावती
४. शंकर केशवराव शेटे, रा.वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. द्रोपदी रंगराव हिरोडे, रा.वाटपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
६. मनकर्णा सुधाकर भिवरकर, रा.वाटपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **वेणुबाई केशवराव शेटे** यांचा मृत्यू दि.**२२.०३.२०१२** रोजी वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची पती नामे **केशव बळीराम शेटे** यांचा मृत्यू दि.**१३.०५.२०१३** रोजी वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ते ४ ही मुले असून अर्जदार नं.५ व ६ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८२१/२०२६
**कमल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kamal Devidasrao Bobade, Age 80 Yrs. Occu.: Household
2. Mr.Sharad Devidasrao Bobade, Age 47 Yrs. Occu.: Labour
3. Mr.Rajesh Devidasrao Bobade, Age 44 Yrs. Occu.: Labour
R/o Rashtrasant Colony, Yawali Shahid, Tq. Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देविदासराव गोविंद बोबडे** हे दिनांक 01.04.2009 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८९७/२०२६
**श्रीमती मिनाक्षी अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. मिनाक्षी विकास पवार, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम.
रा.प्लॉट नं.१८, सिध्देश्श्वर नगर, रिंग रोड, खरबी, हनुमान नगर,नागपूर
२. राकेश रामासा सोलापुरकर, वय ५५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. वैशाली संतोष पवार, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जोगळेकर प्लॉट, रुक्मिणी नगर, अमरावती
४. आनंद रामासा सोलापुरकर, वय ४६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
अर्जदार नं.२ व ४ रा.दीप नगर नं.२, दस्तुर नगर रोड, फरशी नाका जवळ रुक्मिणी नगर अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामासा विठ्ठलसा सोलापुरकर** यांचे दिनांक **११.०३.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. व मयत **आशा रामासा सोलापुरकर** ही दिनांक **१८.०२.२०२१ रोजी** अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. **अर्जदार मिनाक्षी अधिक तीन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिनाक्षी अधिक तीन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८६३/२०२६
**दाऊद खान -वि- निरंक**
पुढील ता.०७.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Daud Khan Amad Khan
Age 50 Yrs. Occu.: Labour
R/o Near Sriji Pan Centre, Alim Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अमिद खान सरदार खान आणि रशिदाबी अमद खान** हे अनुकमे दिनांक 13.12.2009 व 19.10.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **दाऊद खॉं विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दाऊद खॉं विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**मा. दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.११५/२०२६ ने.ता. ११.०६.२०२६

**अर्जदार :** १. देवेन्द्र झोलबाजी लोणकर
रा.सार्सी,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **झोलबाजी रायभानजी लोणकर** यांचा मृत्यू दि.**११.११.१९९०** रोजी सार्सी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे **ललीताबाई झोलबाजी लोणकर** यांचा मृत्यू दिनांक **१३.१२.२००८ मध्ये** सार्सी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **१७ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,**
**जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२१९/२०२६ ने.ता.२०.०६.२०२६

**अर्जदार :** १. मेहरुणबी शेख युसूफ, वय ७८ धंदा - घरकाम
२. मोहम्मद नासीर मोहम्मद युसुफ, वय ४७ धंदा - मजुरी
दोन्ही रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. कमरुन्निसा मोहम्मद अय्यूब, वय ५७ धंदा - घरकाम
रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. शकिला बानो मोहम्मद अय्यूब, वय ५५ धंदा - घरकाम
रा.शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक मोहम्मद युसूफ शेख जंगु** यांचा मृत्यू दिनांक **०४.०९.२०२५** रोजी घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२१९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि. ०५.०५.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.निलेश शंकर डामरे** पत्ता मेहराबपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/26097 जुना मालमत्ता क्र.३००००११० नझुल शिट क्र.... प्लॉट नं..... ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री/श्रीमती/कु.नझुल जागा भोगवटदार **श्री.निलेश शंकर डामरे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री/श्रीमती/कु. १) **श्री.निलेश शंकर डामरे, २) अनिल शंकर डामरे** नावाने फेरफार घेण्याकरीता इमल विकीपत्र (नोटरी) व प्रतिज्ञापत्र या कार्यालयामध्ये दिनांक ०८.०५.२०२६ रोजी अर्ज सादर केलाआहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
**पुर्वेस** - सहदेव पोटे यांचे घर
**पश्चिमेस** - भोपळे यांचे घर
**दक्षिणेस** - खुला प्लॉट व दाभाडे यांचे घर
**उत्तरेस** - दिनेश भोंडे व रमाबाई वानखडे यांचे घर

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८६५/२०२६
**बतुल अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.१६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Batul Bi Abdul Rauf, Age 72 Yrs. Occu.: Housewife
R/o Habib Nagar No.1, Near Akil Kirana Dukan, Amravati.
2. Abdul Rauf Abdul Gafur Shaikh, Age 75 Yrs. Occu.: Nil
R/o House No.31 b Paradise Colony, Near Unique School, VMV Amt.
3. Shamim Bano Abdul Shafique, Age 41 Yrs. Occu.: Housewife
4. Abdul Shoeb Abdul Shafique, Age 23 Yrs. Occu.: Labour
5. Abdul Shahid Abdul Shafique, Age 20 Yrs. Occu.: Labour
6. Abdul Sohel Abdul Shafique,
Appli.No.3,4,5,6 R/o Nea Akil Kirana Habib Nagar No.1,Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Abdul Shafique Abdul Rauf हे दिनांक 26.07.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Batul Bi Abdul Rauf + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Batul Bi Abdul Rauf + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१३५/२०२६ ने.ता. २२.०६.२०२६

**अर्जदार :** १. कमलाबाई दौलत भेंडे, रा.निमसवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** १. संगीता प्रमोद भेंडे, रा.निमसवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. मयुरी विशाल किटुकले, रा.गोपालपूर, पो.नांदुरा, ता.जि.अमरावती
३. सोनू अजय भडके, रा.सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी मयत **प्रमोद दौलतराव भेंडे** यांचा मृत्यू दि.**१३.१०.२०२४** रोजी शेलुगुंड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही आई आहे. गैरअर्जदार नं.२ व ३ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.७२/२०२६ ने.ता. ०८.०६.२०२६

**अर्जदार :** १. उर्मिला रामकृष्ण फुके, रा.रोहणा, पो.वेणी गणेशपूर,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. अनिल रामकृष्ण फुके, रा.रोहणा, पो.वेणी गणेशपूर,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. सुनिता रामकृष्ण फुके, रा.रोहणा, पो.वेणी गणेशपूर,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. वंदना संजय करडे, रा.कारली, पो.कारंजा लाड, जि.वाशिम
५. नलिनी कांतेश्श्वर बोडखे, रा.वार्ड नं.१ येणस,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **रामकृष्ण नारायण फुके** यांचा मृत्यू दि.**१९.०१.२०२०** रोजी त्यांचे राहते घरी रोहणा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.३ ते ५ ह्या मुली असून अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०७ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,**
**जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१६७/२०२६ ने.ता.०८.०५.२०२६

**अर्जदार :** १. सुरेखा राजेंद्र मोगरे, वय ५० धंदा - घरकाम
२. तिलोत्तमा आकाश खिचरे, वय २६ धंदा - घरकाम
३. जयश्री शाम परिहार वय २५ धंदा - घरकाम
४. कांचन राजेंद्र मागरे, वय २३ धंदा - घरकाम
५. वैशाली राजेंद्र मोगरे, वय २१ धंदा - घरकाम
६. क्रिश राजेंद्र मोगरे, वय १९ वर्षे, व्यवसाय - मजुरी
अर्जदार नं.१, ४, ५ व ६ रा.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.पेंशनपुरा परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक राजेंद्र श्रीकिसन मोगरे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०१.२००८** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१६७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि. **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

प्रो.क्र.४६२/२०२६

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १५१/२०२६ ने.ता.०९.०६.२०२६

**अर्जदार :**
1. Ranjana Jaikishan Thorat, Age 50 Yrs. Occu.: Household
2. Dipali Jaikishan Thorat, Age 34 Yrs. Occu.: Service
R/o Plot No.36, TukaramNagar, Juna Kamptee Road, Nagpur, Tq. Dist. Nagpur
3. Ashish Jaikishan Thorat, Age 32 Yrs. Occu.: Agriculturist
Appli.No.1 & 3 R/o Asara, Po.Bhatkuli, Tq.Bhatkuli, Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा Jaikishan Vitthalrao Thorat हे दि.**२७.०२.२०२६** रोजी मयत झाले. अर्जदार Ranjana Jaikishan Thorat, Age 50 Yrs. Occu.: Household, R/o Asara, Tq.Bhatkuli Dist.Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**१३.०४.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Jaikishan Vitthalrao Thorat यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Jaikishan Vitthalrao Thorat यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २०.०४.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०३, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक १७०/२०२५ ने.ता.२७.०६.२०२६

**पिटीशनर - राजेश गोंडुजी काकाणे व ईतर**
**-- वि --**
**रिस्पांडंट - प्रफुल कैलास लोखंडे व ईतर**

**बनाम -** 1. Praful Kailash Lokhande,
R/o Tahsil Quarter, Chapamanwadi, Yavatmal
Tq.Dist.Amravati

**Application U/Sec. 166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **राजेश गोंडुजी काकाणे** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०३, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **प्रफुल कैलास लोखंडे** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक १९.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७८/२०२६
**सुधीर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sudhir S/o Baburao Manjre, Age 74 Yrs. Occu.: Retired
R/o 10, Shriram Nagar, Amravati.
2. Pradip S/o Baburao Manjre, Age 72 Yrs. Occu.: Advocate
R/o 10, Shriram Nagar, Amravati.
3. Smt.Rekha W/o Ulhas Betole, Age 70 Yrs. Occu.: Household
R/o Flat No.401, 4th Floor, Atharva Regency Opp.NMC Office Laxmi Nagar Nagpur
4. Nitin S/o Baburao Manjre, Age 63 Yrs. Occu.: H.R.
R/o Khadki Cantonment Flat No.5, 1st Floor, E-Building Sappers Line Bazar Khadki Gandham Nagar, Phase Pune.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **निर्मला बाबुराव मांजरे** हे दिनांक 02.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुधीर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुधीर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## नगर परिषद कार्यालय, मोर्शी, जि.अमरावती

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **शेख शाहरुख शेख शौकत,** रा.मोर्शी, जि.अमरावती, यांनी त्यांचे जन्माची नोंद दिनांक **१२.०२.१९९४** रोजी मोर्शी येथे करण्याकरीता निबंधक, न.प.मोर्शी यांना जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**

शिक्का

**मुख्याधिकारी तथा जन्म मृत्यू निबंधक, न.प., मोर्शी**

---

## नगर परिषद कार्यालय, मोर्शी, जि.अमरावती

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **शेख शाकीर शेख शौकत,** रा.मोर्शी, जि.अमरावती, यांनी त्यांचे जन्माची नोंद दिनांक **०१.०९.१९९७** रोजी मोर्शी येथे करण्याकरीता निबंधक, न.प.मोर्शी यांना जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**

शिक्का

**मुख्याधिकारी तथा जन्म मृत्यू निबंधक, न.प., मोर्शी**

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१३७/२०२६ ने.ता. २२.०६.२०२६

**अर्जदार :** १. कमल सुरेश पारसाकर
२. अमोल सुरेश पारसाकर
रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **सुरेश विनायक पारसकर** यांचा मृत्यू दि.**०१.०३.२०१०** रोजी मुंड निशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून नं.२ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**मा.सहदिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.१३४/२०२६ ने.ता. १२.०६.२०२६

**अर्जदार :** १. नानीबाई गजानन अलाटे, रा.बेंबळा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
२. सुशिला केशव लावरकर, रा.कंझरा, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला
३. लिलाबाई तुकाराम भोने, रा.शिवण बु.पो.बेंबळा, ता.कारंजा लाड, जि.वाशिम
४. सुनंदा मुकिंदा पुंड, रा.पळसखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
५. बेबी मधुकरराव वानखडे, रा.विठ्ठल मंदिराजवळ, सांगाणी नगर, ता.जि.अमरावती
६. गजानन विठ्ठल झिमटे
७. रामेश्वर विठ्ठलराव झिमटे, नं.६ व ७ रा.एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **विठ्ठल तुकाराम झिमटे** यांचा मृत्यू दि.**१७.०५.२०१७** रोजी एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे भुलाबाई विठ्ठल झिमटे यांचा मृत्यू दिनांक **२५.०८.१९९६ मध्ये** एरंडगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ते ५ मुले, ह्या मुली असून अर्जदार नं.६ व ७ ही मुले आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२४ एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## अकोटातील कथित 'बेनामी' खाणसाखळी

# खाणीत होणारे ब्लास्टिंग नियमांनुसार की बेफिकिरीने?

### डीजीएमएस परवानगी, स्फोटक वापर आणि बिलांच्या चौकशीतून उघड होऊ शकते मोठे रॅकेट

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर–रुदाळी परिसरातील कथित 'बेनामी' खाणसाखळी प्रकरणात आता खाणीत होणाऱ्या ब्लास्टिंग प्रक्रियेवरून नवे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. खाणकामासाठी करण्यात येणारे स्फोट नियमानुसार आणि आवश्यक परवानग्यांनुसारच होत आहेत का, याबाबत स्थानिक स्तरावर संशय व्यक्त केला जात असून, या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येऊ शकतात, अशी चर्चा सुरू आहे. खनिज उत्खननासाठी करण्यात येणारे ब्लास्टिंग हे अत्यंत संवेदनशील आणि नियमबद्ध काम मानले जाते. यासाठी स्फोटक साठवणूक, वापर, सुरक्षा उपाययोजना आणि प्रशिक्षित अधिकाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असते. तसेच डायरेक्टरेट जनरल ऑफ माइन्स सेफ्टी (DGMS) च्या निकषांनुसार खाणीत ब्लास्टिंग करण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया आणि परवानग्या बंधनकारक मानल्या जातात. मात्र गाजीपूर–रुदाळी परिसरातील काही खाणींमध्ये हे निकष प्रत्यक्षात पाळले जातात का, याबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक वेळा मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग झाल्याचे आवाज परिसरात ऐकू येतात. काही ठिकाणी घरांना तडे जाणे, धुळीचे प्रदूषण वाढणे आणि शेती क्षेत्रावर परिणाम झाल्याच्या तक्रारीही होत असल्याची चर्चा आहे. मात्र या संदर्भातील अधिकृत नोंदी, सुरक्षा तपासण्या आणि परवानग्या याबाबत स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. विशेष म्हणजे, या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आता ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकांच्या बिलांचा मानला जात आहे. स्फोटके, डेटोनेटर आणि संबंधित साहित्याची खरेदी नेमकी कोणाच्या नावावर केली जाते? बिलांमध्ये खाण परवाना धारकांची नावे आहेत की इतर व्यक्ती अथवा कंपन्यांची? याची चौकशी झाल्यास कथित 'बेनामी' व्यवहारांचे बिंग फुटू शकते, अशी चर्चा स्थानिक स्तरावर रंगू लागली आहे.खाण परवाने आदिवासींच्या नावावर असताना प्रत्यक्ष ब्लास्टिंगसाठी लागणारी प्रक्रिया,

> **ब्लास्टिंगची बिले कोणाच्या नावावर?**
> स्फोटके, डेटोनेटर आणि ब्लास्टिंग साहित्य खरेदीची बिले नेमकी कोणाच्या नावावर घेतली जातात, याची चौकशी झाल्यास कथित 'बेनामी' व्यवहारांचे खरे स्वरूप समोर येऊ शकते, अशी चर्चा स्थानिक स्तरावर रंगू लागली आहे.

तांत्रिक मनुष्यबळ, स्फोटक पुरवठा आणि आर्थिक व्यवहार इतरांकडून नियंत्रित होत असल्याचा आरोपही आता पुढे येऊ लागला आहे. ब्लास्टिंगसाठी लागणाऱ्या परवानग्या, स्फोटक साठवणूक परवाने, वाहतूक नोंदी आणि वापर अहवाल तपासले गेल्यास या संपूर्ण साखळीमागील खरे नियंत्रण कोणाकडे आहे, हे स्पष्ट होऊ शकते, असे बोलले जात आहे.

दरम्यान, खाण परिसरात सुरक्षा निकषांचे पालन होते का, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. डीजीएमएसच्या नियमानुसार ब्लास्टिंगपूर्वी परिसर रिकामा करणे, सुरक्षा अंतर राखणे, सूचना देणे आणि प्रशिक्षित ब्लास्टर नियुक्त करणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्षात या नियमांचे पालन कितपत होते, याबाबत स्थानिकांकडून शंका व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात आता महसूल आणि खनिकर्म विभागाबरोबरच स्फोटक विभाग, डीजीएमएस आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. कारण जर नियमबाह्य पद्धतीने ब्लास्टिंग होत असल्याचे सिद्ध झाले, तर हे प्रकरण केवळ अवैध उत्खननापुरते मर्यादित न राहता सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय ठरू शकते.स्थानिकांच्या मते, ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकांची बिले, पुरवठादार कंपन्या, वाहतूक परवाने आणि वापर नोंदींची चौकशी झाली तर या कथित खाणसाखळीमागील आर्थिक आणि व्यवस्थापकीय नियंत्रण उघड होऊ शकते. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणात 'मनी ट्रेल'बरोबरच 'ब्लास्टिंग ट्रेल'ची चौकशी करण्याची मागणी तीव्र होत आहे.

# गुंगीचे औषध देऊन स्टाफ नर्सचा विनयभंग?

### अमरावती जिल्हा रुग्णालयात धक्कादायक प्रकार

> **महिला कर्मचा-यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**
> या घटनेमुळे जिल्हा सामान्य रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज, ड्युटीवरील कर्मचाऱ्यांची चौकशी आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा सामान्य रुग्णालयातील एका ३८ वर्षीय स्टाफ नर्सला गुंगीचे औषध देऊन तिचा विनयभंग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयात एकच खळबळ उडाली असून, सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पीडित महिलेच्या वैद्यकीय तपासणीसाठी आणि रक्तनमुना न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविण्यासाठी पोलिसांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे विनंती केली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ३८ वर्षीय महिला ही जिल्हा सामान्य रुग्णालयात स्टाफ नर्स म्हणून कार्यरत आहेत. ६ मे २०२६ रोजी त्या रात्री ८ ते सकाळी ८ या वेळेत वार्ड क्रमांक ४ मध्ये नाईट ड्युटीवर होत्या. त्यावेळी त्यांच्या सोबत गौरव शिरसाट नावाचा वॉर्ड बॉय देखील कार्यरत होता. तक्रारीनुसार, रात्री साडेआठच्या सुमारास त्या नर्सची प्रकृती अचानक बिघडली आणि त्यांचा रक्तदाब कमी झाला. त्यामुळे त्या उपचारासाठी अपघात विभागात गेल्या. तेथील डॉक्टरांनी त्यांना सलाईन आणि इंजेक्शन घेण्याचा सल्ला दिला. मात्र, ड्युटी सुरू असल्याने त्यांनी वार्डमध्येच उपचार घेण्याचे ठरवले. यानंतर त्या पुन्हा वार्ड क्रमांक ४ मध्ये परतल्या. त्यावेळी वॉर्ड बॉय गौरव शिरसाट याच्याकडे त्यांची पाण्याची बाटली होती. त्यांनी त्या बाटलीतील पाणी प्यायले असता पाणी कडू लागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांना उलट्या होऊ लागल्या. प्रकृती अधिक बिघडल्याने त्या वार्ड क्रमांक ३ मधील ब्रदर विशाल शिर्गरवाडे यांना भेटल्या. विशाल शिर्गरवाडे यांनी त्यांना नव्याने सलाईन आणि इंजेक्शन दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. रात्री सुमारे ११.१५ वाजताच्या दरम्यान रुग्णालयाच्या पॅसेजमध्ये त्यांना सलाईन लावण्यात आली. त्यानंतर आपल्याला काहीही आठवत नसून आपण झोपेत गेल्याचे पीडितेने पोलिसांना सांगितले. सकाळी साडेसातच्या सुमारास जाग आल्यानंतर त्यांना आपले अंर्तवस्त्र काढले☞(पान २ वर)

# जयस्तंभ चौकात खंडेलवाल ज्वेलर्सवरील इमारतीला आग

### वरच्या मजल्यावर आग, मोठी दुर्घटना टळली

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या मध्यवर्ती आणि अत्यंत वर्दळीच्या जयस्तंभ चौक परिसरात शुक्रवारी सकाळी खळबळ उडाली, जेव्हा खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने तीव्र रूप धारण केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत काही तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.





माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास जयस्तंभ चौकातील खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरून अचानक धूर निघताना दिसून आला. काही वेळातच आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण मजला वेढला आणि धुराचे मोठे लोट परिसरात पसरले. परिसरातील दुकानदार व नागरिकांनी तत्काळ आरडाओरडा करत अग्निशमन दलाला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी ☞(पान २ वर)

# लोखंडी सळई पोटात घुसून मजुराचा मृत्यू

### -ठेकेदारावर गुन्हा दाखल, -नांदगाव पेठ परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका बांधकाम स्थळावर सुरक्षा साधनांचा अभाव असल्याने एका ५२ वर्षीय मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला. उंचावरून पडल्यानंतर खाली असलेल्या लोखंडी सळई मजुराच्या पोटात आरपार घुसल्याने हा भीषण अपघात घडला. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित ठेकेदाराविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. धारेंद्र सुखदेवराव गणवीर (वय ५२, रा. महादेवखोरी), असे मृत मजुराचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २० एप्रिल रोजी चंद्रशेखर देशमुख यांच्या मालकीच्या जागेवर बांधकाम सुरू होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास धारेंद्र गणवीर हे उंचावर 'जुगाड' (पाडस) बांधण्याचे काम करत होते. काम करत असताना अचानक त्यांचा तोल गेला आणि ते थेट खाली पडले. खाली असलेल्या बांधकामाच्या लोखंडी सळया त्यांच्या शरीरात आरपार घुसल्याने ते गंभीर जखमी झाले. उपस्थितांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेनंतर पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी मजुरांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही खबरदारी घेतली गेली नव्हती. मजुरांना हेल्मेट, हातमोजे किंवा गमबूट यांसारखी आवश्यक साधने पुरवण्यात आली नव्हती. उंचावर काम सुरू असताना मजुरांच्या सुरक्षिततेसाठी☞(पान २ वर)

# दहावीच्या निकालात अमरावती राज्यात सहाव्या स्थानी

### विभागात बुलढाणा जिल्हा अव्वल

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज शुक्रवार ७ मे रोजी जाहीर करण्यात आला. अमरावती विभागाचा निकाल ९०.५० टक्के लागला आहे. नऊ विभागीय मंडळांमध्ये क्रमवारीत अमरावती सहाव्या स्थानी कायम असले, तरी निकालात गेल्या वर्षीच्या तुलनेत २.४५ टक्क्यांची घट झाली आहे. विभागातून एकूण १ लाख ६१ हजार ७१९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षेला १ लाख ६० हजार ०३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १ लाख ४४ हजार ८३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. अमरावती विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी ही ९०.५० आहे. परीक्षांचे निकाल लवकर जाहीर होऊन इयत्ता अकरावीचे वर्ग लवकर सुरू व्हावेत, यासाठी तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेण्याच्या दृष्टीने यावर्षी प्रथमच इयत्ता दहावीची परीक्षा नेहमीपेक्षा दहा दिवस अगोदर आयोजित करण्यात आली होती. विभागात निकालाच्या टक्केवारीत बुलढाणा जिल्हा अव्वलस्थानी आहे. बुलढाणा जिल्ह्याचा निकाल ९३.९५ टक्के इतका आहे. क्रमवारी ☞(पान २ वर)

> **जिल्हानिहाय निकाल**
> बुलढाणा – ९३.९५ टक्के
> अकोला – ९०.७४ टक्के
> अमरावती – ९०.०६ टक्के
> यवतमाळ – ८८.३८ टक्के
> वाशीम – ८८.०४ टक्के







# तक्रार का केली म्हणून घरात घुसून महिलेचा विनयभंग

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागोबा ओटा परिसरात जुन्या वादातून तक्रार केल्याचा राग मनात धरून तीन तरुणांनी एका घरात घुसून धिंगाणा घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपींनी एका ४४ वर्षीय महिलेचा विनयभंग करत तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ मे रोजी रात्री पीडित महिला आपल्या मुलीसह घरात होती. त्यावेळी शेख इरफान, समीर ऊर्फ भद्दा आणि सलाउद्दीन हे तिघे अचानक घरात घुसले. पीडित महिलेच्या मुलीने यापूर्वी आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. याच कारणाचा राग मनात धरून आरोपींनी 'आमच्या विरोधात तक्रार का केली?' असा जाब विचारत घरातच गोंधळ घालण्यास सुरुवात केली. आरोपींनी पीडित महिलेशी ☞(पान २ वर)

# धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनलचा प्रचार नारळ फुटला

### -बॅट या चिन्हावर शिक्का मारण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक धन्वंतरी सहकारी रुग्णालय मर्यादित,अमरावतीची निवडणूक १७ मे रोजी होणार असून संचालक मंडळाच्या निवडणुकीचा प्रचार नारळ धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनल तर्फे आज पॅनल प्रमुख डॉ.ओ.जी.मुंधडा यांच्या हस्ते फोडण्यात आला.

धन्वंतरी सहकारी रुग्णालयाचे आद्य संस्थापक डॉ.रामभाऊजी दे.ठाकरे यांच्या पुतळ्यास डॉ. ओ.जी. मुंधडा यांनी पुष्पहार अर्पण करून प्रचार नारळ फोडला. धन्वंतरी रुग्णालय सहकार पॅनलला बॅट चिन्ह मिळाल्याने बॅट चिन्हावर मतदारांनी शिक्का मारावा असे आवाहन डॉ.ओ.जी. मुंधडा यांनी यावेळी केले.



यावेळी संचालक मंडळा करिता निवडणुकीस उभे असलेले सर्वसाधारण मतदार संघातील प्रा.अशोक रामभाऊ ठाकरे, ओंकारराव शंकरराव बंड,डॉ. प्रमोद आनंदराव झाडे, गजानन रडके, राजेश श्रीकिसन गोयनका, प्रतापराव पंजाबराव भुयार वैद्यकीय क्षेत्रातील सक्षम मतदारसंघातील अविरोध निवडून आलेले डॉ. ओ.जी. मुंधडा, डॉ.अनिल रोहणकर,डॉ. आशिष साबु, डॉ. मनोज गुप्ता, डॉ. अविनाश लव्हाळे, डॉ. स्वप्निल शिरभाते महिला राखीव प्रतिनिधी उमेदवार डॉ. मिनल मनीष देशमुख, वंदना प्रशांत वानखडे इतर मागासवर्गीय प्रतिनिधीचे उमेदवार ☞(पान २ वर)

# फोटोग्राफरकडून १.८० लाखांची फसवणूक

### ब्राह्मणवाडा थडी ठाण्यात तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ शूटिंग चे काम दिलेल्या फोटोग्राफरने १ लाख ८० हजार रुपयाने फसविल्याची घटना ब्राह्मणवाडा थडी पोलिस ठाण्यात हद्दीत समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी पुरुषोत्तम यशवंत गवई यांच्या तक्रारी वरून आरोपी अतुल देवराव सोनटक्के (धोमानपुरा, मारुती मंदिराजवळ येवदा दर्यापूर ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार पुरुषोत्तम गवई यांनी आपली मुलगी आरती गवई हिच्या एंगेजमेंट ,हळदी, लग्न समारंभच्या फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी सेवेसाठी अतुल सोनटक्के यांना ५५ हजार रुपये मध्ये काम दिले होते. ठरल्या प्रमाणे त्यांना ५५ हजार रुपये देण्यात आले तसेच त्यांचे जावई शुभम क्षीरसागर (डाबकी रोड ,अकोला) यांनी पाच दिवसाच्या फोटोशूट साठी एकूण ९५ हजार रुपये दिले. ☞(पान २ वर)

# ५० हजारांची लाच मागणाऱ्या दोघांना रंगेहात अटक

### -एसीबीची कारवाई; भातकुली पंचायत समितीतील कर्मचारी जाळ्यात


**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणाचा हक्क (आरटीई) अंतर्गत विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठी सकारात्मक सत्यापन अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात ५० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या पंचायत समिती भातकुलीतील दोन कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली. हर्षवर्धन इंगळे (वय ४२, संतोषी माता कॉलनी, अमरावती) व प्रभारी केंद्र प्रमुख नरेंद्र धनस्कर (वय ५४, बापू कॉलनी, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

माहितीनुसार, तक्रारदारांनी आपल्या मुलीच्या पहिलीच्या प्रवेशासाठी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आरटीई अंतर्गत ऑनलाइन अर्ज केला होता. लॉटरी पद्धतीद्वारे विद्यार्थिनीला कठोरा येथील 'टोमोए प्रायमरी इंग्लिश स्कूल'मध्ये प्रवेशासाठी निवडण्यात आले होते. ३० एप्रिल २०२६ रोजी पत्त्याच्या पडताळणीसाठी पंचायत समिती भातकुली☞(पान २ वर)

# पाईपलाईन दुरुस्तीचे काम युद्ध स्तरावर सुरू

### -रात्रीपासून यंत्रणा कामाला, गळती रोखण्यात यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची शहराला पाणीपुरवठा करणारी १५०० मिमी व्यासाची मुख्य पाईपलाईन डवरगाव जवळ गुरुवारी दुपारी अचानक फुटली होती. पाईपलाईन दुरुस्तीचे काम गुरुवारी रात्रीपासून युद्ध स्तरावर सुरू आहे.गळती रोखण्यात यंत्रणाला यश आले आहे. पण पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. कर्मचारी रात्र-दिवस काम करत आहे.नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील माऊली जहागीर जवळ अप्पर वर्धा जलाशयाची मुख्य जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. मजीप्रा अधिकाऱ्यांनी रात्रीपासूनच युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले अनेक ☞(पान २ वर)



# निवृत्त शिक्षिकेवर पतीने केला हातोड्याने जीवघेणा हल्ला

### २५ दिवसांपासून मृत्यूशी झुंज, कौटुंबिक कलहातून घटना

**अंजनगांव सुर्जी/प्रतिनिधीः-** शहरातील गणेशनगर परिसरात कौटुंबिक वादातून एका सेवानिवृत्त शिक्षिकेवर तिच्याच पतीने हातोडा आणि लोखंडी अवजाराने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या भीषण हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून गेल्या २५ दिवसांपासून त्या कोमात मृत्यूशी झुंज देत आहेत. याप्रकरणी अंजनगांव सुर्जी पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली. महेंद्रकुमार दयाराम जांभुळकर (वय ६०, रा. गणेशनगर, अंजनगांव सुर्जी) असे आरोपीचे नाव आहे. कौटुंबिक वादातून संतापलेल्या आरोपीने आपल्या पत्नीवर हातोडा आणि लोखंडी अवजाराने डोक्यावर वार केले. या हल्ल्यात महिलेच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली असून त्या रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या होत्या. घटनेनंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने अंजनगांव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र,☞(पान २ वर)